# Book of Acts

प्रेषितांचे कृत्ये

**<u>विषय वाक्य :</u>** येशूने शिष्यांना नेमले आणि त्यांच्यासाठी अभिवचन दिले.

## <u>पहिला दिवस</u> --- प्रे.कृ. १:१-५ वाचन करा

**प्रश्न १. प्रेषित १:१-५ सोबत लुक १:१-४ ची तुलना करा की हे पुस्तक कोणाला आणि का लिहले ?**

**उत्तर:** हे पुस्तक वैद्य लुक याने थियफिल महाराज याला लिहले (थियफिल या नावाचा अर्थ '' देवाचा प्रिय'' हा कोणीतरी रोमी अधिकारी किंवा महत्वाचा श्रीमंत व्यक्ती असावा. आणि शुभवर्तमानाच्या लेखनासाठी व प्रती साठी त्याने खर्च पुरविला असावा.). हे पुस्तक त्याचे दुसरे पुस्तक आहे. कारण पहीले पुस्तक लुककृत शुभवर्त्मान आणि त्या पुस्तकाचा जेथे शेवट होतो , तेथूनच पुढे या पुस्तकाची सुरवात होते. ....( लुक.२४:४९-५३ ; प्रे.कृ.१:१-४ याची तुलना केल्यास समजते).

लिहण्याचे कारण की, ख्रिस्ताने जे कार्य सुरू केले ते त्याला समजावे आणि जी आज्ञा ख्रिस्ताने शिष्यांना दिली ती कशी पुढे सुरु राहीली हे पण समजावे. म्हणजेच ज्या कार्याचा ख्रिस्ताने आरंभ केला आणि मग त्याचे स्वर्गारोहण झाले तेथेच ते कार्य समाप्त झाले नाही तर ते कार्य पुढे कसे सुरू राहीले हे त्याला समजावे म्हणून हे पुस्तक लिहले.

**प्रश्न : २ आपल्या पुनरूत्थानानंतर येशू किती दिवस प्रकटला ?**

**उत्तर:** चाळीस दिवसापर्यंत लोकांना दर्शन देऊन देवाच्या राज्याच्या गोष्टी सांगत होता ...व.४

**प्रश्न: ३ त्याने आपल्या शिष्यांना कोणती आज्ञा दिली होती ?**

**उत्तर :** यरुशलेम सोडून जाऊ नका आणि पित्याने देऊ केलेली देणगीची (पवित्र आत्मा) वाट पाहा. आणि तुमचा बाप्तिस्मा पवित्र आत्म्याने होईल. ही शिष्यांना आज्ञा होती. ..व.४,५

## <u>दुसरा दिवस</u> --- प्रे.कृ. १:६-८ वाचन करा

**प्रश्न :१ वचन ६ मध्ये जेव्हा त्यांनी येशूला प्रश्न विचारले तेव्हा त्यांची काय भावना असावी ?**

**उत्तर :** त्यांना वाटले की , येशू त्याचे राज्य लवकर स्थापन करणार अशी त्यांची अपेक्षा होती. कारण येशूचे शिष्य यहुदी असल्याकारणाने त्यांना वाटत होते की, येशू इस्त्राएलाचे स्वतंत्र राज्य स्थापन करील. येशू जगीक राज्यासंबंधी बोलत आहे असे त्यांना वाटत होते. म्हणजे इस्त्राएल राज्याची पुनस्थापना करील. त्यांना असे वाटत होते त्याचे कारण त्यांच्या काळात इस्त्राएल राष्ट्र रोमी सरकारच्या अधीपत्याखाली होते.यहुद्यांनी त्यांचे स्व:तत्र्य गमावले होते. येशू सांगत होता की, 'देवाचे राज्य जवळ आले आहे , .. मार्क.१:१५ .

**प्रश्न : २ येशूने जे उत्तर दिले त्या आधारावर त्यांच्यासाठी तो काय इच्छित होता असे तुम्हास वाटते ?**

**उत्तर:** येशू पृथ्वीवरील राज्याची स्थापना करण्यासाठी आला नव्हता. तो आत्मिक राज्याची स्थापना करण्यासाठी आला होता. जेव्हा येशू पृथ्वीवर पुन्हा येईल तेव्हा ते राज्य स्थापन होईल(माक.१३:२६). तो दिवस कधी येईल हे पित्याशिवाय कोणालाही माहीत नाही(मार्क.१३:३२). त्यांने धीर धरावे , वाट पाहावी आणि पवित्र आत्म्याच्या सामथ्याने भरावे. हीच त्याची इच्छा होती.

**प्रश्न : ३ ह्या वचनांमधून देवाचे कोणते गुणवैशिष्टे दिसून येतात? तुमच्या जीवनाशी ती कशी बोलतात ?**

**उत्तर :** या ठिकाणी देवाची त्रिएकता दिसून येते. पिता,पुत्र आणि पवित्रआत्मा या तिघांचे कार्य दिसून येते. पित्याने आम्हाला त्याच्या पुर्वाज्ञानानुसार निवडले. येशूने आम्हासाठी आपला प्राण दिला आणि पापातून मुक्त केले. पवित्र आत्मा आपल्याला सामर्थ्य देतो यासाठी की, जगात जाऊन शुभवर्तमान सांगावे. आम्ही ख्रिस्तावर विश्वास ठेवून पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने भरून ख्रिस्त येईपर्यंत जगात शुभवर्तमान सांगत राहणे.सेवाकार्य स्वत:च्या सामथ्र्याने नव्हे तर पवित्र आत्म्याच्या सामथ्याने करावे.

**प्रश्न :४ या पुस्तकाचे वचन ८ हे घोषणावाक्य तुम्ही आपल्या शब्दात मांडू शकता काय ?**

**उत्तर:** ''जेव्हा पवित्र आत्मा माझ्यावर येईल तेव्हा मला सामर्थ्य प्राप्त होईल, आणि मग मी माझ्या गावात,शहरात, तालुक्यात, जिल्ह्यात आणि पुर्ण महाराष्ट्रात येशूचा साक्षी होईन''

**प्रश्न : ५ येशूने विश्वासणाऱ्यांनाच आपले साक्षीदार का नेमले असावे ?**
**उत्तर :** कारण जे त्याच्यावर विश्वास ठेवतात त्यांच्यावर तो प्रेम करतो. विश्वासणाऱ्यांच्याद्वारे अंधकारातील लोकांना खिगस्ताचे जीवन समजते.

**<u>तिसरा दिवस</u> ---- प्रे.कृ. १:९-११**

**प्रश्न :१ योहान ७:३७-३९ वाचा. पवित्र आत्मा देण्यापुर्वी काय घडण्याचे येशूने म्हटले ?**
**उत्तर :** ''त्यांच्यामधून जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील'' म्हणजे जे त्याच्यावर विश्वास ठेवतात, त्यांच्या सर्व गरजा पुर्ण होतील, त्यांना आत्मिक आशीर्वाद मिळतील आणि त्यांच्या जीवनातून ते ओसंडून वाहतील. जुन्या करारात सांगीतले आहे की, जे ख्रिस्ताचा स्विकार करतील, त्यांना स्वत:ला आशीर्वाद मिळेल व त्यांच्याद्वारे इतरानाही आशीर्वाद मिळेल(यशया.५५:१).जिवंत पाण्याच्या नद्या वाहतील म्हणजे.त्या व्यक्तीच्या अंतकरणातून इतरांना मदत करण्यासाठी स्फुर्ता मिळेल. (टेंपल म्हणतात:- देवाचा आत्मा एखाद्यामध्ये वस्तीस कधीच राहत नाही. तो स्वत:पाशीच ठेवत नसतो. आत्मा सतत वाहत राहतो. जर तो वाहत नाही ,तर तेथे आत्मा नसतो).

**प्रश्न:२ ज्या मेघाने येशू त्यांच्या दृष्टीआड झाला ते कशाचे प्रतिनिधित्व करते ? (निर्गम.१३:२१-२२ वाचा)**
**उत्तर :** निर्गम प्रमाणे मेघस्तंभ मार्ग दाखवण्याचे प्रतिनिधित्व करते.

**पश्न:३ परत येण्याविषयी येशूने कशी प्रतिज्ञा केली ? (मत्तय.२४:३०).**
**उत्तर:** आकाशात चिन्ह प्रगट होईल. पण कोणते चिन्ह प्रगट होईल हे माहीत नाही. पण पृथ्वीवरील सर्व जातीचे लोक शोक करतील. आणि जो मनुष्याचा पुत्र त्याच्या तोंडावर थुंकले, ज्याला वधस्तंभावर खिळले तोच आता जीवनाचा वैभवशाली प्रभू येशू ख्रिस्त पराक्रमाने व मोठ्या राजवैभवाने मेघावर आरुढ होऊन पुन्हा येताना पाहतील.

**<u>चौथा दिवस</u> ---- प्रे.कृ. १:१२-२६**

**पश्न:१ माडीवरच्या खोलीत भेटणारी ती लोक कोण होती ?ते का एकत्र येत असत ?**
**उत्तर:** तेथे पेत्र, योहान, याकोब, अंद्रिया, फिलीप, थोमा, बर्तलमय, मत्तय, अल्फीचा मुलगा याकोब, शिमोन,जिलोत व याकोबाचा मुलगा यहुदा आणि कित्येक स्त्रिया,येशूची आई मरीया व त्याचे भाऊ हे लोक एकत्र जमत असत.

एकचित्ताने एकत्र मिळून प्रार्थना करावी म्हणून एकत्र येत असत, कारण तशी त्यांना येशूने स्वर्गारोहनाच्या वेळी आज्ञा दिली होती की, ''यरुशलेम सोडून जाऊ नका तर पित्याने देऊ केलेल्या देणगी विषयी जे ऐकले त्याची वाट पाही'' म्हणून ते पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याची वाट पाहत होते.

या ठिकाणी दोन शब्द महत्वाचे आहेत.''**एकचित्ताने**'' आणि **''प्रार्थना''**

**एकचित्त:-** हा शब्द प्रेषितांच्या कृत्यात अकरा वेळा आला आहे. तो शब्द म्हणजे सर्व आशीर्वादाचे रहस्य उलघडणारी किल्ली आहे. ' जेथे बंधू ऐक्यात राहतात तेथे देवाचा आशीर्वाद असतो'' आणि अनंत जीवन असते (स्तोस्त्र.१३३).

**प्रार्थना :-** ही दुसरी महत्वाची किल्ली आहे. जेथे लोक प्रार्थना करितात तेथे देवाचे कार्य होत असते. जेव्हा आपण अत्यंत कळकळीने, विश्वासाने ,शांतचित्ताने एकचित्त होऊन प्रार्थना करितो, तेव्हा देवाच्या आत्म्याचे सामथ्य्र आपल्यावर ओतले जाते.

**पश्न: २ ही वचने यहुदा विषयी काय सांगतात ?**
**उत्तर:** शिष्यांच्या यादीमध्ये यहुदा इस्कोर्योतचे नाव सामाविष्ठ नाही. या ठिकाणी असलेला यहुदा हा दुसरा आहे तो याकोबाचा मुलगा आहे.

ही वचने यहुदाविषयी असे सांगतात की, जुन्या करारात दाविदाने केलेली भविष्यवाणी '' येशूचा एक जवळचा मित्र त्याला धरून देईल'' .. (स्तोत्र.४१:९ ; योहान.१३:१८ ; १७:१२) ही भविष्यवाणी पुर्ण झाली. तसेच मत्यय २७:३-१० मध्ये यहुदाविषयी सांगितले आहे. तसेच त्याची वस्ती ओसाड पडेल असे दाविद म्हणतो(स्तोत्र.६९:२५).आणि दाविदाने हे पण सांगितले की. त्याची जागा दुसरा घेईल(स्तोत्र.१०९:८). त्याप्रमाणेच यहुदाइस्कोर्योत मेला त्याच्या जागी कोणीतरी आला पाहीजे.

**पश्न:३ जेव्हा शिष्यांनी एक नवा पुढारी निवडला वचन २१मध्ये त्यांनी एक गुण वैशिष्टये सांगितले आणि त्यांनी वचन २४ मध्ये दुसऱ्यांविषयी प्रार्थना केली ही महत्वाची का आहे ?**

**उत्तर:** जेव्हा शिष्यांनी नवा पुढारी निवडला तेव्हा त्यांच्यामध्ये दोन वैशिष्ट गुण महत्वाचे होते.

**१.** येशूच्या तीन वर्षाच्या सेवाकार्यात ती व्यक्ती शिष्यांच्या समवेत असायला हवी. तसेच येशूचा बाप्तिस्मा झाला तेव्हा पासून त्याच्या स्वर्गारोहनापर्यंत ती व्यक्ती शिष्यांसह असली पाहीजे.

**२.** तो विश्वासू साक्षीदार. पुनरूत्थानाविषयी साक्ष देणारा असला पाहीजे. असे दोन व्यक्तींना त्याने निवडले परंतू त्यांच्यामधून कोणाला नियुक्त करावे यासाठी त्यांने स्वत:हा निर्णय घेतला नाही. तर नियुक्त करण्याचे कार्य देवाच्या हाती सोपविले. देवाची इच्छा जाणून घेतली. देवाची इच्छा जाणून घेण्यासाठी प्रार्थना महत्वाची होती.

**<u>पाचवा दिवस</u> ------- प्रेषित१ आणि १करिंथ.१५:१७**

**प्रश्न : १ एका विश्वासणाऱ्यासाठी येशूचे पुनरूत्थान का जास्त महत्वाचे आहे ?**

**उत्तर:** जर ख्रिस्त उठविला गेला नसता तर आपण अजून पापातच राहीलो असतो. म्हणजे आपले तारण झाले नसते.ख्रिस्त मरणातून उठला आहे आणि त्याने पापाला हरविले आहे , म्हणून तो आम्हाला पापापासून वाचविण्यास समर्थ आहे.ख्रिस्तचे पुनरूत्थान झाले म्हणून आम्हाला खात्री आहे की,तो आम्हास तारावयास समर्थ आहे.म्हणून विश्वासणाऱ्यांसाठी त्याचे पुनरूत्थान महत्वाचे आहे.

**प्रश्न:२ या अध्यायात कोणती अभिवचने तुम्हास मिळतात ?**

**उत्तर:** पित्याची देणगी म्हणजे पवित्र आत्मा आम्हाला मिळतो सामर्थ्य देण्यासाठी, तसेच ख्रिस्त जसा स्वर्गात गेला तसाच पुन्हा येणार आहे.

**प्रश्न:३ ह्या अभिवचना विषयी आपल्याला काय म्हणायचे आहे ?**

**उत्तर:** या अभिवचनाद्वारे आम्हाला सामर्थ्य मिळते. आणि ख्रिस्त येईपर्यंत आम्हाला या पृक्वीवर शुभवर्तमान सांगायचे आहे. त्यासाठी आम्हाला हे अभिवचन नेहमी आठवले पाहीजे. कारण पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याशिवाय आम्ही कोणतेच कार्य करू शकत नाही.

**<u>सहावा दिवस</u> :----**

**प्रकरण १ : ''ख्रिस्त नव्या सामर्थ्याची व हेतूची घोषणा करतो.''**

| | | |
|---|---|---|
| **पाठ** | : | अध्याय १ |
| **मुख्यवचन** | : | १:८ ''परंतू पवित्र आत्मा तूम्हावर येईल तेव्हा तूम्हाला सामर्थ्य प्राप्त होईल आणि यरूशलेमेत, सर्व यहंदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शेवटापर्यंत तुम्ही माझे साक्षी व्हाल'' |
| **विषय वाक्य** | : | येशू शिष्यांना नेमतो आणि अभिवचनाने त्यांस सोडतो. |
| **जिवनतत्व** | : | वाट पाहण्यात हेतू असतो |

## अध्याय २

**विषय वाक्य :-** पेन्टेकॉस्ट मंडळीच्या प्रारंभाला चिन्हांकित करते.

**पहिला दिवस ----- प्रे.कृ. २:१-१३ वाचन करा**

**प्रश्न:१ वचन १-४ पासून स्पष्ट करा जे त्यांनी पाहीले,ऐकले आणि पेन्टेकॉस्टच्या दिवशी अनुभवले ?**

**उत्तर:** या वचनामध्ये येशूने केलेली प्रतिज्ञा पुर्ण होताना दिसते. सोसाटयाच्या वाऱ्यासमान पवित्रआत्मा उतरला . आणि वेगवेगळया अग्नीच्या जिभासारख्या जिभा त्यांना दिसल्या त्या प्रत्येकावर एकएक अशा बसताना पाहील्या. तेव्हां जे घरात बसले होते ते पवित्र आत्म्याने भरले. आणि निरनिराळया भाषेत बोलू लागले.

**प्रश्न:२ त्या दिवशी कोणते वेगळयाप्रकारचे लोक उपस्थित होते ?**

**उत्तर:** त्या दिवशी पार्थी, मेदी, एलामी, मेसोपटेम्या, यहुदिया, कप्पुदुकिया, पंत, आसिया, परूगिया, पफूलिया, मिसरी आणि कंरेनच्या जवळच्या लिबूवा देशात राहणारे यहुदी व यहुदीमतानुसासर रोमन प्रवासी, क्रेतीय आणि अरब अशा ठिकाणचे लोक या ठिकाणी उपस्थित होते.

**प्रश्न:३ कोणत्या भाषा बोलल्या गेल्या जेणेकरून सर्वांनी समजावे ?**

**उत्तर:** सर्व भाषामध्ये ते बोलत होते. क्रेतीय व अरबी भाषा सुद्धा बोलल्या गेल्या. अनेक देशातील लोक याठिकाणी होते त्यांच्या सुद्धा भाषा बोलल्या गेल्या जेणेकरून त्यांना समजावे.

**प्रश्न:४ अशा असामान्य घटनेविषयी वेगवेगळया लोकांचा प्रतिसाद कसा होता ?**

**उत्तर:** काही लोक गांधळून गेले होते. काही लोक चेष्टा करीत होते. तर काही लोक म्हणत होते की,हे द्राक्षरसाने मस्त झाले आहेत.

**दुसरा दिवस ----प्रे.कृ. २:१-१३ वाचन करा**

**प्रश्न:१ इफिस ५:१८ मध्ये पवित्र आत्म्याविषयी कोणती आज्ञा दिली आहे ?**

**उत्तर:** द्राक्षरसाने मस्त होऊ नये तर , पवित्र आत्म्याने परिपुर्ण व्हावे.

**प्रश्न:२ पुढील शास्त्रभाग बघा आणि पवित्र आत्म्याने भरण्याविषयी चिन्हांची यादी बनवा ?**

**अ) प्रे.कृ.४:३१ , ब) प्रे.कृ.६:१-५, क) प्रे.कृ.१३:८-१०, ड) प्रे.कृ.१३:५२**

**उत्तर:** **अ)** प्रे.कृ.४:३१ ------ धैर्याने वचन सांगण्यासाठी पवित्र आत्मा मदत करतो.

**ब)** प्रे.कृ.६:१-५ -- ---सेवा करण्यासाठी निवड करतो.

**क)** प्रे.कृ.१३:८-१० -- प्रभूचे मार्ग विपरित करणाऱ्यांना दटावण्यासाठी धैर्य देतो.

**ड)** प्रे.कृ.१३:५२ ----- आनंद करण्यासाठी उत्साहीत करतो.

यावरून हे कळते की, विश्वासणारे ऐकदाच पवित्र आत्म्याने भरले नाहीत तर,त्यांच्या जीवनात अनेकदा पवित्र आत्मा आला.आपणही सतत पवित्र आतम्याने भरले जावे(इफिस.५:१८).

**प्रश्न:३ गलती ५:२२२-२३ वाचा आणि विश्वासणाऱ्यांच्यामध्ये पवित्रआत्मा कोणता चारित्र्यवानगुण उत्पन्न करू शकतो याची यादी बनवा ?**

**उत्तर:** प्रीती, आनंद, शांती, सहनशीलता,ममता, चांगुलपणा, विश्वासूपणा, सौम्यता आणि इंद्रियदमन हे चारित्र्यगुण उत्पन्न करू शकतो.

**प्रश्न:४ पवित्र आत्म्याच्या गुणवैशिट्यांपैकी एखाद्या गुणाच्या अनुभवाचे वर्णन करा ?**

**उत्तर:** सर्वात प्रथम प्रीती. कारण ती सहनशील आहे.ती हेवा करीत नाही.बढाई करीत नाही.फुगत नाही.गैरशिस्त वागत नाही.स्वार्थीपणाने वागत नाही. ती सर्व काही सहन करते. प्रीती धीर धरते.

**<u>तिसरा दिवस</u> --- प्रे.२:१४-२८**

**प्रश्नः१ कोणते भविष्य जे पेत्राने सांगीतले ते ह्या समयी पुर्ण झाले ?**

**उत्तरः** योएल संदेष्टयाने सांगितलेले भविष्य (योएल.२:२८-३२) ह्या समयी पुर्ण झाले ते म्हणजे,''मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन तेव्हा तुमचे पुत्र व कन्या संदेश देतील , तुमच्या वृद्धांस स्वप्ने पडतील, तुमच्या तरूणांस दृष्टांन्त होतील ''

**प्रश्नः २ पेत्र म्हणतो येशू '' देवाच्या ठाम संकल्पानुसार व पुर्वज्ञानानुसार'' वधस्तंभी खिळला हा देवाचा कोणता विशेष गुण प्रगट होतो ?**

**उत्तरः** देव मरणाच्या वेदनापासून सोडविणारा आहे.मरणाच्या वेदना नाहीशा करणारा आहे. मरणावर विजय मिळवणारा आहे.

**प्रश्नः३ यशया.५३:१०-११ नुसार, ख्रिस्ताच्या मृत्यूने कोणत्या गोष्टी पुर्ण झाल्या ?**

**उत्तरः** मानवाच्या तारणासाठी अर्पण करण्यात येणारे बलीदान ख्रिस्ताच्याद्वारे पुर्ण झाले. जे कोणी त्याच्यावर विश्वास ठेवतात ते सर्व निर्दोष झाले. आणि त्याचा परिणाम सर्वांचे तारण झाले.ख्रिस्ताच्या मृत्यूद्वारे प्रायश्चित्ताचे अर्पण पुर्ण झाले(लेवी.५:१५-१६). जे अनितीमान होते ते नितिमान बनले. ख्रिस्ताच्या मृत्यूने देवाचा मनोरथ पुर्ण झाला. देवाची प्रीती प्रगट झाली. मानवास सार्वकालीक जीवन प्राप्त झाले(योहान.३:१६).

**<u>चौथा दिवस</u> ---- प्रे.कृ. २:१७:३२ वाचन करा**

**प्रश्नः१ शेवटचे दिवस म्हणजे काय ?(इब्री.१:१-२ आणि <u>१पेत्र.१:१८-२१</u> वाचा ) ?**

**उत्तरः** जुन्या करारात देव संदेष्टयांच्याद्वारे बोलला. पण आता नविन करारात देव ख्रिस्ताच्या द्वारे बोलला आहे. शेवटचे दिवस म्हणजे, आताचा वर्तमान काळ आहे.या काळात आता आपण आहोत तो काळ. ख्रिस्त येण्याचा दिवस जवळ आला आहे. म्हणून जुन्या गोष्टीविषयी आपण ख्रिस्ताबरोबर मृत झालो आहोत.

**प्रश्नः२ प्रभूचा दिवस म्हणजे काय ?(२पेत्र.३:१०-१३ वाचन करा )?**

**उत्तरः** ख्रिस्त येण्याचा दिवस . म्हणजेच न्यायाचा दिवस. दुष्टांना शासन करण्याचा दिवस म्हणजे जुन्या करारात म्हटले आहे(यशया.२:१२; १३:६,९; यहेज्केल.१३:५ ; ३०:३; योएल.१:१५ ; २:१,११,३१ ; ३:१४; आमोस.५:१८,२० ; ओबद्या.१५; सफन्या१:७,१४; जखऱ्या.१४:१; मलाखी.४:५). तो अचानक येईल(मत्तय. २४:४३-४४). तो न्यायनिवाडा करण्याकरीता लवकर येणार आहे.

एके काळी देवाने पाण्याने न्यायनिवाडा केला(२पेत्र.३:६)., त्या प्रकारे तो आता परत अग्नीने न्यायनिवाडा करील आणि त्या अग्नीने पृथ्वीचा पुर्णपणे नाश होईल(१करिंथ.३:१३-१५; २थेस्सल.१:६-८; इब्री. १०:२६-२७; १२:२९). म्हणून आपली वर्तणूक पवित्र असावी व सुभक्तीत रहावे. अन्यथा जगासोबत आपला देखील नाश होईल(रोम.१३:११-१२; १थेस्सल.५:४-८).

**प्रश्नः३ ''शेवटच्या दिवसाच्या'' अखेरीस काय घडणार ? (प्रे.कृ.२:१७-२०) ?**

**उत्तरः** मनुष्यमात्रावर पवित्र आत्म्याचा वर्षाव होणार.कन्या व पुत्र संदेश देतील.तरूणांस दृष्टांन्त पडतील.वृद्धांस स्वप्ने पडतील. दास व दासी संदेश देतील. आकाशात अद्भूत कृत्ये आणि पृथ्वीवर चिन्हे होतील म्हणजे रक्त, अग्नी व धुम्ररूप वाफ यांचा वर्षाव होईल. सुर्य अंधकारमय होईल आणि चंद्र रक्तमय होईल.

**प्रश्नः४ तुमचा विचार असा आहे की काय? पवित्र आत्मा केवळ पाळकांसाठी, सुवार्ताप्रचारकांसाठी, सेवकांसाठी आहे ,की प्रत्येक विश्वासणाऱ्यांसाठी आहे ज्याने प्रभू येशू ख्रिस्ताला आपला प्रभू आणि तारणारा म्हणून स्विकारले त्यांच्यासाठी आहे ?**

**उत्तरः** पवित्रआत्मा सर्वांसाठी आहे ज्याने येशूला आपला प्रभू आणि तारणारा म्हणून स्विकारले त्या सर्वांसाठी आहे.

**प्रश्नः५ येशूच्या मृत्यूविषयी पेत्र कोणाला दोषी ठरवितो ?**

**उत्तरः** पेत्र यहुदी लोकांना दोषी ठरवित आहे (मार्क.१५:१, ९-१५).

## <u>पाचवा दिवस</u> ----- प्रे.कृ.२:३३-४७ वाचन करा

**प्रश्न:१ ख्रिस्त आता कोठे आहे ?**

**उत्तर:** ख्रिस्त आता स्वर्गात देवाच्या उजव्या बाजूला बसला आहे.(स्तोत्र.११०:१).

**प्रश्न:२ ह्याचा तुमच्या वर्तमान परिस्थितीवर कोणता परिणाम होतो ?**

**उत्तर:** येशू एक महान गुरू , महान संदेष्टा व महान अवतार नाही, किंवा केवळ ख्रिस्तच नाही परंतू तो स्वत: देव आहे. येशू प्रभू आहे(रोम.१०:९ ;फिलीप.२:११).

**प्रश्न:३ त्यांच्या अंतकरणात चूटपूट लागल्यावर त्यांनी जेंव्हा विचरले की, आम्ही काय करावे तेव्हा पेत्राने त्यांना काय करावयास सांगितले ?**

**उत्तर:** पश्चाताप करा आणि पापांची क्षमा व्हावी म्हणून प्रत्येक जणांनी येशू ख्रिस्ताच्या नावाने बाप्तिस्मा घ्यावा. म्हणजे पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल.

- ✞ प्रथम **<u>पश्चाताप केला</u>** पाहीजे.
- ✞ त्यांनी त्यांच्या **<u>पापांची कबुली दिली पाहीजे</u>** आणि स्वत:विरूद्ध जाऊन देवाच्या बाजूचे झाले पाहीजे.
- ✞ नंतर त्यांच्या **<u>पापांची क्षमा होण्यासाठी बाप्तिस्मा</u>** घेतला पाहीजे.
- ✞ नंतर पवित्र आत्म्याचे दान प्राप्त होईल.

बापित्स्मा घेतल्याने तारण प्राप्त होते असे अनेकांचे मत आहे. परंतू तसे नाही. तारणासाठी प्रथम विश्वास महत्वाचा आहे( योहान.१:१२ ; ३:१६ , ३६ ; ६:४७; प्रे.कृ.१६:३१ ; रोम.१०:९).

**प्रश्न:४ ''कुटिल पिढी'' या शब्दाचा अर्थ पेत्राने कोणता काढला, असे तुम्हास वाटते ?**

**उत्तर:** ज्या लोकांनी ख्रिस्ताला देवाच्या पूत्राला कृसावर दिले होते. म्हणजेच त्यांनी नाकारले होते अशाना तो कुटील पिढी म्हणत आहे.

**प्रश्न:५ आज तुम्ही कुटील पिढीला कसे बघता ?**

**उत्तर:** जे लोक येशूला नाकारता व त्याच्या विरोधात कार्य करतात. त्याचा स्विकार करीत नाहीत असे लोक.

**प्रश्न:६ विश्वासणाऱ्यांनी कोणते कार्य करण्याची स्वत:ला तत्पर केले ?**

**उत्तर:** पेत्राच्या संदेशाचा स्विकार केला.आणि त्यांनी बाप्तिस्मा घेतला. प्रेषितांच्या शिक्षणात, सहवासात, भाकर मोडण्यात आणि प्रार्थना करण्यात तत्परता दाखविली.

प्रश्न:७ त्यांच्या भक्तीमय समर्पणातून कोणते आशीर्वाद आले ?

उत्तर: त्यांच्यात अनेक लोकांची भर पडली.त्यांच्यात अनेक चिन्ह चमत्कार घडले. त्यांच्यामध्ये एकता आली. त्यांची ह्रदये एक झाली. स्वर्थीपणाची प्रवृत्ती नष्ट झाली. स्वर्गीय प्रीती आली. एकमेकांच्या गरजा पुर्ण होऊ लागल्या. ते देत गेले , तेवढे त्यांना अधिक मिळत गेले. दररोज एकचित्ताने प्रार्थना करू लागले. दररोज देवाची स्तुती करू लागले. अनेक लोक त्यांना प्रसन्न होत गेले. त्यांचे सर्व काही सामाईक होते. ते नेहमी आनंदी राहत. आणि तारण होत असलेल्या लोकांची दररोज त्यांच्यात भर पडत गेली.

## <u>सहावा दिवस</u> ---

**प्रकरण : २ '' मंडळी जन्माला आली''**

| | | |
|---|---|---|
| **पाठ** | : | अध्याय २ |
| **मुख्यवचन** | : | २:१७ '' देव म्हणतो शेवटच्या दिवसात असे होईल की,मी मनुष्यमात्रावर आपल्या आत्म्याचा वर्षाव करीन तेव्हा तुमचे पुत्र व तुमच्या कन्या संदेश देतील तुमच्या तरूणांस दृष्टांन्त होतील व तुमच्या वृद्धांस स्वप्ने पडतील.'' |
| **विषय वाक्य** | : | पेन्टेकॉस्ट मुडळीच्या प्रारंभाचे चिन्ह होय. |
| **जिवनतत्व** | : | आपण जेव्हा पवित्र आत्म्याला प्रतिसाद देतो तेव्हा आपण बदलतो. |

## <u>अध्याय ३-४</u>

**विषयवाक्य** : पेत्राच्या भाषणामुळे सामर्थ्य, सताव आणि सामुहिक प्रार्थना घडून येते.

### <u>पहीला दिवस</u> ---- प्रे.कृ.३:१-११

**प्रश्न:१ पेत्र व योहान कोठे होते आणि भिकाऱ्याने त्यांच्याकडे कसे पाहीले ?**

**उत्तर:** पेत्र व योहान मंदीरात जात होते. मंदीराजवळ होते. काहीतरी भीक मिळेल या आशेने भिकाऱ्याने त्यांच्याकडे पाहीले.व.३-५

**प्रश्न:२ कोणत्या सामर्थ्याने पेत्राने लंगडया भिकाऱ्याला बरे केले ?**

**उत्तर:** पेत्राने येशूच्या सामर्थ्याने लंगडया भिकाऱ्याला बरे केले. '' नासोरी येशू ख्रिस्ताच्या नावाने चालू लाग'' आणि त्याचा उजवा हात धरून त्याला उठविले. तात्काळ त्याच्या पायात व हातात बळ आले ..व.६-७. देव जे अशक्य ते शक्य करतो. तो उछी मारीत देवाची स्तुती करीत मंदीरात गेला.

**प्रश्न:३ लोकांकडून कोणत्या भिन्न प्रतिक्रिया घडल्या ?**

**उत्तर:** लोक अचंभीत झाले.काय घडले ? कसे घडले ? लोक कुतूहलाने विचारीत होते.ते आश्चर्यचकीत झाले आणि त्याला पाहण्यासाठी शलमोनाच्या देवडीकडे धावत गेले ... व.९-११.

### <u>दुसरा दिवस</u> -- प्रे.कृ.३:१२-२६

**प्रश्न:१ पेत्राने येशूविषयी लोकसमुदायास सांगावयास कोणती संधी निवडली, कोणती वचने दर्शवितात की त्याने सर्व गौरव देवाला दिले ?**

**उत्तर:** जेव्हा सर्व लोक आश्चर्यचकित होऊन कसे घडले हे पाहण्यासाठी शलमोनाच्या देवडी जवळ एकत्र झाले तेव्हा पेत्राने त्यांना सांगण्यासाठभ तीच संधी निवडली. व.१३-१६ ही वचने दर्शवितात की पेत्राने सर्व गौरव देवाला दिले. देवाने त्याला मेलेल्यातून उठविले ह्याचे आम्ही साक्षी आहोत.त्याच्याच नावावरील विश्वासामुळे त्या नावाने ह्या ज्या माणसाला तुम्ही पाहता व ओळखता त्याला शक्तीमान केले आहे.त्याच्याद्वारे असलेल्या विश्वासाने ह्याला तुम्हां सर्वांसमक्ष ही शरीर संपती प्राप्त झाली आहे.

**प्रश्न:२ ३:१६ मध्ये ''त्याच्याच नावावरील विश्वासामुळे'' ह्याचा तुम्हास कोणता अर्थ वाटतो ?**

**उत्तर:** येशूच्या नावावर विश्वास ठेवणे म्हणजे, येशूवर विश्वास ठेवणे आहे. येशूच्या नावावरून येशू कोण आहे हे आपण सांगु शकतो.तो प्रभू व ख्रिस्त आहे(प्रे.कृ.२:३६). त्या लंगडया माणसाला बरे होण्याकरीता दोन गोष्टींची आवश्यकता होती. पहिली येशूचे सामर्थ्य, दुसरी त्या माणसाचा किंवा पेत्राचा विश्वास. कोणत्याही आत्मिक कार्यासाठी येशूचे सामर्थ्य व माणसाचा विश्वास या दोन गोष्टींची आवश्यकता आहे.

**प्रश्न:३ उल्हास आम्हाला कोठे मिळतो ? तुमच्या जीवनात हे सत्य असल्याचे आढळले काय ?**

**उत्तर:** वचन २५ नुसार जुन्या करारात देवाने अब्राहामासोबत करार केला होता. देवाने अबगाहामाला असे वचन दिले होते की, ''तुझ्या संततीद्वारे पुथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादीत होतील'' (उत्पत्ती.२२:१८,२६:४).ती संतती म्हणजे ख्रिस्त ख्रिस्ताद्वारे पुथ्वीवरील सर्व राष्ट्रे यहुदी व परराष्ट्री सर्व आशीर्वादीत होतील. आम्ही त्या कराराचे पुत्र आहोत. म्हणून आम्हाला उल्हास मिळतो. कारण आम्ही ख्रिस्तावर विश्वास ठेवला आहे.

**प्रश्न:४ ह्या वचनानुसार सर्व संदेष्टे केणाविषयी बोलतात ?**

**उत्तर:** सर्व संदेष्टे येशू ख्रिस्ताच्या दिवसाविषयी बोलतात.व.२४. यशया म्हणतो ''ख्रिस्ताने दु:ख सहन करावे. यशया.५३:३-१२ . मोशेने म्हटले ''प्रभू देव तुम्हासाठी माझ्यासारखा संदेष्टा तुमच्या बांधवामधून उभा करील म्हणजे ख्रिस्त अनुवाद.१८:१५,१९ .

**प्रश्न:५ अब्राहाम आणि संदेष्टयांपासून कोणती प्रतिज्ञा किंवा करार आम्हाकरीता वाढविला गेला की,आम्ही आशीर्वादीत होऊन ते पुढे सरकावे ?**

**उत्तर:** अब्राहामासी केलेल्या कराराचे आम्ही पुत्र आहोत. विश्वासाचा उत्पादक जो अब्राहाम त्याची संतती आहोत. म्हणून त्याच्याद्वारे आलेले सर्व आशीर्वाद ख्रिस्ताद्वारे आम्हाकडे येतात. आम्ही ख्रिस्तात आशीर्वादीत होऊन ते आशीर्वाद पुढे सरकवले पाहीजे.

**<u>तिसरा</u> दिवस ---- प्रे.कृ. ४:१-१२ वाचन करा**

**प्रश्न:१ जेव्हा लोकांनी पुनरूत्थानाविषयी ऐकले तेव्हां त्यांनी कशी प्रतिक्रिया व्यक्त केली ?**

**उत्तर:** जेव्हा लोकांनी पुनरूत्थानाविषयी ऐकले तेव्हा पाच हजार लोकांनी विश्वास ठेवला.

**प्रश्न:२ पेत्र आणि योहानाला काय झाले ?**

**उत्तर:** पेत्र व योहान पुनरूत्थानाविषयी लोकांना सांगत होते तेव्हा मंदीराचे सरदार,याजक, आणि सदुकी यांनी त्याना अटक केली.

**प्रश्न:३ पेत्राला बोलण्याचे सामर्थ्य कोठून मिळाले ?**

**उत्तर :** पेत्राला बालण्याचे सामर्थ्य पवित्र आत्म्याकडून मिळाले.

**प्रश्न:४ काय देवाने तुम्हाला तेच सामर्थ्य दिले आहे ? केव्हा आणि कसे ते सांगा ?**

**उत्तर:** तेच सामर्थ्य मला मिळाले आहे. जेव्हा सेवोला सुरवात केली तेव्हा आर,एस,एसच्या लोकांनी फार विरोध केला होता. तेव्हा मी खुप घाबरून गेलो होतो. पण नंतर पवित्र आत्म्याच्या सामर्थ्यांने त्यांच्याशी बोलू लागलो आणि मग नंतर ते काहीही न करता मुकाटयाने निघून गेले.

**<u>चौथा दिवस</u>** प्रे.कृ.४:१-२२ वाचन करा

**प्रश्न:१ पवित्र आत्म्याने भरलेले याचे कोणते परिणाम होते ?**

**उत्तर:** अधिकारी ,वडील,व शास्त्री , प्रमुख याजक हन्न व कयफा, योहान अलेक्सांद्र, प्रमुख याजकाच्या कुळातील या सर्वांच्या समार बोलण्याचे धैर्य आले. ते निरक्षर असूनही साक्षर असल्यासाखे बोलत होते. त्यांच्या हातून चमत्कार घडत होते. त्यांना बोलू नका असे सांगितले असता ते सामर्थ्याने त्यांना म्हणाले ''देवाच्या ऐवजी तुमचे ऐकावे हे देवाच्या दृष्टीने योग्य की अयोग्य आहे हे तुम्हीच ठरवावे.(व.१९ ).

**प्रश्न:२ कोणते वचन प्रगट करते की,जगामध्ये येशू एकमात्र तारणाचा मार्ग आहे ?**

**उत्तर:** ४:१२ हे वचन प्रगट करते की, जगामध्ये येशूच एकमात्र तारणाचा मार्ग आहे. ''आणि तारण दुसऱ्या कोणाकडूनही नाही; कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यामध्ये दिलेले नाही.''

**प्रश्न:३ पुढील लोकांची वागणूक आणि कृत्य ह्यांचे वर्णन करा ?**

**अ) पेत्र आणि योहान. ब) लोंक . क) जे अधिकारी पदावर होते.**

**उत्तर:** **अ)** <u>पेत्र आणि योहान</u> हे आत्म्याने भरलेले होते.ते धैर्याने ख्रिस्ताच्या पुनरूत्थाना बद्दल सांगत होते. त्यांना विरोध होत होता परंतू ते घाबरत नव्हते. ते चौकशीला धैर्याने सामोरे गेले. चौकशीच्या वेळीसुद्धा त्यानी ख्रिस्ताची सुवार्ता गाजकवली. सर्व गौरव त्याने ख्रिस्ताला दिले.अधिकाऱ्यांनी दटावले की शिक्षण देऊ नका तरी ते गप्प राहीले नाही. लंगडया भिकाऱ्याला ख्रिस्ताने बरे केले हे ते लोकांना ठासून सांगत होते.

**ब)** <u>लोंक .</u> लोकांनी वचनावर विश्वास ठेवला. सर्व लोक देवाचे गौरव करीत होते.देवाची स्तुती करीत होते.मंडळीत लोकांची वाढ होत होती.

**क)** <u>जे अधिकारी पदावर होते</u>. ते पेत्र व योहान यांच्या विरोधात उभे होते. त्याने बोलू नये व शिक्षणही देऊ नये अशी त्यांची इच्छा होती. ते त्यांना कैद करून ठेवू पाहत होते.पण लांकांचा वाढता कल आणि त्यांचे धैर्य पाहून तेसुद्धा आश्चर्यचकित झाले होते.आणि बरा झालेला माणूस त्यांच्यासोबत होता म्हणून त्यांना काहीच बालता येत नव्हते.पेत्र व योहान यांना शिक्षा करावयाची होती परंतू लोकांच्या विश्वासामुळे आणि त्यांच्या मध्ये असलेले सामर्थ्य पाहता काहिच करू शकत नव्हते. फक्त ताकदि देऊन सोडून दिले. झालेला चमत्कार सुद्धा नाकारू शकत नव्हते. शेवटी त्यांनी ओळखले की, हे खरोखर येशूच्या सहवासात आहेत.

## <u>पाचवा दिवस</u> --- प्रे.कृ.४:२३-३७

**प्रश्न:१ विश्वासणाऱ्यांनी देवाची स्तुती कशासाठी केली ?**

**उत्तर:** पेत्र व योहान यांची सुटका झाल्यावर ते मंडळीत गेले आणि त्यांना याजक व वडील काय म्हणाले ते सर्व सांगीतले. तेव्हा सर्वजण देवाची स्तुती करू लागले.कारण जे घडले ते घडणारच होते आणि तसेच घडत होते (व.२८) म्हणून ते स्तुती करीत होते.

**प्रश्न:२ या प्रार्थनेत अंगीकार आणि विनंती बघता काय ?**

**उत्तर:** होय! २४-२८ या वचनात अंगीकार आहे. त्यानी देवाचे आभार मानले.त्याची स्तुती केली.स्तोत्र २ मधील दाविदाचे शब्द त्यानी वापरले. हे शब्द त्यांनी का वापरले याचे स्पष्टीकरण त्यांनी २७आणि २८ वचनात दिले आहे.(देवाचा पवित्र सेवक येशू याची रोमी लोक व यहुद्यानी चेष्टड़ केली. हेरोद यहुद्यांचा प्रतिनिधि तर पिलात परराष्ट्रीयांच्या बाजूने होता. पण २८ व्या वचनात शंवट चकित करणारा आहे. काणालाही वाटले असेल की,ते धर्मपुढारी त्याची दुष्ट योजना पुर्ण करू पाहत आहेत.पण येथे म्हटले आहे.'' जे काही घडावे म्हणन तू स्वीस्ते व स्वसंकल्पाने पुर्वी याजीले होते ते त्यानी करावे).

तर २९-३० या वचनात विनंती आहे. तिन विनंत्या आहेत.

**१.** '' तु त्यांच्या धमकावण्याकडे पाहा'' त्या दुष्ट लोकांना देवाने शिक्षा करावी असे ते म्हणत नाहीत. परंतू सर्व काहि त्यांनी देवावर सोपवून दिले.

**२.** '' तु आपल्या दासांना धैर्य दे'' त्यांची सुरक्षा हा महत्वाचा मुद्दा नव्हता. देवाचे वचन सांगण्यासाठी त्यांना र्धर्य हवे होते.

**३.** ''तु आपला हात लांब कर'' सुवार्ता गाजविण्याचे यश, येशूच्या नावाने केलेली चिन्हे व चमत्कार यामध्ये होते. याच प्रकारे प्रेषितांची कामगिरी पार पाडली जावी अशी ते प्रभूला विनंती करीत आहेत.

**प्रश्न:३ देवाने त्यांच्या प्रार्थनेचे उत्तर कसे दिले आहे ?**

**उत्तर:** पवित्र आत्मा अधिक सामर्थ्याने त्यांच्यावर उतरला. जेथे ते एकत्र झाले होते त्या खोलीत भुकंप झाला व ते पवित्र आतम्याने भयन गेले. यावरून आपणांस कळून येते की,विश्वासणारे केवळ एकदाच पवित्र आत्म्याने भरले नाहीत तर त्यांच्या जिवनात अनेकदा पवित्र आत्मा आला(व.८). आपणसुद्धा सतत पवित्र आत्म्याने भरले पाहीजे(इफिस.५:१८). जेव्हा आपण पवित्र आतम्याने भयन जाऊ तेव्हा धैर्याने देवाचे वचन सांगू.

प्रेषितांच्या कृत्यामध्ये अशी बरीच उदाहरणे आहेत की लोक पवित्र आत्म्याने भरले गेले.

**१).** बोलण्यासाठी --- (२:४ ; ४:८). **२).** सेवा करण्यासा--- (६:३).

**३).**मेंढरांची काळजी घेण्यासाठी--(११:२४). **४).**दटावण्यासाठी--(१३:९). **५).**मरण्यासाठी - (७:५५).

**प्रश्न:४ देवाने तुमच्या प्रार्थनेचे उत्तर कसे दिले आहे ?**

**उत्तर:** एक बंधू आजारी होता त्याच्यासाठी प्रार्थना केली देवाने त्याला आरोग्य दिले. एका वाटंगी नावाच्या गावात अनेक लोकांनी विरोध केला होता. प्रार्थना बंद केली होती आणि गावात यायचे नाही असे सांगितले . पण आम्ही मंडळी मिळून प्रार्थना करीत होतो. काहि दिवसानी ज्या लोकांनी विरोध केला होता त्याच लोकांनी प्रार्थना सुरू करण्यास सांगितले . आमच्या प्रार्थनेचे उत्तर मिळाले.

**प्रश्न:५ येशूच्या नावावर विश्वास केल्याने आरोग्य मिळते यावर तुमचा विश्वास आहे काय ?**

**उत्तर:** येशूच्या नावावर विश्वास ठेवल्याने प्रथम तारण प्राप्त होते. आणि आरोग्य पण मिळते.कारण लंगडया भिकाऱ्याला येशूच्या ख्रिस्ताच्या नावावरील विश्वासाने आरोग्य मिळाले.

## <u>सहावा दिवस</u>

**प्रकरण ३ :** '' धैर्यासाठी मंडळी प्रार्थना करते ''

| | | |
|---|---|---|
| **पाठ** | : | अध्याय ३ आणि ४ |
| **मुख्यवचन** | : | प्रेषित ४:१२ '' आणि तारण दुसऱ्या कोणाकडून नाही; कारण जेणेकरून आपले तारण होईल असे दुसरे कोणतेही नाव आकाशाखाली मनुष्यामध्ये दिलेले नाही'' |
| **विषय वाक्य** | : | पेत्राच्या भाषणाने सताव,सामर्थ्य आणि सामुहीक प्रार्थना घडून येते. |
| **जिवन तत्व** | : | पवित्र आत्म्याद्वारे मिळालेल्या धाडसाने तुमच्या बोलण्यावर,मैत्रीवर, प्रार्थनेवर आणि भैतिक संपत्तीवर आणि आपल्या वागणुकीवर प्रभाव पडतो. |

**विषय वाक्य** : आंतरीक आणि बाहेरील परिक्षेच्याद्वारे मंडळीची पारख होते.

## <u>पहिला दिवस</u> ---- प्रेषित ५:१-१६

**प्रश्न:१ हनन्याने काय केले ?त्याची पत्नी कबूल झाली काय ?**

**उत्तर:** हनन्याने आपले शेत विकून काही पैसा मागे ठेवला व जमा केलेला पैसा हिच शेतीची पुर्ण किंमत आहे असे सांगितले.खोटे बालने हे त्याचे पाप होते. त्यांना जो काहि पैसा हव होता तो मागे ठेवध्याचा अधिकार होता त्यात त्याचे काही चुकीचे नव्हते. तो सर्व पैसा सामाईक निधीत दिलाच पाहीजे अशी काही जबरदस्ती नव्हती.ते त्या संबधी खोटे बोलले हीच त्यांची चुक होती. त्याच्या पत्नीने पण तेच केले. तीने पण चुक कबूल केली नाही.कारण दोघानीही संगनमताने पाप केले होते.

**प्रश्न:२ कोणती वचने सांगतात की हनन्या सप्पीराने पवित्र आत्म्याशी लबाडी केली ?**

**उत्तर:** वचन ५ आणि १० ही वचने सांगतात की या दोघानिही पवित्र आत्म्याशी लबाडी केली.

**प्रश्न:३ योहान१५:२६-२७ मध्ये पवित्र आत्म्यास काय म्हटले आहे ?**

**उत्तर:** पवित्र आत्मा हा **सत्याचा** आत्मा आहे. आणि तो येशू विषयी साक्ष देतो.

**प्रश्न:४ ह्या अनुभवातून आपण देवाविषयी काय शिकू शकतो ?**

**उत्तर :** देव सत्य आहे आणि त्याचा सत्याचा आत्मा आपल्यामध्ये वास करतो. आपण पवित्र आत्म्याशी कधीच लबाडी करु शकत नाही. यातुन एक गोष्ट महत्वाची आहे ती म्हणजे , कळत असून देवाच्याविरूद्ध पाप करणे ही भयंकर बाब आहे (''कारण सत्याचे ज्ञान मिळाल्यावर आपण बुद्धिपरस्पर पाप केले तर पापाबद्दल ह्यापुढे यज्ञ व्हायचा राहिला नाही ''-- इब्री.१०:२६-२७). हे शिकू शकतो की, देवाला मी फसविण्याचा प्रयत्न केला आहे काय? अशा प्रकारेच देव माझा न्याय करील काय ? होय ('' तथापि देवाने घातलेला स्थिर पाया टिकून राहतो, त्यावर हा शिक्का मारलेला आहे' प्रभू जे आपले आहेत त्यांना ओळखतो, आणि जो कोणी प्रभूचे नाव घेतो त्याने अनितीपासून दूर रहावे''--- २तिमथ्य.२:१९).

**प्रश्न:५ वचन १२-१६ मध्ये आपण अनेक चमत्कारा विषयी वाचतो जे लोकांमध्ये घडत होते. आज कोणत्या प्रकारचे आश्चर्यकर्म घडत आहेत आणि त्याचा परिणाम काय ?**

**उत्तर:** आज सुद्धा लोकांमध्ये आश्चर्यकर्म घडत आहेत. लोक आजारातून बरे होत आहेत. त्यांना चांगले आरोग्य मिळत आहे. पण त्याचा फारसा चांगला परिणाम दिसत नाही. कारण लोक फक्त आरोग्य प्राप्त करून घेण्यासाठी येतात आणि आरोग्य मिळाल्यावर पुन्हा परत जातात.

## <u>दुसरा दिवस</u> --- प्रेषित ५:१७-४२

**प्रश्न:१ धार्मिक अधिकाऱ्यांमध्ये कोणती वागणूक तुम्ही बघता ?**

**उत्तर:** धार्मिक पुढारी मत्सराने भरलेले आहेत. त्यांनी प्रेषितांना अटक करून तुरूंगात टाकले. त्यांना जिवे मारण्याचा विचार करीत होते. त्यांच्यामध्ये भिती होती की सर्व लोक त्यांच्याकडे वळतील.

**प्रश्न:२ प्रेषित ख्रिस्ताबद्दल आपली प्रीती आणि प्रामाणीकपणा कसा सादर करतात ?**

**उत्तर:** प्रेषितांना कडवा विरोध होत असताना देखील ते खचून जात नव्हते. जेव्हा देवाने त्यांना तुरुगांतून बाहेर काढले आणि घरी जा आणि लपून बसा असे सांगितले नाही. तर त्यांना '' मंदीरात जा व शिकवण सुरू ठेवा. आणि जीवनाचा संदेश लोकांना सांगा'' असे सांगितले. त्यानी या अशा कठीण प्रसंगी सुद्धा न घाबरता देवाच्या आज्ञेचे पालन केले.

त्याने याजकांना सांगितले की, आम्ही मनुष्यापेक्षा देवाची आज्ञा मानली पाहीजे. कठीण परिस्थितीत सुद्धा प्रेषित देवाच्या आज्ञेचे पालन करीत होते. यामध्ये त्यांची ख्रिस्ताबद्दलची प्रीती आणि प्रामाणिकपणा दिसून येतो.

**प्रश्न:३  यहुदी व्यवस्थेचे पालन करण्यापेक्षा प्रेषितांना येशू विषयी साक्षीदार होणे अधिक महत्वाचे का वाटते? (५:३०-३२)**

**उत्तर:** कारण याच यहुद्यानी येशूला खांबावर खिळून मारले होते पण देवाने येशूला मेलेल्यातून उठविले.आणि आपल्या उजव्या हाताशी उच्चपद दिले आहे.  याचे ते साक्षीदार आहेत. आणि आज्ञा पाळणाऱ्यांना पवित्र आत्मा दिला तोही साक्षी आहे. म्हणून प्रेषितांना येशू विषयी साक्षीदार होणे महत्वाचे वाटते.

**प्रश्न:४  विरोधाविषयी ही वचने काय सांगतात ?  अ) फिलीप. १:२९   ब) २तिमथ्य.३:१२**

**उत्तर:** अ) फिलीप. १:२९ :--   ख्रिस्तावर विश्वास ठेवणे इतकेच नाही तर , ख्रिस्तासाठी दु:ख सहन करणे हितकारक आहे. कारण दु:ख सहन करण्याकरीताच कृपा झाली आहे.

ब) २तिमथ्य.३:१२ :-- ख्रिस्तामध्ये सुभक्तीने आयुष्यक्रमण करणाऱ्या सर्वांचा छळ होईल.

**प्रश्न:५ वचन ४१ आणि ४२ मध्ये प्रेषितांची वागणूक कशी होती ?**

**उत्तर:** त्यांना मारहान झाली पण त्याचे दोन अनपेक्षीत परिणाम झाले.

१. ज्या नावामुळे त्यांना दु:ख भोगावे लागले त्याचा त्यांना फार **आनंद** झाला.

२. ते अधिक उत्साही झाले. दररोज मंदीरात व घरोघरी जाऊन येशू हाच ख्रिस्त आहे हे **ते धैर्याने शिकवू** लागले.

## <u>तिसरा दिवस</u>  --- प्रेषित  ६:१-१०

**प्रश्न :१ कोणती समस्या उद्‌भवली आणि ती कशी सोडविण्यात आली ?**

**उत्तर:** सैतानाला बाहेरील हल्ले करुन यश आले नाही,तर तो आतून पोखरण्यास सुरवात करतो.तेच या वचनात सांगितले आहे.

त्या दिवसात मंडळीची संख्या वाढत होती. आणि त्या काळी गरीब विधवाना मदत पुरविली जात होती. कारण त्यांना दुसरा आधार नव्हता. काही हेल्लेणी यहुदी होते. त्यांनी कूरकूर केली की त्यांच्यातील विधवांकडे  नीट लक्ष दिले जात नाही, फक्त इब्री विधवाना मात्र सर्व पुरविले जाते.

**Imp** त्या वेळी प्रेषित जे मंडळीत गरजू लोक आहेत त्यांना दररोज भोजन पुरवीत होते. सांगायचे म्हटल्यास अनेक विश्वासणाऱ्यांनी आपली मालमत्ता विकून तो पैसा प्रेषितांना दिला होता, यासाठी की, जे गरजवंत असत त्यांना लाभ व्हावा.त्या पैशाच्याद्वारे नेहमी विंधवाना मदत केली जात असे(४:३४-३५). प्रेषित इतर कार्यात व्यस्त असल्यामुळे भोजन सर्वांना व्यवस्थित वाटले जाते की नाही हे पाहण्यास वेळ मिळत नसे.

पहिल्या मंडळीत किती लवकर तक्रार व दुफळी माजली हे लक्षात घ्या. सर्वात पहीला तंटा जो उद्‌भवला तो पैशासंबधीचा होता. मंडळीचा पैसा कसा खर्च होतो व भोजन कसे पुरविले जाते ही समस्या होती. जरी शिष्यांच्या संख्येत वाढ होत होती तरी सैतान विभाजन करणे , असंतोष व द्वेष पसरवित होता.

व्यवहार सांभाळताना देवाचे वचन सांगण्यास कुचराई होऊ नये यासाठी प्रेषितांनी देवभिरू असे सात जण निवडले आणि त्यांना भोजन वाटून देण्याकरीता नियुक्त केले. निवड करताना त्यांने त्यांच्या पात्रते प्रमाणे निवड केली.

चांगली प्रतिष्ठा ------------ (प्रतिष्ठित)

पवित्र आत्म्याने परिपुर्ण ------ (आत्मिक)

ज्ञानाने परिपुर्ण  ------------ (व्यवहारिक).  १तिमथ्य ३:८-१३ मध्ये त्यांच्या पात्रतेविषयी अधिक सांगितले आहे. आणि अशा प्रकारे ती समस्या सोडविली.

**प्रश्न :२ मंडळीच्या पहिल्या सेवकांचे गुणवैशिष्टे स्पस्ट करा ?**

**उत्तर:** ते सर्वांची व्यवस्थितपणे काळजी घेत होते. आलेल्या समस्यांचा सामना करण्यासाठी एकत्रीत मिळून निर्णय घेत असत. कोणताही गो।धळ होऊ नये म्हणून आपआपल्या जबाबदाऱ्या योग्य पद्दतीने पार पाडत. वचनाच्या सेवेसाठी म्हणजेच सुवार्ता सांगण्यासाठी कोणताच अडथळा येवू नये याची ते दक्षता घेत असत. अशा प्रकारे ते प्र्रार्थनेत आणि वचनाच्या सेवेत तत्पर असत.

**प्रश्न:३  स्तेफनाच्या चारित्र्य गुणवैशिष्टयांची यादी बनवा ?**

**उत्तर:** स्तेफन हा प्रेषित नव्हता, पण त्याच्या हातुन अद्‌भूतकृत्ये व चिन्हे घडत होती.

तो विश्वास आणि पवित्र आत्म्याने भरलेला व्यक्ती होता.   देवाची कृपा व सामर्थ्याने परिपुर्ण भरलेलो असा होता.

तो ज्ञानाने व आत्म्याने बोलत होता.   तो न घाबरता धैर्याने बोलत होता.   तो नियमशास्त्राला धरून बोलत असे.

**प्रश्न:४ तुम्हास कोणते गुण धारण करणेस आवडेल ?**
**उत्तर:** देवाच्या ज्ञानाने आणि पवित्रआत्म्याच्या सामर्थ्याने भरण्यास आवडेल.

## <u>चौथा दिवस</u> ---- प्रे.कृ.६:११-१५ वाचन करा

**प्रश्न:१ स्तेफनाविरुद्ध लोकांनी कोणते आरोप आणले ?**
**उत्तर:** स्तेफन मोशेविरुद्ध व देवाविरुद्ध दुर्भाषण करतो आणि मंदीराविरुद्ध व नियमशास्त्राविरुद्ध बोलतो असा त्याच्यावर आरोप केला .

**प्रश्न:२ अशा परिस्थितीविषयी आपले उत्तर ह्या विषयी लुक.१२:११ आणि मत्तय.१०:१९-२० काय सांगते ?**
**उत्तर:** ‘‘ जेव्हा तुम्हांस सभा,सरकार व अधीकारी ह्यांच्यासमोर नेतील तेव्हा कसे काय उत्तर द्यावे किंवा काय बोलावे ह्या विषयी काळजी करू नका, कारण तुम्ही काय बोलावे हे त्याच घटकेस तुम्हाला सुचविले जाईल. कारण बोलणारे तुम्ही नाही ,तर तुमच्या पित्याचा आत्मा हाच तुमच्याठायी बोलणारा आहे.

**प्रश्न:३ स्तेफनाचा चेहरा स्वर्गदुतांसमान तेजाने का भरला असावा ?**
**उत्तर:** कारण तो पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने भरलेला होता. त्याला शिक्षेचे कोणतेच भय नव्हते. तो पुर्णपणे प्रभला समर्पित होता. पवित्र आत्म्याने त्याला धर्य व सामर्थ्य पुरविले होते.

## <u>पाचवा दिवस</u> --- प्रेषित **अध्याय. ७** वाचन करा

**प्रश्न: स्तेफनाने दिलेल्या पुढील वचनातील महत्वाच्या विचारांची यादी बनवा ?**
**अ) प्रे.कृ.७:१-३८ , -- ब) प्रे.कृ.७:३९-५० , -- क) प्रे.कृ.७:५१-५३.**
**उत्तर:**

**अ) प्रे.कृ.७:१-३८** --- स्तेफन त्याचा बचाव करावा म्हणून बोलला पाही पण ख्रिस्ताच्या शुभवर्तमानाला वाचविण्यासाठी तो बोलला. त्याने नविन ख्रिस्ती धर्म ज्याचा विरोध यहुदी करीत होते त्याची बाजू घेतली.

स्तेफन म्हणतो की, देवाचा उद्देश हा नव्हता की, त्याने एकाच प्रकारच्या लोकांमध्ये व एकाच देशात राहावे किंवा एकाच मंदीरात राहावे. देवाचे खरे लोक जे खऱ्या रितीने येशूख्रिस्तावर विश्वास ठेवतात ते कोणताही वंश व कोणत्याही देशातले असू शकतात. हे दाखविण्यासाठी स्तेफन या अध्यायात यहुदी लोक अब्राहामासोबत कशी सुरवात करतात त्याचा सविस्तर इतिहास सांगत आहे. **अब्राहाम हा पहीला यहुदी होता व तो ख्रिस्तापर्यंत आला**. स्तेफनाने यहुदी ग्रंथातून(जुन्याकरारातून) हे दाखवून दिले की, नविन ख्रिस्ती धर्म आता देवाचा खरा धर्म आहे.

अब्राहाम ते मोशे पर्यंतचा इतिहास आहे. अब्राहाम हा **<u>पहिला यहुदी</u>** होता. मेसोपटेम्या देशात राहत होत. त्याला खाद्याचा देशसुद्धा म्हणतात. आताचा तो ‘मध्यपुर्व देश इराक आहे. जेव्हा अबाहाम राहत होता तेव्हा देव त्याच्याशी बोलला. ‘‘तु आपला देश व आपले नातलग सोडून मी तुला दाखविन त्या देशात चल’’. या देवाच्या वचनाला अनुसरून अब्राहामाने तो देश सोडला. त्याने आज्ञापालनाचे उदाहरण दिले(इब्री.११:८).

अबाहाम पहिल्यांदा हारान येथे गेला. आज हे ठिकाण इस्त्राएलच्या उत्तरेला तुर्की देशात आहे. अब्राहाम हारानात काही वर्षे राहीला. मग देव बोलला’ ‘‘ तुझा देश सोड.... मी दाखविन त्या देशात जा’’ (उत्पत्ती.१२:१). अब्राहामाने हारान सोडले व कनान देशाकडे निघाला(उत्पत्ती.१२:४-५) ते म्हणजे इस्त्राएल. देवाने त्याला तेथून काढून तुम्ही राहता त्या देशात आणले असे स्तेफन म्हणतो(व.४)मध्ये.

वचन ५ मध्ये म्हणतो की, हा देश देवाने अब्राहामाला व त्याच्या संततीला दिला (उत्पत्ती.१७:८). परंतू स्वत:हा अब्राहामाने त्या भुमिचा ताबा घेतला नाही. पाऊलभर जमीन सुद्धा त्याने घेली नाही. त्याचे खरे निवासस्थन म्हणजे स्वर्ग होते(इब्री.११:९-१०). जेव्हा देवाने त्याला हे अभिवचन दिले तेव्हा तो म्हातारा होता, त्याला लेकरे नव्हती. तरी पण त्याने देवाच्या वचनावर विश्वास ठेवला.

अब्राहामाची संतती परदेशात(मिसरात) चारशे वर्षे दास्य बनून राहतील. देव मिसराला शिक्षा करील व यहुद्यांना पुन्हा कनान देशात आणील(उत्पत्ती.१५:१३-१६ ; निर्गम.१२:२९-३६). आणि पुन्हा या ठिकाणी माझी सेवा करतील. नंतर देवाने अबाहामाशी सुतेचा करार केला (उत्पत्ती.१७:१०-१३). करार केला तो हा ‘‘ मी तुजपासून मोठे राष्ट्र निर्माण करीन,तुझ्याद्धारे पृथ्वीवरील सर्व कुळे आशीर्वादीत होतील’’ ....‘‘तू राष्ट्रसमुहाचा जनक होणार मी तुजपासून राष्ट्रे निर्माण करीन, तुजपासून राजे उत्पन्न करीन (उत्पत्ती.१२:२-३ ; १७:४-६). हा करार झाल्यानंतर अबाहामाला इसहाक,याकोब व बारा कुलापतींचा जन्म(व.८). वचन १-८ पर्यंत योसेफापर्यतचा इतिहास येथे आहे.

वचन ९ नंतर योसेफापासून इतिहास सुरू होतो. जुन्या करारात असलेल्या ख्रिस्ताच्या पुर्वछायेपैकी योसेफ अधिक स्पष्ट आहे. अर्थात त्याच्या बद्दल असे म्हटलेले नाही. तरी स्टेफन त्याच्या बद्दल सांगत होता तेव्हा यहुद्यांना बाण टोचल्या सारखे वाटत होते. कारण त्यांनी येशूचेही तसेच हाल केले होते.

- योसेफाचे भाऊ त्याला मिसर देशात विकतात(व.९).
- तोच नाकारलेला योसेफ मिसराचा अधिपती होतो(व.१०).
- दुष्काळामुळे योसेफाचे भाऊ मिसर देशात येतात, पण त्याला ओळखत नाहीत(व.११-१२).
- दुसऱ्या भेटीच्या वेळी योसेफ त्यांना ओळख देतो. मग ज्याला नाकारले होते तोच त्यांचा कुटूबांचा तारणारा होतो(व.१३-१४).
- कुलाधीपतीचे निधन व कनान देशात त्यांना पुरणे (व.१५-१६).
- मिसर देशात याकोबाच्या कुटुबांची वाढ व योसेफाच्या निधनानंतर आलेले दास्य (व.१७-१९).

येथून पुढे स्तेफनाच्या भाषणाची दुसरी पायरी येते -- मोशेला त्याच्या लोकांनी दिलेली वागणूक. ज्या तारणाऱ्याला देवाने मरणातून उठविले त्याचा त्यानी दोनदा नकार केला हे स्तेफन सांगतो त्याचा दुसरा पुरावा म्हणजे मोशे आहे.

**मोशे विरूद्ध दुर्भाषण केल्याचा आरोप स्तेफनाावर ठेवण्यात आला होता(व.६:११)मध्ये.**

या ठिकाणी इस्त्राएल राष्ट्र दोषी आहे हे तो सिद्ध करतो -- देवाच्या आवडीच्या मनुष्याचा नाकार केलेल्याचा दोष त्या राष्ट्रावर आहे.

स्तेफन माशेच्या जीवनाचा आढावा घेवून सांगतो.

- जन्मा आधीचे जीवन आणि मिसर देशातील शिक्षण(व.२०-२२).
- एका मिसरी मनूष्याच्या हल्यापासून त्याने एका इब्री मनुष्याला वाचविले होते,तेव्हा **पहिल्यांदा त्याच्या भावानी त्याला नाकारले** होते(व.२३-२८).
- तो मिषन देशात उपरी म्हणून राहील(व.२९).
- जळत्या झुडपात त्याला देवाचे दर्शन होते,देव त्याला त्याच्या बांधवाना मिसरी दास्यातून सोडविण्यासाठभ मिसरास पाठवतो(व.३०-३५)त्र
- तो राष्ट्रोचा मुक्तीदाता ठरतो(व.३६).
- येणाऱ्या ख्रिस्ताविषयी त्याची भविष्यवाणी (व.३७).
- अरण्यात त्यांना नियमशास्त्र देण्याची त्याची भुमिका(३८).

**ब) प्रे.कृ.७:३९-५०**

- लोकांनी **मोशेला दुसऱ्यांदा नाकारले** आणि सोन्याच्या वासराची मुर्ती बनवून तिच्यापुढे यज्ञ करून हाताच्या कृतीबद्दल आनंदोत्सव केला(व.३९-४१).
- देवाला यज्ञार्पण करायचे म्हणत त्यानी मोलख देवतेची पुजा केली.(मोलख म्हणजे प्राचीन दळभद्री मुर्ती) रेफान ही सुद्धा गलिच्छ मुर्ती होती. देवाने त्यांना म्हटले की, बाबेलच्या बंदीवासात त्यांना जावे लागेल.येथे स्टेफन आमोस मधील ५:२५-२७ या वचनाची आठवण करतो(व.४२-४३).

आपण या ठिकाणी इतिहासाची पुनरावृत्ती होते हे पाहतो. प्रत्येक पिढीत तेच घडते. लोक तेच असतात. देवाचा सेदेश येतो,तो त्यांना कळत नाही(२५).शांतीने राहा म्हटलेले त्यांना आवडत नाही(२७). देव मुक्तीदाता पाठवितो त्याला ते नाकारतात(३९). वाईटापासून सोडविले तरी देवा पेक्षा ते मुर्तीला मान देतात(४१).मनुष्य स्वभाव असा आहे-- बंडखेर,कृतघ्न,मुर्ख पण देव तोच आहे. मोशेबरोबर बोललेला देव त्यांच्या पुर्वजांशीही बोलला होता(३२). लोक संकटात असले म्हणजे देव त्यांचे ऐकतो(३४).तो सोडविण्यासाठभ येतो(३४).तो त्यांच्या लोकांना मृत्यूकडून जिवनाकडे नेतो(३६). त्याला नाकारणाऱ्यांना तो त्यांच्या इच्छेवर सोपवितो(४२). असा हा आपला देव थोर ,दयाळू, सामर्थ्यवान आहे.काहीही झाले तरी तो सदासर्वकाळ सारखाच आहे(मलाखी.३:६). स्तेफनाचे भाषण ऐकणाऱ्यांना देव काही मामुली नाही हे ध्यानात यावयास होते. ती त्यांना ताकीद होती. देवाचे अभिवचन निरंतर राहते.

**मंदीराविरूद्ध दुर्भाषण केल्याचा आरोप स्तेफनावर होता.**

(व.४४-४६) तो आता इस्त्राएल लोक अरण्यात भटकत असताना पुर्वजानी केलेल्या मंडपासंबधी सांगतो. त्या वेळी ते स्वर्गातील देवदुतांची पुजा करीत होते. यहोशवाने त्यांना कनान देशात आणले तेथील उपऱ्यांना घालवून दिले. तेव्हा तेथे मंडप उभारला व दाविदाच्या दिवासापर्यंत उपासना होत गेली. याकोबाच्या देवासाठी मंदीर बांधण्यास सांगण्यात आले.

(**व.४७-५०**) देवासाठी दाविदाला मंदीर बांधण्यास बंदी केली.पण शलमोनाने ते बांधले.
मंदीर देवाचे निवासस्थान होते, पण देव त्या इमारतीत बंदिस्त होत नाही,जेव्हा मंदीराचे समर्पण केले तेव्हा शलमोनाने ते स्पष्ट केले(१राजे ८:२७). यशयाने म्हटले मेदीा देवासाठी फार महत्वाचे नाही,पण मनुष्याचे नितिमान जीवन त्याला हवे असते(यशया. ६६:१-२).
**क) प्रे.कृ.७:५१-५३ -- स्तेफनावर नियमशास्त्राविरुद्ध दुर्भाषण केले असा आरोप होता.** त्याचे खंडण तो शांतपणे करतो.

ते लोक ताट मानेचे, हृदयाची सुंता न झालेले होते.तो त्यांना रागावतो. इस्त्राएलाच्या देवाप्रमाणे नव्हे तर ते लोक हृदयाची, कानाची सुंता न झालेले असे म्हणतो.त्यांच्या पुर्वजा प्रमाणे पवित्र आतम्याला सर्वदा विरोध करणारे आहेत. ‘‘ येशू येणार हे सांगणाऱ्या संदेष्टयांना त्यांच्या पुर्वजानी मारून टाकले. आता त्याने त्या नितिमान पुरुषाला खिळून जिवे मारले. या लोकांनी नियम पाळला नाही. तो म्हणतो देवदुतांच्या मार्गदर्शनानुसार त्यांना ते दिले होते. असे म्हणतो कारण ‘‘जेव्हा सिनाय पर्वतार मोशेला आज्ञा दिल्या तेव्हा तेथे अनेक देवदुत उपस्थित होते (अनुवाद.३३:२, गलती.३:१९, इब्री.२:२).

**प्रश्न:२ देवाने स्तेफनाचे सांत्वन कसे केले ?**
**उत्तर:** देवाने आपले तेज त्याला दाखविले. ‘‘ आकाश उघडलेले आणि ख्रिस्ताला देवाच्या उजव्या बाजूला उभे असलेले त्याने पाहीले’’(व.५५-५६).

**प्रश्न: ३ ज्यानी त्याजवर दगडफेक केली त्याचे वस्त्र कोणाजवळ होते ?**
**उत्तर:** शौल नावाचा तरूण जो नंतर पौल झाला त्याच्या जवळ त्यांची वस्त्रे होती.

**प्रश्न:४ प्रे.कृ.७:५९ मध्ये कोणा जवळ स्तेफनाने प्रार्थना केली ?**
**उत्तर:** स्तेफनाचा मृत्यू आपल्या प्रभुसारखा होता. त्याने प्रभू येशू ख्रिस्तचे अनुकरण केले. प्रभू वधस्तंभावर असताना ज्यानी त्याला खिळले त्यांच्यासाठी प्रार्थना करीत होता. ‘‘ हे बापा त्यांना क्षमा कर कारण ते काय करतात हे त्यांना समजत नाहि(लुक.२३:३४). तशाच प्रकारे स्तेफनाने सुद्धा प्रभू येशू जवळ प्रार्थना केली.

## सहावा दिवस

**प्रकरण : ४ ---- वाढत जाणारे दु:ख**

| | |
|---|---|
| **पाठ** | : अध्याय. ५-७ |
| **मुख्य वचन** | : प्रे.कृ. ५:२९ ‘‘ आम्ही मनुष्यापेक्षा देवाची आज्ञा मानली पाहीजे’’ |
| **विषय वाक्य** | : आंतरीक आणि बाहेरील परिक्षेच्याद्वारे मंडळीची पारख होते. |
| **जिवनतत्व** | : आध्यात्मिक विरोधामुळे फळ उत्पन्न होते.त्याचे सामर्थ्य आमच्यामध्ये वाढते आणि आपली आध्यात्मिक मुळे अधिक मजबूत होतात. |

**प्रकरण पाच** : अध्याय --८-९

**विषयवाक्य** : स्तेफनाच्या मृत्यूने मोठ्या छळाची सुरवात झाली आणि सुवार्ता चारीबाजूला पसरली.

**<u>पहीला दिवस</u>** :-- प्रे.कृ. ८:१-८ वाचन करा

**प्रश्न:१ स्तेफनास दगडानी ठेचून मारल्यानंतर वाढलेल्या सताव कार्यामुळे कोणता चांगला परिणाम समोर आला ?**

**उत्तर:** ख्रिस्ती लोकांची पांगापांग झाली, पण साक्ष देणे थांबले नाही.ते जेथे तेथे गेले तेथे त्यानी सुवार्ता सांगितली.फिलीप उत्तरेकडे शोमरोन येथे गेला.त्याने केवळ ख्रिस्त गाजविला नाही तर चमत्कारही केले. अशुद्ध आत्मे घालवून दिले. पुष्कळ पक्षघाती व पांगळी माणसे त्याने बरी केली. लोकांनी सुवार्तेकडे लक्ष दिले. त्यामुळे सर्वत्र आनंद झाला.

ती मंडळी ख्रिस्ताप्रमाणे बाहेर पडली (योहान.२०:२१ ; प्रे.कृ.८:१-४).
तिने आपली मालमत्ता विकून गरीबांस मदत केली (लुक.१२:३३; १८:२२; प्रे.कृ.२:४५; ४:३४).
तिने आई-बाप घरदार,जमिनी सोडून वचन गाजवित फिरू लागली (मत्तय.१०:३७; प्रे.कृ. ८:१-४).
तिने शिष्य तयार केले. त्यांना आज्ञापालन शिकविले (मत्तय.२८:१८-१९; १थेस्सल.१:६).
तिने आपला वधस्तंभ उचलून ख्रिस्ताला अनुसरले (प्रे.कृ.४; १थैस्सल.२).
तिने छळात व क्लेशात आनंद मानला (मत्तय.५:११-१२;प्रे.कृ.१६;१थेस्सल.१:६-८).
तिने आपले मेलेले मेलेल्यांस पुरू दिले व सुवार्ता सांगू लागले(लुक.९:५९,६०).
तिला जेथे नाकारले तेथे पायधूळ झटकून ती पुढे गेली (लुक.९:५;प्रे.कृ.१३:५१).
तिने रोग बरे केले,भुते काढली, मृतांना जीवंत केले व टिकणारे फळ दिले (मार्क.१६:१८; प्रे.कृ.३:१६).

**प्रश्न:२ इतरांनी ''शोमरोन'' मध्ये जे पेरले त्याची ''कापणी'' फिलीप कशी करीत होता असे तुम्हाला वाटते ? (योहान.४:३९-४२).**

**उत्तर:** शमरोनी स्त्रीने सर्वांना जी सवार्ता सांगितली आणि अनेक लोकांनी विश्वास ठेवला होता त्यामुळे त्या ठिकाणी अनेक लोक विश्वासू होते. जेव्हा फिलीप शमरोनात गेला तेव्हा त्याला त्या ठिकाणी अटकाव झाला नाही उलट तेथील लोकांनी आणि तेथे असलेला शिमोन जादूगर यानीसुद्धा विश्वास ठेवला. आणि ते फिलीपाच्या मागे चालू लागले.

**प्रश्न:३ कोणत्या हालचाली द्वारे देव तुम्हाला त्या लोकांकडे नेत आहे.जे तुमच्या संकृतीपेक्षा भिन्न आहेत ?**

**उत्तर:** ------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------

**<u>दुसरा दिवस</u>--** प्रे.कृ.८:९-४० वाचन करा

**प्रश्न:१ विश्वासणारे इतरत्र पांगले तेव्हा त्यानी काय केले ?**

**उत्तर:** त्यांची पांगापांग झाली तेव्हा ते घाबरून आपआपल्या घरी गेले नाहीत तर चोहोकडे जाऊ सुवार्ता सांगू लागले. फिलीप शमरोनात गेला. तेथे त्यांनी सुवार्ता सांगून बाप्तीस्मा दिला. नंतर पेत्र व योहान यानी तेथे जाऊन त्यांना पवित्रआत्म्याचा बाप्तिस्मा मिळावा यासाठी प्रार्थना केली. त्यांचा पवित्रआत्म्याने बाप्तिस्मा झाला.

शिमोन जादूगर जो शमरोनी लोकांना आपल्या काळया जादुने फसवित होता.त्याची काळी कृत्ये बंद पाडली. हबशी षंढाचे फिलीप्पाच्याद्वारे तारण व बाप्तिस्मा झाला. षंढ इथियोपिया येथे गेला. तेथे येशूच्या तारणाच्या सामर्थ्याची साक्ष देऊ लागला. नंतर फिलिपाने कैसरीया पर्यंत सुवार्ता सांगितली.

**प्रश्न:२ तुम्ही तुमच्या विश्वासबद्दल सांगितले आहे काय आणि त्यामुळे विरोधाचा सामना केला आहे काय?**

**उत्तर:** होय मी विश्वासाबद्दल सांगितले आहे आणि मला विरोधाचा सामना करावा लागला आहे. उदाहरण अंबोली गावामध्ये विरोधाचा सामना करावा लागला.

**प्रश्न :३ फिलीप्पाने स्वत:ला कोठे पाहीले आणि षंढाची आध्यात्मिक अवस्था काय होती ?**

**उत्तर:** फिलीप्प शोमरोनातून यरुशलेमेस गेला तेथून गज्जा येथे गेला. ती वाट ओसाड होती. **आत्मिक संपन्नतेकडून ओसाड ठिकाणी गेला**. देवदुताने त्याला षंढाकडे जाण्यासाठी मार्गदर्शन केले पण सुवार्ता सांगितली नाही. कारण सुवार्ता सांगण्याचे हक्क मनुष्यांना दिले आहे.

शमरोनात अनेक लोक होते परंतू त्याला ते ठिकाण सोडावे लागले आणि एकाच मनुष्यासाठी सेवाकार्य करावे लागले. उत्तरेकडून तो दक्षिणेकडे गज्जाच्या वाटेवर आला. ती ओसाड होती. त्या वाटेवर त्याने एक रथ पाहीला आणि त्या रथात एक कुशी षंढ बसला होता.(तो त्या लोकांची राणी कांदके हिचा मोठा अधिकारी होता. कुश हे मिसरच्या दक्षिणेस होते. तो षंढ उपासनेसाठी यरुशलेमेस गेला होता). रथात बसून तो यशया संदेष्टयाचा ग्रंथ वाचत होता. परंतू त्याला समजत नव्हते.(व.३०-३४).तो आध्यात्मिक होता परंतू त्याला वचनाचे अर्थ समजत नव्हते. परंतू फिलीप्पाने त्याला सुवार्ता समजावून सागिंतली(व.३५-३९).

**प्रश्न:४ यशया. ५३:३-६ वाचा आणि आमचे आम्ही ह्या शब्दाऐवजी आपले नाव टाका ?**

**उत्तर:** ‘‘तुच्छ मानलेला, मनुष्याने टाकलेला,क्लेशानी व्यापलेला व व्याधीशी परिचित असलेला असा तो पुरुष पाहून लोक तोंडे फिरवित , व त्याला तुच्छ लेखीत; आणि त्याला **मी** मानले नाही. खरोखर **माझे** व्याधी त्याने आपल्यावर घेतले, **माझे** क्लेश त्याने वाहिले, तरी त्यास ताडण केलेले , देवाने त्यावर प्रहार केलेले,व त्याला पीढीलेले असे **मी** लेखीले.खरे पाहीले असता तो **माझ्या** अपराधामुळे घायाळ झाला. **माझ्या** दुष्कर्मामुळे ठेचला गेला; **मला** शांती देणारी अशी शिक्षा त्यांस झाली; त्यांस बसलेल्या फटक्यानी **मला** आरोग्य प्राप्त झाले. **मी** सर्व मेंढराप्रमाणे बहकून गेलो होतो; आम्ही प्रत्येकाने आपआपला मार्ग धरला होता; अशा आम्ही सर्वांचे पाप परमेश्वराने त्याजवर लादले’’

**तिसरा आणि चौथा दिवस -- प्रे.कृ. ९:१-१९, २२:१-१६ ; २६:९-१९**

**प्रश्न:१ पौलाच्या परिवर्तना विषयी ह्या भागात तुम्ही काय शिकता ?**

**अ). प्रकाश ब). वाणी क).ख्रिस्ताचे शब्द ड). पौलाचा आज्ञाधारकपणा**

**उत्तर:** जेव्हा तार्सचा शौल याला ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांची वाढ होत आहे हे सतजले तेव्हा त्याच्या यहुदी धर्माला धोका आहे हे त्याला कळाले.त्यामुळे त्याने ख्रिस्ती धर्म नामशेष करण्याचे ठरविले.त्यासाठी त्याने प्रमुख याजकांकडून पत्रे मिळविली व त्याने त्या आधारे ख्रिस्ती विश्वासणाऱ्यांना बांधून यरुशलेमेस आणायचे होते,मग त्यांची चौकशी करून त्यांना शिक्षा करावयाची होती.

त्यांना आणण्यासाठी तो दिमिस्काच्या वाटेवर होता. क्षणात त्याच्या भोवती आकाशातून प्रकाश चमकला. खरे पाहीले असता ती वेळ दुपारची होती. सुर्याच्या प्रखरतेपेक्षा अधिक तेजस्वी प्रकाश त्याच्या भोवताली पडला(प्रे.कृ.२२:६;२६:१३). त्याने एक वाणी ऐकली‘‘शौला,शौला माझा छळ का करतोस?’’ शौलाने विचारले ‘‘प्रभू तू कोण आहेस?’’ उत्तर आले, ‘‘ ज्या येशूचा तू छळ करतोस तोच मी आहे’’(व. ३-५).

(शौलाची अशी खात्री होती की,नासोरी येशू मरण पावला व त्याला कबरेत पुरुन टाकले आहे.येशूचा नाश केला आणि आता त्याच्या अनुयायांचा सुद्धा नाश केला पाहीजे,तरच सर्व जग त्यापासून स्वच्छ होईल.).

त्याला कळाले की, ख्रिस्त मरण पावला नाही तर तो मेलेल्यातून उठविला गेला आहे आणि स्वर्गात देवाच्या उजवीकडे बसला आहे! आणि त्याला समजले की, तो देवाच्या समक्षतेत आहे. येशू जो जगाचा प्रकाश आहे तो त्याने पाहीला होता(योहान.८:१२). आणि ती वाणी ख्रिस्ताची आहे हे त्याने ओळखले. म्हणून त्याने विचारले की तू कोण आहेस तर उत्तर होते ‘‘ मी येशू आहे’’(व.५).

या नंतर शौलाचा आज्ञाधारकपणा  दिसतो.  शौलाला कळाले की,ख्रिस्ती लोकांचा छळ करीत होता. तेव्हा तो ख्रिस्ताचा छळ करीत होता. शरीराच्या अवयवांना होणारे दु:ख शरीराच्या मस्तकाला होत असते.

ख्रिस्त ज्याला पाचारण करीतो त्याला तो आपले दर्शन देतो आणि सेवा करण्यासाठी सामर्थ्य देतो.

- जेव्हा प्रभू त्याला भेटला त्याची वाणी ऐकली (९:४-६).त्याला स्वर्गीय दृष्टांन्त झाला त्यामुळे त्याची खात्री पटली व तो नम्र झाला.
- प्रभूच्या इच्छेप्रमाणे तो करण्यास तयार झाला(९:११).
- त्याने बाप्तिसमा घेतला(९:१८).
- देवाच्या लोकांशी त्याने सहभागीता केला(९:१९).
- तो जोरदार साक्ष देऊ लागला(९:२०).
- देवाच्या कृपेत वाढत गेला(९:२२).

**प्रश्न:२  कारण आता तुम्ही ख्रिस्ताला जाणता म्हणून तुमच्यातील तुमची कोणती बुद्धीमत्ता किंवा कळकळ गमावली आहे ?**

**उत्तर:** ------------------------------------------------------------

-------------------------------------------------------------------

------------------------------------------------------------------

**प्रश्न:३ हनन्याचे पाचारण आणि त्याचा त्यास प्रतिसाद ह्यावरून तुम्ही कोणता धडा घेता ?**

**उत्तर:**  -हनन्याच्या मनात संशय होता कि, हा माणूस आपला वैरी आहे म्हणून त्याच्याकडे जाणे योग्य नाही. आपण परमेश्वराशी वाद घालू शकत नाही. परमेश्वर कोणालाही निवडू शकतो .परमेश्वर जे काही आपल्याला सांगेल ते आपण नम्रतेने त्याचे ऐकणे आहे. हनन्याने पहिल्यांदा विरोध दर्शविला पण नंतर तो देवाच्या आज्ञेनुसार तो गेला . त्याने देवाची आज्ञा मानली. परमेश्वर ज्याला पाचारण करतो तो त्याला दृष्टांतांच्याद्वारे मार्गदर्शन करीत असतो.

<u>पाचवा दिवस</u> -- प्रे.कृ.९:२०-३१ आणि गलती१:११-२४  वाचन करा

**प्रश्न:१  दिमिष्कास सोडल्यावर पौल कोठे गेला  आणि किती दिवसाकरीता ?**

**उत्तर:**  दिमिष्कास सोडल्यावर पौल अरबस्तानात निघून गेला.तिन वर्षाकरीता(गलती.१:१७-१८).

---------------------------------------------------------------

**प्रश्न:२  शौलाकरीता देवाच्या सेवेविषयी जाणण्यास बघा प्रे.कृ. ९:१५ ;रोम.१:५ आणि गलती.१:१६.**

**उत्तर:**  या वचनांमध्ये पौलाच्या पाचारणाविषयी सांगितले आहे.  परराष्ट्रीय राजे व इस्त्राएलाची संतती ह्यांच्यासमोर ख्रिस्ताचे नाव घेऊन जाण्यासाठी शौल निवडलेले पात्र होता(९:१५).

पौलाला प्रभू येशूद्वारे कृपा मिळाली (त्याची पात्रता नसताना त्याचे कृपेने तारण झाले). तो प्रषित ठरला. त्याला कृपा व प्रेषितपद मिळाले. तो परराष्ट्रीयांचा प्रेषित आहे.(रोम.१:५).

पौल म्हणतो मातेच्या उदरातून जन्मल्यापासून मला वेगळे केले आहे. आपणाला देवाने मातेच्या उदरातून जन्मल्यापासूनच वेगळे केले आहे.यासाठभ्‍ की, परराष्ट्रीयांमध्ये सुवार्तेची घोषणा करावी.

**पश्न:३  पौलाला मदत करण्याकरीता बर्णबाने कोणती जोखीम आणि त्याग स्विकारला ?**

**उत्तर:**  यरुशलेमेत प्रेषितानी शौलाचा स्विकार केला नव्हता. पण बर्णबाने शौलाला साथ दिली. त्याला प्रोत्साहन दिले. त्याने प्रेषितांना शौलाची ओळख करून दिली.आणि शौल येशूच्या नावाने दिमिष्कात धैर्याने कसा बोलला हे सांगितले.

**प्रश्न:४ यरूशलेमेतील आपल्या पहिल्या वास्तव्यास पौलासोबत काय झाले ?**
**उत्तर:** पौलाने यरूशलेमेतील ग्रीक वंशातील यहुद्यांना सुवार्ता सांगितली परंतू ते रागाने पेटले व त्याला ठार मारण्यास पाहू लागले म्हणून प्रेषितानी त्याला कैसरीयात नेले व तेथून त्याला तार्सास ला पाठविले. तार्सास या ठिकाणी पौलाचा जन्म झाला होता(प्रे.कृ२२:३).

पण अशा विरोधात मंडळीची मात्र उन्नती होत होती. अशा प्रकारे सर्व यहुद्यात, गालीलात,व शोमरोन ह्या प्रदेशातील मंडळीस स्वस्थता मिळाली. आणि तिची उन्नति होऊन ती प्रभूच्या भयात व पवित्र आत्म्याच्या समाधानात चालत असता वाढत गेली.

**प्रश्न:५ वाढत्या मंडळीसाठी कोणती गुण लाभली ?**
**उत्तर:** शांती प्राप्त झाली. स्वस्थता लाभली. उननती झाली. आत्मिक समाधान आले. प्रभूचे भय आले.

**प्रश्न:६ आपल्या स्वत:च्या जीवनाकरीता या आठवड्यात तुम्ही वाढीची कोणती गुणवैशिष्ट्ये केंद्रित करू इच्छिता ?**
**उत्तर:** -----------------------------------------------------------------
--------------------------------------------------------------------------
---------------------------------------------------------------------------
-----------------------------------------------------------------------

## <u>सहावा दिवस</u>

**प्रकरण ५** ‘‘ पांगापांग ’’

| | |
|---|---|
| **पाठ** | : अध्याय ८-९ |
| **मुख्यवचन** | : प्रे.कृ. ८:४ ‘‘ तेव्हा त्यांची पांगापांग झाली होती तेंव्हा ते वचनाची सुवार्ता सांगत चोहूकडे फिरले.’’ |
| **विषयवाक्य** | : स्तेफनाच्या मृत्यूने मोठ्या छळाची सुरवात झाली आणि सुवार्ता चारीबाजूला पसरली. |
| **जीवनतत्व** | : छळामध्ये देखील देव आमच्या आज्ञाधारकपणास बंद अंतकरणांना उघडण्यास उपयोगात आणू शकतो. |

**प्रकरण ६ :** अध्याय ९-११

**विषय वाक्य :** विधर्मी मंडळीला उपदेशाद्वारे पेत्र अडखळणांना मोडून काढतो.

**पहिला दिवस -- प्रे.कृ. ९:३२-४३ वाचन करा**

**प्रश्न:१ ह्या वचनामध्ये देवाने पेत्राला कसे उपयोगात आणले ?**

**उत्तर:** देवाने पेत्राच्याद्वारे चिन्ह चमत्कार केले. लोद गावात ऐनेयास नावाचा पक्षघाती मनुष्य आठ वर्षे बिछान्यात खिळलेला होता प्रत्राने त्याचे नाव घेऊन त्याला येशूच्या नावात उठण्यास सांगितले. तो लगेच उठला व अंथरून घेऊन चालू लागला. ऐनेयासला आत्मिक जीवन आणि रोगमुक्ती एकाच वेळी लाभली.

त्या पक्षघाती माणसामुळे लोद गावात व शारोनात चांगली साक्ष झाली त्यामुळे अनेक लोक प्रभूकडे आले. आणि जसे ख्रिस्ताने याईराच्या कन्येला (मार्क.५:२२,२४,३५-४३)बरे केले अगदी तसेच टबीथेला बरे केले. यापोमध्ये टबीथा उर्फ दुर्कस नावाची एक शिष्य होती ती सत्कृत्ये व दानधर्म करण्यास तत्पर होती. ती आजारी पडून मरण पावली देवाने पेत्राच्याद्वारे तिला जिवंत केले अशा प्रकारे देवाने लोद व यापो इकडील भागात उपयोगात आणले.

**प्रश्न:२ यापोमध्ये पेत्र कोणासोबत राहीला ?**

**उत्तर:** पेत्र शिमोन नावाच्या चांभाराच्या घरी राहीला. या ठिकाणी शिमोनाच्या व्यवसायाचा उल्लेख महत्वाचा आहे. यहूद्यांच्या दृष्टीने चांभार हीन समजला जात होता. मेलेल्या जनावरांचे कातडे सतत हाताळल्यामुळे चांभार अशुद्ध होत होते.त्यामुळेच यहुदी त्यांना तुच्छ लेखीत. पेत्र शिमोन चांभाराच्या घरी राहीला त्यामुळे यहुदी समाजाला आव्हान दिले गेले.

**दुसरा दिवस ---** प्रे.कृ. १०:१-८ वाचान करा

**प्रश्न:१ जेव्हा त्यास दर्शन झाले त्यावेळी कर्नेल्या काय करीत होता ?**

**उत्तर:** तेव्हा तो प्रार्थना करीत होता.

**प्रश्न:२ ह्या वचनामध्ये कर्नेल्याचे वर्णन कसे केले आहे ?**

**उत्तर:** कर्नेल हा रोमी सैन्याचा अधिकारी होता, शताधिपती होता.तो नितीमान होता. तो व त्याचे कुटूंब देवाचे भय बाळगणारे होते. गरीब लोकांना दानधर्म करणारा व देवाची नित्य प्रार्थना करणारा होता.सर्व यहुदी लोकात त्याची चांगली साक्ष होती (व.२२).

वचन प्रे.कृ.११:१४ सांगते की, कर्नेल्याचे तारण झाले नव्हते. तो यहुदी नव्हता. परराष्ट्रीय होता. तरी तो देवाने दिलेल्या प्रकाशात चालत होता.पण तो प्रकाश त्याला तारणासाठी पुरेसा नव्हता.देवाने त्याला सुवार्तेचा प्रकाश मिळण्याची सोय केली. पेत्राला भेटण्यापुर्वी त्याला तारणाची खात्री नव्हती, पण जे खऱ्या देवाची उपासना करतात त्यांच्याशी त्याचे नाते जोडलेले होते (व.२२).

प्रश्न:३ तुमचे कुटूंब किंवा मित्र तुमचे कसे वर्णन करतात ?

उत्तर: ------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

---------------------------------------------------------------------------

**तिसरा दिवस ---** प्रे.कृ.१०:९-१८ , लेवी.१७:१०-१४, लेवी.११ वाचन करा

**प्रश्न:१ ह्या शास्त्र भागात कोणती वचने सारखी आली आहेत ?**

**उत्तर:** जुन्याकरारातील व्यवस्थेनुसार **अशुद्धता** ही वचने सारखी आहेत. पेत्र यहुदी असल्याकारणाने तो शुद्ध आणि अशुद्ध गोष्टी मान्य करीत होता.

**प्रश्न:२ कोणत्या घटनेने ही व्यवस्था बदलली ?**
**उत्तर:** येशू ख्रिस्ताच्या बलीदानाद्वारे ही सर्व व्यवस्था बदलली. ''येशूने सर्वकाही शुद्ध ठरविले आहे'' (मार्क.७:१५-१९). जुन्या करारातील नियम आता कादेशीर राहीला नाही. ''देवाने जे शुद्ध केले आहे ते अशुद्ध मानू नको''(प्रेषित.११:५-१०). या ठिकाणचा अर्थ खाण्यासंबधी नव्हता. ख्रिस्ती धर्माच्या आगमनाने काय खावे यासंबधी निर्बंध नाही. पण या दुष्टांन्ताचा खरा अर्थ असा आहे की, देव परराष्ट्रीयांसाठी विश्वासाचा दरवाजा उघडत आहे.

माझ्या मते शुद्ध प्राणी म्हणजे यहुदी राष्ट्र आणि सरपटणारे अशुद्ध प्राणी म्हणजे परराष्ट्रीय, यांना यहुद्यांप्रमाणेच पवित्र आत्मा मिळणार होता. राष्ट्रीय व धार्मिक निर्बंध गळून पडणार होते. आणि सर्व ख्रिस्ती विश्वासणारे एका समान पातळीवर येणार होते.

**प्रश्न.३: आज देव आमच्या सोबत कसे बोलतो?**
**उत्तर:** आज देव आमच्या सोबत वचनाद्वारे , सेवकांच्याद्वारे,दृष्टांन्ताच्याद्वारे बोलतो.

**प्रश्न:४: देवाने पेत्राला काय करायला सांगितले जे एक यहुदी म्हणून त्याज करीता सोपे नव्हते ?**
**उत्तर:** परराष्ट्रायांसोबत एक होऊन जाण्यास सांगितले होते. हेच त्याला कठीण होते कारण तो कट्टर यहुदी होता. आणि त्या नियमाचे पालन करणारा होता.

**प्रश्न: ५ कोणती वचने आहेत जे पेत्राला कसे मार्गदर्शन मिळाले हे समजण्याकरीता आम्हास मदत पुरवितात ?**
**उत्तर:** १७-२० ही वचने आम्हास मदत पुरवितात. जेव्हा पेत्राचा दृष्टांन्त संपला तेव्हा पवित्र आत्म्याने त्याला सांगितले की तीन माणसे तुला भेटावयास आली आहेत. ''काही संशय न धरता त्यांच्या बरोबर जा कारण त्यांना मीच पाठविले आहे'' असा आत्मा त्यास म्हणाला (व.२०). जर का आत्म्याने त्याला सांगितले नसते तर नक्कीच पेत्राला संशय आला असता. कारण त्याच्याकडे आलेली माणसे परराष्ट्री होते (११:१०-१२).

**प्रश्न:६ कोणती वचने आहे जे दर्शवितात की, देव सर्व राष्ट्रातील लोकांना आपल्या कुटूंबाचे बनवितात ?**
**उत्तर:** वचन २४- २७ परराष्ट्रीय एकत्रीत आले होते.
वचन २८ कोणाही मनुष्याला निषिद्ध किंवा अशुद्ध म्हणू नये.
वचन ४४ वचन ऐकणाऱ्या सर्वांवर पवित्र आत्मा उतरला.

**चौथा दिवस ---- प्रे.कृ.११:१-१८ वाचन करा.**

**प्रश्न:१ यरूशलेमेत यहुदी ख्रिस्ती लोकांच्याद्वारे पेत्रावर कोणती टिका करण्यात आली ?**
**उत्तर:** सुंता न झालेल्या माणसांकडे म्हणजे परराष्ट्रीयांकडे जेवण केले म्हणून त्याच्यावर टिका करण्यात आली.(व.३).

**प्रश्न:२ पेत्र किती वेळा पवित्र आत्म्याचा उल्लेख करतो ?**
**उत्तर:** तिन वेळा .
- ☞ संशय न धरता जावे असे पवित्र आत्म्याने सांगितले (व.१२).
- ☞ त्यांच्यावर पवित्र आत्मा उतरला (व.१५).
- ☞ पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा होईल (व.१६).

**प्रश्न:३ पेत्राच्या श्रोत्यानी जेव्हा त्याने विधर्मीजनासोबत बसून जेवण केले ह्याचे वर्णन केले तेव्हा कसा प्रतिसाद दिला ?**
**उत्तर:** जेव्हा श्रोत्यानी ऐकले तेव्हा त्यांना समजले की, या सर्व गोष्टीत देवाचा हात आहे.म्हणून ते शांत राहीले. त्यांचा विरोध मावळला. देवाने परराष्ट्रीयांसही जीवन मिळावे म्हणून पश्चातापबुद्धी दिली याचा त्यांना आनंद झाला आणि त्यानी देवाचे गौरव केले.

**प्रश्न:४: जेव्हा आपण टिकेचा सामना करतो तेव्हा आपण पेत्राकडून काय शिकतो ?**
**उत्तर:** जे टिका करतात त्यांना पुर्ण गोष्ट माहिती नसते .तेंव्हा आपण त्यांना घडलेली सविस्तर माहीती सांगितली पाहीजे. पेत्राने हेच केले घडलेली माहीती त्यांना सांगितली. तेंव्हा त्याना कळाले की, टिका करण्यात काहीच अर्थ नाही.टिका का होत आहे याची सविस्तर माहीती जाणून घेणे आवश्यक आहे. हेच आपण यामधून शिकतो.
**प्रश्न:५ जेव्हा आपले अंतकरण इतरांपेक्षा भिन्न असते तेव्हा याकोब.२:१ हे वचन काय सांगते ?**
**उत्तर:** तोंड पाहून वागू नये.म्हणजे विश्वासणाऱ्यांने पक्षपात करू नये. ( पं.रं *"माझ्या भावानो आमचा प्रभू येशू ख्रिस्त जो गौरवाचा प्रभू त्याचा विश्वास पक्षपाताने धरू नका"* )

**प्रश्न:६** न्यायीपणाचे अंतकरण किंवा जे पक्षपाती आहे ते बदलू शकते ?आज थोडा वेळ प्रार्थनेसाठी काढा यासाठी की, देव तुमचे अंतकरण बदलेल.

**पाचवा दिवस --- प्रे.कृ.११:१९-२६ वाचन करा.**

**प्रश्न:१ अंत्युखिया येथील मंडळीची सुरवात कशी झाली ?**
**उत्तर:** स्तेफनावरून उद्भवलेल्या छळामुळे ज्यांची पांगापांग झाली होती. त्यांच्यामध्ये जे कृपी आणि कुरेनेकर होते त्यांनी अंत्युखियात येऊन प्रभू येशूची सुवार्ता हेल्लेणी लोकांस सांगितली.प्रभूचा हात त्यांच्याबरोबर असल्या कारणाने पुष्कळ लोक विश्वास धरून प्रभूकडे वळले. आणि मग बर्णबा अंत्युखियात आला आणि तेथिल सर्वांना बोध केला. अशा प्रकारे अंत्युखियात मंडळीची सुरवात झाली.

**प्रश्न:२ यरूशलेम येथील मंडळीने बर्णबाला अंत्युखिया येथे का पाठविले ?**
**उत्तर:** कारण अंत्युखियातील मंडळीची सुरवात हे एक महत्वाचे पाऊल होते कारण अत्युखिया , सिरीयामधील ओरंटो नदिच्या किनारी होते. रोमी साम्राज्यातील ते महत्वाचे तिसरे शहर मानले जात होते. त्याला प्राचिन जगातील 'पॅरीस' असे म्हटले जाई. येथूनच पौल व त्याचे सहकारी मिसनरी प्रवासास निघले होते व त्यानी परराष्ट्रीयांपर्यंत सुवार्ता पोहचविली.

आणि अशा शहरामध्ये मोठी आत्मिक जागृती झाल्याची बातमी यरूशलेमेतील मंडळीमण्ये पाहचली. त्या काळात यरूशलेम मंडळी ही **"मातृ"** मंडळी होती. जेंव्हा त्याना ही बातमी कळाली तेव्हा त्यांनी प्रेमळ,कनवाळू बर्णबाला पाठविले.यासाठी की त्यांने बोध करावा. कारण बर्णबा हा प्रेमळ ,कनवाळू तसाच उत्साही होता. (व.२३-२४).

**प्रश्न:३ अंत्युखियामध्ये तो किती वेळ थांबतो ?**
**उत्तर:** अत्युखियामध्ये तो वर्षभर थांबला.

**प्रश्न:४ अंत्युखियामध्ये बर्णबाने कोणाला आणले ?**
**उत्तर:** त्याने शौलाला अत्युखियात आणले.

**प्रश्न:५ अंत्युखिया येथील विश्वासणाऱ्यांना कोणते नवे नाव देण्यात आले ?**
**उत्तर:** ख्रिस्ती हे नवे नाव देण्यात आले.

**प्रश्न:६ अनुवाद १३:१-५ आणि अनुवाद १८:२०-२२ नुसार आपण खरे व खोटे संदेष्ट्यांमधील अंतर कसे जाणून घेतो ?**
**उत्तर:** अनुवाद १३:१-५ नुसार संदेष्ट्यांने सांगितलेल्या चिन्हांचा प्रत्यय आला आणि स्वप्न पाहणारा प्रगट झाला आणि त्याने अन्य देवांना अनुसरून सेवा करण्यास सांगितले तर तसे करू नये कारण असे लोक येणार ते ह्यासाठी की, तुम्ही आपला देव परमेश्वर ह्याच्यावर संपुर्ण मनाने व संपुर्ण जीवाने प्रीती करता की नाही हे पाहण्यासाठी तुमचा देव परमेश्वर तुमची परिक्षा पाहत आहे.

दुसरे म्हणजे अनुवाद १८:२०-२२ नुसार जर संदेष्टा परमेश्वराच्या नावाने बोलला आणि तसे घडले नाही तर समजावे की, हे बोलणे परमेश्वराकडून नव्हते. तेव्हा त्याची भीती बाळगू नये.

## सहावा दिवस --
## प्रकरण ६ : ‘‘ विधर्मी जनांकरीता कृपा’’

| | |
|---|---|
| **पाठ** | :अध्याय ९:३२-४३ |
| **मुख्यवचन** | : प्रे.कृ. १०: ३४-३५ देव पक्षपाती नाही हे मला पक्के ठाऊक आहे. तर प्रत्येक राष्ट्रात जो त्याची भिती बाळगतो व त्याची कृत्ये नैतिक आहेत तो त्याला मान्य आहे’’ |
| **विषयवाक्य** | : विधर्मी मंडळीला उपदेशाद्वारे पेत्र अडखळणांना मोडून काढतो. |
| **जिवनतत्व** | : ख्रिस्ताच्या देहामध्ये एकते करीता भिन्नता ही बाजूला ठेवली पाहीजे |

**प्रकरण ७** --- अध्याय १२

**विषय वाक्य :** हेरोदाने छळास प्रारंभ केला परंतू सुवार्ता सतत पसरत गेली.

## दिवस पहिला --- प्रे.कृ.१२:१-११ वाचन करा

**प्रश्न:१ ह्या वेळी विश्वाशी कोणत्या प्रकारचा छळ सहन करीत होते ?**

**उत्तर:** प्रथम या ठिकाणी ज्या हेरोद राजाच उल्लेख करण्यात आला आहे.तो येशू ख्रिस्ताच्या जन्माच्या वेळेला यहुद्यावर राज्य करणाऱ्या हेरोदाचा नातू होता(मत्तय.२:१, लुक.१:५).

या हेरोद राजाने यहुद्यांना खुष करण्यासाठी मंडळीचा छळ सुरू केला. प्रथम त्याने योहानाचा भाऊ याकोब याला तरवारीने मारले. हे यहुदी लोकांना आवडले म्हणून त्याने पेत्राला तुरुंगात टाकले. हेरोद राजा मंडळीमध्ये भितीचे वातावरण पसरवित होता.

**प्रश्न:२ याकोब कसा मारला गेला? (योहानाचा भाऊ) ?**

**उत्तर:** याकोबाला तरवारीने मारीले. हा याकोब जब्दीचा मुलगा व योहानाचा भाऊ होता (मार्क. १:१९-२०). ह्याच दोन भावानी येशूजवळ विनंती केली होती की, **''एकाला उजवीकडे व एकाला डावीकडे बसू द्यावे. ''** येशूने त्यांना म्हटले की, **'' तुम्ही काय मागता हे तुम्हाला समजत नाही; जो प्याला मी पिणार आहे तो तुमच्याने पिववेल काय? व जो बाप्तिस्मा मी घेणार आहे तो तुमच्याने घेववेल काय?''**

**प्रश्न:३ प्रे.कृ. १२:३ आणि योहान १२:४२-४३ बघा. हेरोद कोणाला प्रसन्न करण्याचा प्रयत्न करीत होता?**

**उत्तर:** हेरोद देवाला प्रसन्न करण्यापेक्षा यहुद्यांना प्रसन्न करण्याचा प्रयत्न करीत होता.

## दुसरा दिवस --- प्रे.कृ.१२:५-१२ वाचन करा.

**प्रश्न :१ जेव्हा पेत्र बंदीवासात होता तेव्हा विश्वासीजन काय करीत होते ?**

**उत्तर:** मंडळी देवाजवळ एकाग्रतेने प्रार्थना करीत होती. जेव्हा आपल्या मंडळीतील कोणाला विरोधाचा सामना करावा लागतो तेव्हा सर्व मंडळी मिळून प्रार्थना केली पाहीजे.

**प्रश्न:२ त्यांने कशी प्रार्थना केली ?**

**उत्तर:** ते एकाग्रतेने प्रार्थना करीत होते. (मार्गन म्हणतात, एकाग्रतेने केलेली प्रार्थना हेरोदाच्या सामर्थ्यापेक्षा अधिक सामर्थ्यशाली होती, नरकापेक्षा अधिक सामर्थ्यवान होती.)

**प्रश्न:३ प्रार्थनेच्या सामर्थ्याविषयी आपण काय शिकू शकतो?**

**उत्तर:** जेव्हा आपण एकाग्रतेने प्रार्थना करतो तेव्हा देव आपल्या दुतांना पाठवून कार्य सिद्धिस नेतो. प्रार्थनेच्या द्वारे स्वर्गातील देवदूत आमच्या संरक्षणासाठी धाऊन येतात. एकाग्रतेच्या प्रार्थनेत एवढे सामर्थ्य आहे.

**प्रश्न:४ ह्या वचनातून तुम्ही प्रार्थने विषयी काय शिकू शकता ?**

**अ)** रोम ८:२८. **ब)** इफिस.६:१८. **क)** कलसै.४:२.

**उत्तर:**

**अ) रोम.८:२८** --- देवाच्या करणीने सर्व गोष्टी मिळून कल्याणकारक होतात. सर्व गोष्टी म्हणजे जीवनातील चांगल्या व आनंदाच्या गोष्टी नव्हे तर , वाईट व दु:खाच्या गोष्टी देखील, उदा. आजार,वाईट गोष्टी, व मरण , देव आपल्या जीवनातील वाईटगोष्टींचा उपयोग कल्याणकारक करतो.

जर आपण देवावर प्रिती करतो व आपण त्याच्या संकल्पाप्रमाणे बोलाविलेले आहोत तर पृथ्वीवर जे काही आपल्याशी घडेल - ते वाईट असले तरी आपण ख्रिस्तासारखे होण्याकरीता शेवटी ते आपल्याला कल्याणकारक होईल.

या पृथ्वीवर ज्या सर्व गोष्टी आपल्या विषयी घडल्या त्या स्वर्गामध्ये आपल्याला कल्याणकारक आहेत. रोम.८:१८-२५ मध्ये पौलाने भविष्यातील आशा व गौरवाविषयी सांगितले आहे..या कारणास्तव या वचनामध्ये पौल स्वर्गातील कल्याणाविषयी बोलत आहे.जगिक कल्याणाविषयी नव्हे. जगामध्ये सैतानाचे सामर्थ्य मोठे आहे.परंतू स्वर्गामध्ये त्याला मुळीच सामर्थ्य नाही. जगामध्ये सैतानाने केलेले आपले वाईट आपल्यासाठी स्वर्गामध्ये कल्याणकारक होईल.

**ब) इफिस.६:१८** --- प्रार्थना हे शस्त्र आहे.सैतानाबरोबर लढण्यासाठी चांगले व सामर्थ्यशाली शस्त्र आहे.
प्रार्थना **आत्म्याने** कारणे :- म्हणजे, पवित्र आत्म्याच्या मदतीने व प्रेरणेने केली पाहीजे. कारण पवित्र आत्मा आपल्याला प्रोत्साहन देतो व शिकवितो(रोम.८:२६).
**प्रत्येक समयी** :- प्रत्येक समयी प्रार्थना केली पाहीजे, प्रत्येक दिवशी खंड न पडता करणे. कोणत्याही समयी प्रार्थना करू शकतो.
**एकाग्रतेने** :-प्रार्थना सतत करणे. एकचित्त होऊन प्रार्थना करणे.
सर्व पवित्र लोकांसाठी:- सर्व विश्वासू लोकांसाठी, सेवकांसाठी , मंडळीसाठी, अधिकाऱ्यांसाठी प्रार्थना करीत **जागृत** राहीले पाहीजे. म्हणजे आपण देवाच्या अधिन होतो आणि सैतानाला अडवून पळवून लावतो (याकोब.४:७).

**क) कलसै.४:२.---** पौल सांगतो की प्रार्थनेत स्वत:ला समर्पित केले पाहीजे.
या वचनात दोन गोष्टी सांगण्यात आल्या आहेत.
**प्रार्थनेत तत्पर असावे** - जेव्हा आपण प्रार्थना करतो, तेव्हा आपण जागृत असायला हवे.सतत प्रार्थना करणे.
प्रभू येशू गेथशेमाने बागेत शिष्यांना म्हणाला, ‘‘ तुम्ही परिक्षेत पडू नये म्हणून जागृत राहा व प्रार्थना करा’’ कारण ते प्रार्थनेत तत्पर नव्हते. म्हणून ते झोपी गेले होते. आपणांस झोप येऊ नये म्हणून काळजी घेतली पाहीजे. तसेच भरकटणारे विचार , यापासून दूर असले पाहीजे.प्रार्थनेची वेळ गमावू नये म्हणून दक्ष असले पाहीजे(इफिस.६:१८).
**उपकारस्तुती करीत जागृत** - आपल्या मागील प्रार्थनेचे उत्तर मिळाले म्हणून उपकारस्तुती करावी. पण ज्या प्रार्थनेचे उत्तर अद्याप मिळाले नसले तर त्यासाठी सुद्धा उपकार मानावेत.

## तिसरा दिवस -- प्रे.कृ. १२:६-१७

**प्रश्न:१ बंदीवासात पेत्राची काय अवस्था होती ?**
**उत्तर:** त्याचा डावा हात एका शिपायाला व उजवा हात दुसऱ्या शिपायाशी बेड्यानी बांधलेले होते. अशा प्रकारे दोन शिपायांच्या मध्ये बेड्यानी बांधलेला होता. आणि पहारेकरी तुरूंगाच्या दरवाजावर पहारा देत होते. त्याला काहीच करता येत नव्हते. अशी पेत्राची अवस्था होती.

**प्रश्न:२ पेत्र बंदीगृहातून कसा सुटला याचे तुमच्या शब्दात वर्णन करा ?**
**उत्तर:** तो बंदीगृहात असताना पेत्र निर्दास्तपणे झोपला होता. त्याला कोणाची भिती किंवा कोणतीच चिंता नव्हती. तो शांतपणे झोपला होता. कारण त्याच्याजवळ पळून जाण्याचा मार्ग सुद्धा नव्हता, आणि त्याला सुटकेची कोणतीच आशा नव्हती. अशा वेळी प्रभुचा दुत त्याच्या जवळ आला आणि त्याला थापटून जागे केले. आणि म्हटले लवकर उठ तेव्हा त्याच्या हातातले साखळदंड गळून पडले.आणि तो मोकळा झाला. तेव्हा दुताने त्याला म्हटले, कंबर बांध व पायात वाहाण घाल आणि आपले वस्त्र पांघरून माझ्या मागे यावे असे म्हटलें. आणि तो दुताच्या मागे चालू लागला.परंतू हे काय घडत आहे हे त्याला कळत नव्हते.आपण जसे काय दृष्टांन्त पाहत आहो असे त्याला वाटत होते. शेवटी तुरूंगाचा लोखंडी दरवाजा त्याच्यासाठी आपोआप उघडला गेला.आणि ते तुरूंगाच्या बाहेर आले व रस्त्याने काही अंतर चालुन पुढे गेले .तेंव्हा देवदुत त्याला सोडून निघून गेले. तेव्हा पेत्र भानावर आला तेव्हा त्याला कळाले प्रभूने आपला दुत पाठवून मला सोडविले आहे. अशाप्रकारे देवाने त्याला तुरूंगातून मृत्यूच्या दारातून त्याला बाहेर काढले. हे सर्व मंडळीच्या प्रार्थनेद्वारे कार्य झाले. प्रार्थना कार्य करण्यास प्रबळ आहे.

**प्रश्न:३ पेत्राला आपल्या मित्रांसोबत भेटण्याच्या आश्चर्यकारक गोष्टीबद्दल तुम्हाला काय वाटते ?**
**उत्तर:** मंडळी पेत्रासाठी प्रार्थना करीत होती आणि त्यांची प्रार्थना देवाने ऐकली होती व पेत्राला सोडविले होते. आणि रुदा नावाच्या मुलीने त्याचा आवज ऐकला होता.तिचा विश्वास होता की, देवाने त्याला सोडविले आहे.पण लोकांचा विश्वास कमजोर झाला होता. त्यांच्या **मनात शंका** होंती.व.१४-१५.

**प्रश्न:४ मार्क ९:२४ सोबत तुलना करा ?**
**उत्तर:** मुलाचा बाप म्हणाला ''माझा अविश्वास घालवून टाका'' लोकांचा विश्वास कमजोर होता. आपण आमच्या मधील असलेला अविश्वास काढला पाहीजे. मनामध्ये शंका न धरता विश्वासाने पाहीले पाहीजे.

प्रश्न:५ प्रार्थनेमध्ये थोडा वेळ घ्या आणि तुमचा विश्वास वाढविण्याबद्दल सांगा.
उत्तर: ---------------------------------------------------
-------------------------------------------------------
--------------------------------------------------------

**चौथा दिवस ---प्रे.कृ.१२:१८-१९ वाचन करा.**

**प्रश्न:१ दुसऱ्या दिवशी पहाटेस काय घडले ?**
**उत्तर:** रात्री देवदुताने पेत्रास अद्भुतरित्या बाहेर आणून सोडले हे तुरुंगातील शिपायांना माहित नव्हते. जेव्हा त्यांनी सकाळी पाहीले तेव्हा शिपायांची मोठी खळबळ उडाली. हेरोदाने त्याचा शोध घेतला तरी तो सापडला नाही म्हणून हेरोदाने शिपायांना ठार मारण्याचा हुकूम सोडला व स्वत:हा कैसरियात पळून गेला.

रोमी कायद्याप्रमाणे जर कोणी बंदीवान पळून गेला तर जे शिपाई त्याचा पाहीरा करीत होते,त्यांना त्या बंदीवानाला जी शिक्षा होणार होती ती भोगावी लागत आसे. पेत्राला मरणाची शिक्षा झाली असल्याकारणाने हेरोदाने त्या सर्व शिपायांना मरणदंड देण्याची आज्ञा दिली.

**प्रश्न:२ हेरोद अग्रीपाने शहर का सोडले ?**
**उत्तर:** आपली नाचक्की होऊ नये म्हणून तो यहूदीयातून कैसरियांत जाऊन राहीला.

**प्रश्न:३ जेव्हा आपण देवाची कृत्ये वर्णन करु शकत नाही तेव्हा सहसा आपण त्यास कसा प्रतिसाद देतो ?**
**उत्तर:** एकतर आपण न बोलण्याचा प्रयत्न करतो. दुसरा प्रतिसाद म्हणजे आपण स्वत:ला लपवण्याचा प्रयत्न करतो.

----------------------------------------------------------------

**पाचवा दिवस -- प्रे.कृ.१२:२०-२५ वाचन करा.**

**प्रश्न:१ हेरोद अग्रीपा हा हेरोदाचा नातू होता.जो येशूच्या जन्मानंतर लगेच मरण पावला. हेरोदाविषयी लोक काय ओरडत होते?**
**उत्तर:** जेव्हा हेरोद भाषण करु लागला तेव्हा लोकांनी त्याला खुष करण्यासाठी त्याला देव म्हणण्यास सुरवात केली**'' ही देववाणी आहे मनुष्यवाणी नाही''** अशा ते घोषणा देत होते.

**प्रश्न:२ जेव्हा लोकांनी हेरोदास स्तुतीचे अर्पण दिले तेव्हा देवाने काय केले?त्याने तसे का केले ?**
**उत्तर:** तेव्हा दुताने त्याच्यावर प्रहार केला आणि तो किडे पडून मेला. कारण तो देवाला स्तुती देत नव्हता तर स्वत:चे गौरव करीत होता. दुसरी गोष्ट म्हणजे यहुद्यांना खुष करण्याकरीता त्याने याकोबाला ठार मारले होते(व. १२:२).जे हेरोदाने पेरले त्याची त्याने कापणी केली.

**प्रश्न: हेरोदाच्या न्यायाविषयी तुम्ही देवाचे कोणते गुण वैशिष्ठे पाहता ?**
**उत्तर:** देव न्यायी आहे. देव आपल्या सेवकाचे बलीदान व्यर्थ जाऊ देत नाही. देव योग्य न्याय करतो कारण तो न्यायाधिश आहे. मनुष्याची मसलत देव फोल ठरवितो. परंतू देवाची योजना सर्वकाळ टिकते(स्तोत्र.३३:१०,११).

**प्रश्न:३ मंडळी सतत कशी वाढत गेली ?**
**उत्तर:** मंडळी सतत देवाच्या वचनात वाढत गेली. देवाच्या वचनाचा प्रसार होत गेला. देव राज्य करणारे अधिकारी उभे करतो व छळ व विरोध करणाऱ्या अधिकाऱ्यांना खाली पाडतो.परंतू देवाचे वचन सर्वकाळ टिकणारे आहे(१पेत्र. १:२४-२५).

## सहावा दिवस

**प्रकरण ७ -- स्थिती परीवर्तन**

| | |
|---|---|
| **पाठ** | : अध्याय १२ |
| **मुख्यवचन** | : १२:१ ''त्या सुमारास हेरोद राजाने मंडळीतल्या काही जणांस छळावे म्हणून त्यांच्यावर हात टाकला'' |
| **विषय वाक्य** | : हेरोदाने छळाची सुरवात केली परंतू सुवार्ता सतत पसरत गेली. |
| **जिवन तत्व** | : सैतानाच्या योजनेपेक्षा देवाचा हेतू श्रेष्ठ असतो. |

## प्रकरण ८ -- अध्याय. १३-१४

**विषय वाक्य** : पौल व बर्णबा हे आपल्या सुवार्ता प्रसाराच्या पहिल्या प्रवासाला निघतात. ज्यामुळे छळात भर पडली आणि अनेकांना तारण.

**पहिला दिवस -- प्रे.कृ.१३:१-१२ वाचन करा.**

**प्रश्न:१ अंत्युखिया येथील मंडळीच्या काही पढाऱ्यांची नावे सांगा ?**
**उत्तर:** १. **बर्णबा -** ख्रिस्ताचा दास व पौलाचा सहकारी म्हणून त्याची ओळख आहे. त्याचा उल्लेख प्रथम केला आहे. कारण तो विश्वासात ज्येष्ठ होता. आणि ख्रिस्तारच्या सेवेतही तो ज्येष्ठ होता.
**२. शिमोन निग्र -** तो जन्मापासून यहुदी होता. शिमोन हे **यहुदी** नाव आहे पण निग्र हे **'लॅटीन'** आहे. याचा अर्थ काळा असा आहे. म्हणजे तो काळा असावा यानेच येशूचा बधस्तंभ वाहुन नेला होता असे काही लोकांना वाटते(मार्क.१५:२१).
**३. लुक्य कुरेनेकर-** हा अंत्युखिया येथील परराष्ट्रीयांना प्रथम सुवार्ता सांगणाऱ्या मधील एक होता (प्रे.कृ. ११:२०).
**४. मनाएन -** बालपणापासून अंतिपा हेरोद राजाबरोबर वाढला होता. तो दुष्ट होता.१२व्या अध्यायात ज्या हेरोदाविषयी सांगीतले तो हेरोद नाही. या ठिकाण ज्या हेरोदा विषयी सांगत आहे तो येशू ख्रिस्ताच्या जिवनकाळात होता(मत्तय.२:१ ; लुक.१:५). याच हेरोदाने बाप्तिसमा करणाऱ्या योहानाचा शिरच्छेद केला होता(मार्क.६:१४-२८). याच हेरोदाने येशूची चौकशी व उपहास केला होता(लुक.२३:६-१२). मनाएन व हेरोद हे दोघे एका घरातील होते. त्या दोघात किती फरक आहे.
**५. शौल -** हा विश्वासणाऱ्यांचा छळ करणारा होता.हे असे वेगवेगळया ठिकाणचे लोक होते. यावरून हे दिसते की, सुरवातीच्या मंडळीमध्ये ऐक्यता होती. त्यांच्यामध्ये वर्णभेद नव्हता.ते फक्त आत्मिक गोष्टीकडे लक्ष लावीत होते.

**प्रश्न:२ जेव्हा देव त्यांच्यासोबत बोलला तेव्हा ते काय करीत होते?**
**उत्तर:** तेव्हा ते उपास व प्रार्थना करीत होते. ते सर्वजण सेवा करीत होते.

**प्रश्न३: प्रवासात वेगवेगळे ते तीन कोण होते ?**
**उत्तर:** **वर्णबा** आणि **शौल** व त्यांचा सहाय्यक **योहान** असे मिळून प्रवासात तिघेजण होते.

**प्रश्न ४: पफेस येथील समस्येचे वर्णन करा ?**
**उत्तर:** पफेस येथे सिर्ग्य पौल नावाचा बुद्धिमान सुभेदार होता. त्याला देवाचे वचन ऐकण्याची इच्छा होती म्हणून त्याने वर्णबा आणि शौल यांना बोलावले. त्याच्या पदरी बर्येशू नावाचा यहुदी जादुगार(अलीम जादूगर) व खोटा संदेष्टा हा यिर्ग्य पौलाचा सेवक होता. त्याने बर्णबा व शौल यांना विरोध करावयास सुरवात केली. कारण त्याला माहीत होते की, या सुभेदाराने विश्वास ठेवला तर त्याचे जादूगीरीचे काम हातातून निघून जाईल. म्हणून तो सुभेदाराला विश्वासापासून फितविण्याचा प्रयत्न करीत होता.

पण हे शौलाने ओळखले आणि पवित्र आत्म्याने पुर्ण होऊन त्याला दटावले. तो आंधळा झाला आणि कोणीतरी त्याला धरून न्यावे लागले (व.१०-११).

**प्रश्न ५: आपल्या विरोधातील शक्ती विषयी हे आपणांस काय शिकविते ?**
**उत्तर:** आपण अशा विरोधाला न घाबरता त्याचा सामना केला पाहीजे. आणि पवित्र आत्म्याचे सहकार्य घेतले पाहीजे. विरोधक कधीच टिकू शकणार नाही.

**प्रश्न ६: येशूच्या संदेशावर कोणी विश्वास ठेवला ?**
**उत्तर:** येशूच्या संदेशावर सिर्ग्य पौल जो सुभेदार होता त्यानी विश्वास ठेवला.

## दुसरा दिवस --प्रे.कृ. १३:१३-४१

**प्रश्न १: संघ सोडून आपल्या घरी कोण परतला ?**
**उत्तर:** मार्क योहान हा बर्णबा व पौल यांना सोडून आपल्या घरी परतला.

**प्रश्न २: पौलाने आपल्या भाषणात देवाचे लोक आणि त्यांच्याबद्दल देवाचे चांगूलपण या विषयी काय म्हटले?**
**उत्तर:** या ठिकाणी पौलाने प्रथम **यहुद्यांचा इतिहास** सांगितला. नंतर **येशूचे जिवन व त्याचे कार्य** , **पापाची क्षमा**, **ख्रिस्ताच्याद्वारे तारण**, आणि शेवटी त्याला **नाकारल्यामुळे होणारा धोका** यासंबधी भाषण केले.

- देवाने इस्त्राएल राष्ट्राला त्याचे लोक म्हणून निवडले.ते मिसर देशात उपरी म्हणून राहीले. देवाने त्यांना त्याच्या पराक्रमी भुजाने मिसऱ्यांच्या **गुलामगिरीतून सोडविले**(व.१७).
- पुढे ते चाळीस वर्षे रानात भटकत असता देवाने त्यांचे **गैरवर्तन सहन केले**.म्हणजे रानात देव त्यांची काळजी घेत होता. लोक कुरकुर करीत होते, तरी देव त्यांच्या **सर्व गरजा भागवित होता**. त्यांने पुजा करण्याकरीता मुर्त्या बनविल्या, त्या कारणाने देवाने त्या यहुदी पिढीला शिक्षा केली.परंतू पुढच्या पिढीला आपली कृपा दाखविली तो त्यांना वचनदत्त भुमी कनान येथे घेऊन गेला. ते इस्त्राएल राष्ट्र आहे. ते राष्ट्र त्याने या लोकांना दिले (स्तोत्र.७८:१२-५५; प्रे.कृ.७:२-४६ स्तेफनाचे भाषण).कनान राष्ट्र त्यांना देण्यासाठी त्या देशातील हित्ती, गिर्गाशी, अमोरी, कनानी, परिज्जी, हिव्वी आणि यबुसी या सात राष्ट्रांतील लोकांना कनानच्या देशाच्या बाहेर हाकलून दिले (अनुवाद.७:१-२).येथे ते साडेचारशे वर्षे राहीले. म्हणजे अंदाजे शास्तेच्या काळापर्यंत असावे.(व.१८,१९).
- कनान देशात आल्या नंतर देवाने त्यांना **शास्ते दिले**. ते त्यांना शमूवेल संदेष्ट्यापर्यंत मिळत राहीले(व. २०).
- यहुद्यानी राजाची मागणी केली देवाने त्यांची तीही मागणी ऐकली व बन्यामिन वंशातला किशाचा पुत्र शौल(१शमू.९:१-२) नावाचा **राजा पहिल्यांदा नियुक्त केला**. पण शोलाने देवाची आज्ञा पाळली नाही व देव त्याच्या विषयी नाराज झाला, आणि त्याला राजपदावरून काढले (१शमुवेल.१३:१३-१४ ; १५:२२-२६,२८). शौलाने चाळीस वर्षे राज्य केले (व.२१)

- त्याच्या जागी दाविद राजा झाला दाविद देवाच्या मनासारखा होता. तो देवाची इच्छा पुर्ण करणारा होता(व.२२; स्तोत्र.८९:२०; १शमू.१३:१४).
- दाविदाच्या वंशातून देवाने एस्त्राएलासाठी **<u>तारणारा उदयास आणला</u>** , जे एस्त्राएल लोक आतुरतेने वाट पाहत होते तोच ख्रिस्त मसिहा आहे याची पौल त्यांना जाणिव करून देत आहे. येशू हा देवाच्या अभिवचनानुसार तारणारा म्हणून आला हे स्पष्ट सांगितले(व.२३).
- बाप्तिस्मा करणारा योहान येशूच्या येण्याअगोदर पश्चातापाच्या बाप्तिस्म्यासंबधी सर्व इस्त्राएल लोकांना सांगत होता.तो यंशूच्या आगमनाची घोषना करीत होता. योहानाने स्वत:हा मसिहा आहे असे म्हटले नाही(व.२४-२५).
- आता तो सर्वांना अब्राहामाच्या वंशातील आहात याची जाणीव करून देतो की, प्रथम तुम्हालाच तारणाची सुवार्ता सुवार्ता सांगण्यात आली. यहुद्यांना अबगाहामाचे पुत्र म्हणतो व परराष्ट्रीयांना देवाचे भय धरणारे असे म्हणतो. संदेश दोघांनाही सारखाच आहे(व.२६).
- आता तो यहुद्यांनी केलेली चुक त्यांना दाखवून देतो. येशूच्या बाबतीत संदेष्ट्यानी केलेली भविष्यवाणी त्यांच्याद्वारे देव कशी पुर्ण करीत होता(यशया.५३:३-१२; प्रे.कृ.२:२३)हे सांगतो (व.२७-२८).
- ख्रिस्ता विषयीची भविष्यवाणी पुर्ण झाली. तो मारला गेला, गाडला गेला व तिसऱ्या दिवशी पुन्हा उठला. ख्रिस्तने मरणावर विजय मिळविला (व.३०).
- पौलाच्या शब्दात शुभवर्तनाची व्याख्या अशी आहे- <u>“ देवाने आमच्या पुर्वजाना जे वचन दिले होते ते त्यानी आम्हा लेकरांसाठी येशू ख्रिस्ताला पुनरूत्थित करून पुर्ण केले आहे”</u>(व.३२-३३).
- येथे पौल म्हणतो नियमशास्त्राने नितिमान ठरत नाही, तर विश्वासाने नितिमान ठरतो. जे पापीजन येशूचा, देवाचा पुत्र म्हणून स्वीकार करतात,त्यांना देव नितिमान ठरवितो. नितिमान ठरविणे हे देवाचे काम आहे.आणि हे कायदेशीर काम देवोच्या मनात ठरते. त्यामुळे एखादा पापी त्याच्या त्याच्या सर्व पापापासून मुक्त होतो.देव एखद्या पाप्याला दोषमुक्त करतो. कारण, पापाचा दंड येशू ख्रिस्ताने वधस्तंभावरील मरणाने भारला आहे.

  पौल येथे सांगत आहे की, ख्रिस्तवरील विश्वासामुळे पापी नितिमान ठरतो. त्याच्या सर्व अपराधाची क्षमा होते.अशा तऱ्हेची पुर्ण सुटका मोशेच्या नियमशास्त्रामुळे होत नाही(व.३९)
- शेवटी तो ताकीद देतो की, देवाने दिलेले तारण नाकारण्याचा तुम्हाला कधीच मोह होऊ नये (हबक्कुक. १:५; यशया.२९:१४ ; निती.१:२४-३१). जे देवाचे वचन तुच्छ मानतात अशा लोकांवर भयंकर विपत्ती आणील म्हणून सावध राहण्यास सांगतो(व.४०-४१).

**प्रश्न३ : त्यांच्या परोपकारीपणावर तो काय म्हणाला ?**
**उत्तर:** चाळीस वर्षे रानात भटकत असता देवाने त्यांचे **<u>गैरवर्तन सहन केले</u>**.म्हणजे रानात देव त्यांची काळजी घेत होता. लोक कुरकुर करीत होते, तरी देव त्यांच्या **<u>सर्व गरजा भागवित होता</u>**.

**प्रश्न ४: मसिहा करीता तयारीवर तो काय म्हणाला ?**
**उत्तर:** दाविदाच्या वंशातून देवाने एस्त्राएलासाठी **<u>तारणारा उदयास आणला</u>** , जे एस्त्राएल लोक आतुरतेने वाट पाहत होते तोच ख्रिस्त मसिहा आहे याची पौल त्यांना जाणिव करून देत आहे. येशू हा देवाच्या अभिवचनानुसार तारणारा म्हणून आला हे स्पष्ट सांगितले(व.२३).

**प्रश्न ५: जे त्याच्या संदेशाचा नकार करतील त्यांना त्याने कोणती ताकीद दिली ?**
**उत्तर:** जर ते देवाची आज्ञा पाळणार नाहीत तर त्यांचा नाश होईल, तुम्हाला कोणी सांगितले तरी तुम्ही विश्वास ठेवणार नाही (हबक्कुक.१:५) या वचनाच्याद्वारे त्यांना ताकीद देतो.

**प्रश्न ६: ह्या उपदेशानी तुमच्यासाठी महत्वाचे काय वाटते ?**
**उत्तर:** नियमशास्त्राच्याद्वारे तारण होत नाही तर विश्वासाने तारण होते. आम्ही ख्रिस्ताच्या सुवार्तेवर विश्वास ठेवला पाहीजे. आणि इतरांना धैर्याने सुवार्ता सागितली पाहीजे.

**तिसरा दिवस-- प्रे.कृ. १३:४२-५२ वाचन करा**

**प्रश्न १: नंतरच्या शब्बाथ दिवशी कोणता प्रतिसाद मिळाला ?**
**उत्तर:** सर्व नगरातील लोक देवाचे वचन ऐकण्यास तयार झाले.

**प्रश्न २: पौल व बर्णबा विरुद्ध कोणची चेतना जागृत झाली ?**
**उत्तर:** अनेक लोकसमुदायाला पाहून यहुदी लोकांना हेव्यामुळे त्यांची चेतना जागृत झाली व पौल आण्धि बर्णबा ययांना विरोध करू लागले.

**प्रश्न ३: शहराबाहेर घालविण्यावर त्यांचे प्रत्युतर काय होते ?**
**उत्तर:** देवाचे वचन तुम्हाला सांगायचे आम्हासाठी अगत्याचे होते पण तुम्ही त्याचा स्विकार केला नाही, तर त्याचा अव्हेर केला व तुम्ही तुमच्या सार्वकालीक जिवनासाठी अयोग्य ठरविले. तेव्हा आता आम्ही परराष्ट्रीयांकडे जातो.

**प्रश्न ६: तुमच्या जिवनातील अडखळण्यावर तुमचे प्रत्युत्तर कसे असते ?**
**उत्तर :** जेव्हा एका गावात सुवार्ता सांगतो तेंव्हा त्या गावातील लोकांनी विरोध केल्यास नाराज न होता दुसऱ्या गावात सुवार्ता सांगण्यास जातो.

**चौथा दिवस -- प्रे.कृ.१४:१-७ वाचन करा**

**प्रश्न १: इकुन्यामध्ये सुवार्ता संदेशावर कोणी सकारात्मक उत्तर दिले?**
**उत्तर:** यहुदी व अनेक परराष्ट्रीयांनी सकारात्मक उत्तर दिले.म्हणजे प्रभू येशूचा स्विकार केला.

**प्रश्न २: कोणत्या वचनाद्वारे पौल आणि बर्णबाच्या सुवार्ता कार्याविषयी माहीती होते ?**
**उत्तर:** वचन ३ मध्ये माहीती होते. विरोध असतानासुद्धा ते देवासाठी धैर्याने बोलत होते.ते आपल्या कृपेच्या वचनाविषयी साक्ष देत होते.

**प्रश्न ३ : इकुन्यामध्ये पौल व बर्णबाच्या सेवेचे परिणाम काय झाले ?**
**उत्तर:** तेथील नगरामधील लोकसमुदायात फूट पडली कीत्येकांनी यहुद्यांची बाजू धरली तर कित्येकांनी प्रषितांची बाजू धरली.(व.४).

**प्रश्न ४: त्यांनी इकुन्या शहर का सोडले ?**
**उत्तर:** विरोधकांनी त्यांना धोंडमार करण्याची योजना आखली, आणि ही योजना त्यांना समजली तेंव्हा त्यांनी इकुन्या शहर सोडले. येशूने म्हटले होते की, जेव्हा एका गावात तुमचा छळ करतात तेव्हा दुसऱ्या गावात पळून जा (मत्तय.१०:२३) या वचनाप्रमाणे त्यांनी केले.

**प्रश्न ५: त्यानंतर ते कोठे गेले ?**
**उत्तर:** लुकवनिया प्रांतातील लुस्त्र व दर्बे ह्या नगरात गेले. आणि तेथे गप्प न राहता सुवार्ता सांगत राहीले.

**पाचवा दिवस -- प्रे.कृ. १४:८-२८ वाचन करा**

**प्रश्न १ : जन्मापासून लंगडया मनुष्याच्या आरोग्यावर कोणते प्रत्युत्तर होते ?**
**उत्तर:** तो जन्मापासूनच लंगडा असल्याकारणाने तो कधीच चालू शकत नव्हता. तो चालावा हेच प्रत्युत्तर होते. महत्वाची गोष्ट म्हणजे तो बरा झाला. पण तो नुसता चालला नाही तर उड्या मारू लागला. हेच खरे प्रत्युत्तर होते.

**प्रश्न २: सत्य देवाविषयी बोलताना पौल जगाच्या निर्मित्तीविषयी का बोलला असावा असे वाटते ? (पाहा रोम.१:१८-३२)?**
**उत्तर:** कारण लोकांनी त्याला देव म्हणून घोषीत केले. लोक त्याला स्वर्गातून उतरलेला देव आहे असे म्हणू लागले. लोक देवाचे गौरव करण्याऐवजी मनुष्याचे गौरव करीत होते. निर्माणकर्त्या ऐवजी निर्मित्तीची भक्ती व सेवा करीत होते. म्हणून पौलाने जगाची निर्मित्ती देवाने कशी केली. तो देव जिवंत देव आहे त्याची जागा मनुष्य घेऊ शकत नाही हे सांगितले(व.११-१५).

**प्रश्न ३: पौलाच्या भाषणाचा सकारात्मक आणि नकारात्मक परीणाम कोणता होता ?**
**उत्तर:** सकारात्मक परिणाम म्हणजे? त्या लोकांनी प्रभूच्या सेवकांसाठी यज्ञबळी देण्याचे थांबवले. पण नकारात्मक परिणाम म्हणजे ? अंत्युखिया आणि इकुन्या येथील यहुद्यांनी त्या लोकांची मने वळवून त्यांना भडकविले आणि हेच लोक त्यांना देव मानीत होते, त्यानीच पौलाल धोंडमार केला.

**imp** यावरून हे दिसते की, माणसे किती चंचल व दोन मनाचे असतात. एका क्षणा अगोदर ते पौलाची पुजा करीत होते व दुसऱ्याच क्षणाला ते त्याच्यावर दगडमार करीत आहेत. काही वेळा अगोदर ते त्याला देवासारखे मानीत होते व दुसऱ्या क्षणाला ते कुत्र्यासारखे त्याचयाशी वागत होते.

**प्रश्न ४: दब्रे वरुन आलेल्या दिर्घकालीन मित्रांची नावे तुम्ही सांगू शकाल काय ? (प्रे.कृ.२०:४ ; फिलीप. २:१९-२१).**
**उत्तर:** मित्रांची नावे पुराचा मुलगा **सोपत्र बिरुयाकर**, थेस्सलनीकरातले **अरिस्तार्ख** व **सकुद**, **गायस दर्बेकर**, **तिमथ्य** आणि आशिया प्रांतातील **तुखिक** व **त्रफिम** हे मित्र होते.

**प्रश्न ५: विरोधा दरम्यान देवाचे कार्य आम्हास काय प्रगट करते ?**
**उत्तर:** विरोध झाला तरी देवाचे कार्य थांबत नाही. उलट जेवढा विरोध वाढतो तितकेच अधिक देवाचे कार्य जोमाने वाढते.

**प्रश्न ६: पौल व सिलाने नविन विश्वासणाऱ्यांना कसे मजबूत केले असे तुम्हास वाटते ?**
**उत्तर:** प्रथम सुवार्ता सांगितली. आणि शिष्य बनवून त्यांची मने स्थिर केली.
विश्वासात चालावे म्हणून बोध करून स्थिर केले.
देवाच्या राज्यात जाण्यासाठी कठीण प्रसंगातून जावे लागेल यासाठी संकटात टिकून राहावे असा बोध केला.
त्यांच्यावर देखरेख करण्यासाठी वडील नेमले.
उपास व प्रार्थना करून त्यांना देवाच्या हातात सोपविले.

**प्रश्न ७: ह्या आढवडयात कोणाला तरी तंम्ही विश्वासात मजबूत करून उत्साहीत करू शकता काय ?**
**उत्तर:** होय . ----------------------------------------------------------

## सहावा दिवस

**प्रकरण ८ -- ‘‘ पौलाची पहिली मिशनरी यात्रा’’**

| | |
|---|---|
| **पाठ** | : अध्याय. १३-१४ |
| **मुख्यवचन** | : प्रे.कृ.३:४७ ‘‘मी तुला परराष्ट्रीयांचा प्रकाश करून ठेवले आहे. ह्यासाठी की,पृथ्वीच्या दिंगतापर्यंत तु तारण व्हावेस’’ |
| **विषय वाक्य** | : पौल व बर्णबा आपल्या पहिल्या प्रवासावर निघतात. ज्यामुळे छळात भर पडली आणि अनेकांना तारण प्राप्त झाले. |
| **जिवन तत्व** | : देवाला व त्याच्या पुत्राला नाकारणे म्हणजे सार्वकालीक घातक परिणाम rपतो. |

## प्रकरण ९ अध्याय १५

**विषय वाक्य** : हेल्लेणी (परराष्ट्रीय)व्यवस्थेच्या बंधनात येतात काय? ह्यावर मंडळी वाद करते, आणि पौल व बर्णबा ज्याला मार्कही म्हणतात त्या येहानावर वाद करतात.

### पहिला दिवस - प्रे.कृ. १५:१-३

**प्रश्न १: यहुदीयातील विश्वासू बांधवानी त्यांच्या विश्वासाबद्दल जे भकीत केले. त्यांच्यात कोणते मतभेद होते ?**

**उत्तर:** काही लोक यहुदातून अंत्युखियात आलेत. हे लोक मुख्यता यहुदी ख्रिस्ती होते आणि ते यरुशलेम मंडळीतले होते. ते ख्रिस्ती झालेले असतानासुद्धा यहुदी नियम पाळणे गरजेचे आहे असा त्यांचा विश्वास होता. म्हणजे तारण व्हावे म्हणून **परराष्ट्रीयांनी सुंता करून घेतली पाहीजे**.त्यानी प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणे पुरेसे नाही , त्यांनी **मोशेच्या नियमशास्त्राप्रमाणे केले पाहीजे**. असे त्यांचे ठाम मत होते. <u>सुंता करणे महत्वाचे आहे यावरुन मतभेद होते.</u> यरुशलेम मधून त्यांना कोणीही पाठविलेले नव्हते(व.१५:२४ मध्ये पाहा).

**प्रश्न २: यहुदियावरून आलेल्या यहुद्यासोबत पौल व बर्णबा सहमत झाले की, नाही ?**

**उत्तर:** सहमत झाले नाहीत. तर हा वाद मिटावा म्हणून त्यांना यरुशलेमेत पाठविण्यात आले.

**प्रश्न ३: पौल व बर्णबा सोबत यरुशलेमेत कोण गेले ?**

**उत्तर:** पौल व बर्णबा यांच्या सोबत त्यांना विरोध करणाऱ्यांपैकी काही लोक संगती गेले.

### दुसरा दिवस -- प्रे.कृ.१५:१२-२१ वाचन करा

**प्रश्न १: पौल व बर्णबाचे यरुशलेमेत कोणी स्वागत केले ?**

**उत्तर:** येरुशलेमेतील मंडळी, प्रेषित आणि वडीलवर्ग यानी त्यांचे स्वागत केले.

**प्रश्न२: हे यहुदी कोण होते ज्यांनी जोर दिला की, विश्वासणाऱ्यांची सुंता व्हावी ?**

**उत्तर:** त्या ठिकाणी **परुशी पंथातील विश्वासणारे यहुदी** यानी जोर दिला की, परराष्ट्रीययांची सुंता झालीच पाहीजे. खरे शिष्य होण्यासाठी मोशेचे नियतशास्त्र पाळलेच पाहीजे. हेच ते यहुदी जे **खोटे शिक्षण देणारे परुशी होते.**

**प्रश्न ३: पेत्राने परराष्ट्रीयांचा बचाव कसा केला ? व देवाला काय माहीत आहे ?**

**उत्तर:** पेत्र म्हणाला देवाने जसा आपणांस तसा त्यांनाही पवित्र आत्मा देऊन साक्ष दिली आहे. देवाने त्याला कर्नेल्य व त्याच्या कुटूंबाला सुवार्ता सांगण्याची आज्ञा कशी दिला हे त्याने सांगितले (१०:१९-२०). देवाने यहुदी व परराष्ट्रीय यात फरक केला नाही (१०:३४). माणूस त्याचे कार्य किंवा जन्म यानी शुद्ध किंवा नितिमान होत नाही तर केवळ विश्वासाद्वारे होतो. पेत्र पुढे म्हणाला '' शिष्यांच्या (परराष्ट्रीय ख्रिस्ती) मानेवर जोखड (यहुदी नियम)घालू नका कारण आपण व आपले पुर्वजही ते वाहवयास समर्थ नव्हते. अशा प्रकारे पेत्राने परराष्ट्रीयांचा बचाव केला.

**यहुदी नियम हे जोखडासारखे** आहेत.परुशांसंबधी येशू म्हणाला की, '' जड अशी ओझी बांधून ते लोकांच्या खांद्यावर देतात''(मत्तय.२३:४).पेत्राला कळाले होते की, येशूचे ओझे सोयीचे व हलके आहे(मत्तय. ११:२८-३०). देवाला लोकांच्या मनात काय आहे हे त्याला माहित आहे. तो हृदय जाणणारा देव आहे.

**प्रश्न ४ : पेत्राने एका व्यक्तीच्या तारणाबद्दल काय म्हटले ? काय त्याच प्रमाणे आमचे तारण झाले आहे ?**

**उत्तर:** नियमाचे पालन करून तारण प्राप्त करु शकत नाही. तारण केवळ कृपेने विश्वासाच्याद्वारे प्राप्त करु शकतो. होय आमचे कृपेने विश्वासाच्याद्वारे झाले आहे.

## तिसरा दिवस -- प्रे.कृ.१५:१२-२१

**प्रश्न १: याकोबाने हेल्लेण्यांना स्विकारण्याबद्दल काय म्हटले ?**

**उत्तर:** याकोब हा येशूचा लहान भाऊ आहे.त्यावेळी तो यरूशलेमेतील मंडळीचा मुख्य पुढारी होता. याकोबाने पेत्राच्या भाषणाला सहमती दर्शवली. याकोबाने अमोस.९:११-१२ या वचनाचा आधार घेऊन त्याने आपले मत मांडले की, परराष्ट्रीयांना सुंता करणे किंवा यहुदी नियम पाळणे गरजेचे नाही. आणि जे परराष्ट्रीयांतून देवाकडे वळतात त्यांना त्रास देऊ नये. **देवाने दिलेल्या गोष्टीपेक्षा इतर कोणत्याही गोष्टींची गरज तारण मिळविण्यासाठी गरजेची नाही.** केवळ ख्रिस्तावर विश्वास हवा आहे, त्यात माणसानी भर घालू नये.

याकोबाने परराष्ट्रीयांना तिन गोष्टी पाळावयास सोगितल्या.

१. मुर्तीला अर्पण केलेले मांस खाऊ नये.
२. सर्व प्रकारच्या लैंगिक स्वैराचारापासून दूर राहावे.
३. गळा दाबलेले प्राणी व रक्त ह्यापासून अलिप्त राहावे.

**प्रश्न २: त्यांच्या दिवशी कोणती भविष्यवाणी पुर्ण झाली ?(बघा. आमोस.९:११-१२ ; यिर्मया.१२:१५ ; यशया.४५:२१).**

**उत्तर:** आमोस संदेष्टयाने असे लिहले की, देव दाविदाचे पडलेले मंदीर पुन्हा बांधील(व.१६). म्हणजे देव दाविदाचे राज्य पुन्हा स्थापन करील म्हणजेच ख्रिस्तची मंडळी उभारील. शेष राहीलेली माणसे म्हणजे यहुदी(व. १७). ज्यानी ख्रिस्तावर विश्वास ठेवला (रोम.९:२७ ; ११:५ वाचा) म्हणून आमोसच्या भविष्यानुसार, देव ख्रिस्ताचे राज्य स्थापन करील. त्या मंडळीद्वारे यहुदी व परराष्ट्रीय देवाला शोधतील व प्राप्त करतील.

**प्रश्न ३: याकोबास (जो येशूचा भाऊ होता) एक पुढारी म्हणून कसे वर्णन कराल ?**

**उत्तर:** याकोब हा एक असा पुढारी होता की, त्याने दोघांनाही व्यवस्थित **सांभळून** घेतले.कारण यहुदी व परराष्ट्रीय यानी **प्रीतीने सहभागीता** करावी. एकमेकांना **प्रीतीने जोडणारा** असे आपण त्याला म्हणू शकतो. आणि त्यांच्यामधील **दुरावा कमी करण्यात** याकोब यशस्वी झाला.

**प्रश्न ४: असहमतीला सोडविण्याकरीता कोणते समापण याकोबाने सुचविले ?**

**उत्तर:** याकोबाने असहमतीला सोडविण्यासाठी तिन गोष्टी संगितल्या.

**१.** मुर्तीला अर्पण केलेले मांस खाऊ नये. **२.** सर्व प्रकारच्या लैंगिक स्वैराचारापासून दूर राहावे. **३.** गळा दाबलेले प्राणी. **४.**रक्त ह्यापासून अलिप्त राहावे.(व.२०).

**१.मुर्तीचे अमंगळपण** - अमंगळपण म्हणजे मुर्तीला अर्पण केलेले पदार्थ. त्यांनी जर हे पदार्थ खाल्ले तर यहुदी बांधवाना शंका वाटेल की,त्याने खरेच मुर्तीपुजा बंद केली का? परराष्ट्रींयांना असे पदार्थ खाण्याची मोकळीकता होती.तरी अशक्त यहुदी बांधवाना ते अडखळण ठरले असते.त्यामुळे तसे पदार्थ खणे चुकीचे होते.

**२.जारकर्म -** परराष्ट्रीयांमध्ये हे प्रमुख पाप होते.त्यामुळे याकोबाने त्याचा उल्लेख केला आहे.जारकर्म करण्यासाठी पवित्र शास्त्रात कधीच उत्तेजन दिले नाही.जारकर्म करू नये हे सर्व युगासाठी आज्ञापीले आहे.

**३.** गळा दाबुन मारलेले प्राणी - देवाने जलप्रलयानंतर नोहाशी केलेल्या करारात तशी आज्ञा दिली होती(उत्पत्ती९:४).केवळ इस्त्राएलासाठी नव्हे तर सर्वांसाठी ती आज्ञा आहे.

**४. रक्त -** हेही उत्पत्ती ९:४ मध्ये लिहले आहे.मोशेच्या नियम शास्त्राच्या आधीची ती आज्ञा होती.नोहाशी केलेला करार रद्द झाला नाही म्हणून त्या आज्ञा आजही लागू आहेत.

या सुचना देण्याचे कारण की, सर्व नगरामध्ये यहुदी राहत होते.याकोबाने सांगितलेल्या गोष्टी यहुद्यांनी करू नयेत असे त्यांना सांगण्यात येत असे.मुर्तीचे अमंगळपण, जारकर्म, गळा दाबून मारलेले प्राणी, रक्त खाणे यया सर्व गोष्टी चुकीच्या होत्या, म्हणून परराष्ट्रीयांनी अशा गोष्ओी करून देवाला का दुखवावे आणि इतर मनुष्यांनापण का दुखवावे. म्हणून या सुचना दिल्या आणि त्या सर्वांनी मान्य केल्या. अशा प्रकारे यहुदी आणि परराष्ट्रीय यांच्यामधील जो तिढा होता तो सामोपचाराने सोडविला.अशा प्रकारे शेवटी ठरले की,तारण व्हावे म्हणून परराष्ट्रीयांनी सुता करू नये.

**चौथा दिवस -- प्रे.कृ.१५:२२-३५ वाचन करा**

**प्रश्न १: अंत्युखियाला जाण्याकरीता निवडलेल्या लोकांच्या नावाची यादीतील नावे सांगा ?**

**उत्तर:** पौल, बर्णबा, बर्शबा म्हटलेला यहुदा, व सीला यांना अंत्युखियामध्ये ताण्याकरीता निवडले.

**प्रश्न २: ते कोणत्या प्रकारचे लोक होते ?**

**उत्तर:** यहुदा व सीला हे संदेष्टे होते(व.३२)

**प्रश्न ३: ह्या पत्राचे अंत्युखिया मंडळीत कोणते परीणाम झाले?**

**उत्तर:** त्यांना आनंद झाला.यहुदी व पराराष्ट्री ख्रिस्ती लोकांमध्ये जी दुफळी माजणार होती ती टळली.

**प्रश्न ४: नव्या विश्वासणाऱ्यांसाठी संवेदनशील होण्याकरीता धडा सांगा जो तुम्ही उपयोगात आणू शकता ?**

**उत्तर:** ------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------

**प्रश्न ५: अंत्युखियामध्ये विश्वासणाऱ्यांची सेवा करण्यासाठी यरूशलेमपासून मार्गाची नावे तुम्ही सांगू शकता काय ?**

उत्तर: ------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------




**पाचवा दिवस -- प्रे.कृ.१५:३६-४०**

**दुसऱ्या एका मिशनरी प्रवासावर जाण्याची पौलाची इच्छा होती ?**

**उत्तर:** दुसऱ्या मिशनरी प्रवासावर जाण्याची पौलाची इच्छा होती (व.३६).

**प्रश्न २: पौल व बर्णबा मध्ये कोणत्या विषयावर असहमती होता?**

**उत्तर:** पौल व बर्णबा मध्ये **योहानाला बरोबर घेण्यावरून** असहमती होती. बर्णबाची इच्छा होती की, योहानाला बरोबर घ्यावे पण पौलाची इच्छा नव्हती, कारण पहिल्या फेरीमध्ये योहान त्यांना पंफूल्याहून सोडून गेला होता (प्रे.कृ.१३:१३).

**प्रश्न ३: ह्या विभक्तपणाचे किंवा मित्रांच्या विभाजनांचे सकारात्मक किंवा नकारात्मक परिणाम सांगा ?**

**उत्तर:** नकारात्मक परिणाम म्हणजे ,पौल व बर्णबा मध्ये तिव्र मतभेद निर्माण झाले. आणि वेगळेपणा आला.

यातील सकारात्मक परिणाम म्हणजे, पौल व मार्क हे दोघे एकमेकांपेक्षा भिन्न हाते. पौलाची आत्मिक स्थिती त्या पेक्षा वेगळी होती.जर मार्क पौलाच्या अधिकाराखाली राहीला असता तर त्याचा पाहीजे तितका आत्मिक विकास झाला नसता.त्याला वेळ मिळाला नसता. बर्णबाला असे वाटलले होते की, इतक्या वेळेपर्यंत योहानमार्क हा प्रौढ व प्रभावी असा शिष्य होईल.पण तसे झाले नव्हते.

बर्णबा मार्कला पौलापेक्षा अधिक वेळ त्याच्या आत्मिक उन्नतीसाठी देऊ शकत होता. त्याला मदत करू शकत होता.यामुळे बर्णबा व मार्क दुसऱ्या दिशेने गेले.ते सर्व **मार्काच्या उन्नतीसाठी** झाले. पौल व सीला हे दुसरीकडे सेवा करू लागले.याचा परिणाम शेवटी असा झाला की, मार्क हा बर्णबाच्या परिक्षेत खरा उतरला. पुढे हाच मार्क पेत्राचा महत्वाचा सोबती झाला.त्याने नविन करारातील 'मार्काचे शुभवर्तमान' हे पुस्तक लिहले. आणि काही काळानंतर मार्क हा पौलाचा जवळचा सोबती झाला(कलस्सै.४:१० ; २तिमथ्य.४:११ ; फिलेमोन २४).

**प्रश्न ४: वागणुकी साठी ह्यातून तुम्हास कोणती मदत किंवा आव्हान मिळते ?**

**उत्तर:** ------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------
----------------------------------------------------------------------

## सहावा दिवस

## प्रकरण : ९ '' बंधुजनांमध्ये वाद उत्पन्न होतो (दुसरा मिशनरी प्रवास)

| | |
|---|---|
| **पाठ** | : अध्याय.१५ |
| **मुख्यवचन** | : प्रे.कृ.१५:९ '' त्यानी त्यांची अंतकरणे विश्वासाने शुद्ध करुन त्यांच्यामध्ये व आपल्यामध्ये काही भेद ठेवला नाही'' |
| **विषय वाक्य** | : मंडळीत वाद चिघळतो की,हललेणी व्यवस्थेच्या बंधनात येतात की नाही, आणि पौल व बर्णबा ज्याला मार्क म्हणत त्या योहाना विषयी वाद करतात. |
| **जिवन तत्व** | : विश्वासीजन ज्या प्रमाणे जगतात, प्रगट करतात की, ते देवाद्वारे वेगळे केलेले लोक आहेत. |

## प्रकरण 10 — अध्याय 16–17

**विषय वाक्य :** पौल यहुद्यांसोबत आणि ग्रिंकासोबत वचनाच्याद्वारे आणि सृष्टिच्याद्वारे वादविवाद करतो.

**<u>पहिला दिवस</u> —प्रे.कृ. 16:1–10 वाचन करा**

**प्रश्न 1: तिमथ्याच्या पृष्ठभुमिचे वर्णन करा ?**

**उत्तर::** पौल व सीला किलिकिया येथून गलती प्रांतात आले.आणि पहील्या सुवार्तेफेरीत दर्बे , लुस्त्र ,इकुन्या या शहरात सुवार्ता सांगितली होती तेथे भेटी दिल्या आहेत. त्यावेळस पौला बरोबर बर्णबा होता परंतू आता त्याच्या बरोबर सीला होता. जेव्हा हे दोघे लुस्त्रात आले तेव्हा तो तिमथ्य नावाचा व्यक्ती याला भेटला आणि या तिमथ्याला संगती घ्यावे असा त्यांनी निर्णय घेतला. कारण पहील्या फेरीत पौलाने या ठिकाणी सुवार्ता सांगितली होती. तेव्हा तिमथ्या हा त्याचा शिष्य झाला होता. आणि **<u>तिमथ्याला लुस्त्र शहरात आणि इकुन्यात नावाजित होते.</u>**

**तिमथ्याची सुंता** :– –

तिमथ्याची सुंता करण्यात आली याचे कारण की, **<u>तिमथ्य हा अर्धा यहुदी आणि अर्धा परराष्ट्रीय होता.</u>** **<u>तिमथ्याचा बाप हा हेल्लेणी</u>** होता. आणि त्याची **<u>आई युनीके ही देवाला भिणारी यहुदी ख्रिस्ती होती</u>**(2तिमथ्य.1:5). तिमथ्य हा यहुदी म्हणून वाढल्या कारणाने यहुदी धर्माप्रमाणे त्याची सुंता होणे आवश्यक होते **(यहुदी लोक, यहुदीपण पित्याच्या नव्हे तर आईच्या घराण्यात मोजतात)**.कारण पौलाला वाटले असावे की तिमथ्य हा पुर्ण यहुदी व्हावा.म्हणजे सभास्थानात सुवार्ता सांगण्यास अधिक मदत होईल.

नविन करारात अनेक ठिकाणी तारण मिळण्यासाठी सुंता गरजेची नाही असे पौल म्हणतो "सुंता होणे काही नाही व सुंता न होणेहि काही नाही तर देवाच्या आज्ञा पाळणे हेच सर्व काही आहे"(1करिंथ.7:19 ;गलती.5:26,6:15). पौलाने तिमथ्याला त्याचे तारण व्हावे म्हणून सुंता करण्यास सांगितले नाही .**तिमथ्याचे तारण विश्वासाच्याद्वारे अगोदरच झाले होते**,परंतू त्याच्याकढून अनेक यहुदी लोक ख्रिस्ताकडे यावे ही त्याची अपेक्षा होती. म्हणून त्यांनी तिमथ्याची सुंता केली. पौलाचा एकच उद्देश होता तो म्हणजे यहुदी व परराष्ट्री यांना ख्रिस्ताकरीता जिंकणे. म्हणून पौल म्हणतो *" यहुदी लोक मिळविण्यासाठी मी सहूदी लोकांना यहुद्योसारखा झालो नियमशास्त्राधिन लोक मिळविण्यासाठी मी नियमशास्त्राधिन नसता, त्यांना नियमशास्त्रासारखा झालो"***(1करिंथ.9:20)**. अशा प्रकारे पौलाने तिमथ्याला दुसऱ्या प्रवास फेरीत संगती घेतले. आणि पौल ज्या ज्या ठिकाणी गेला त्या ठिकाणी त्यांने यरूशलेमेतील धर्मसभेतील नियम सांगितले(प्रे.15:28–29). अशा प्रकारे अनेक मंडळया स्थिर झाल्या आणि आणि दिवसेंदिवस त्यांची संख्या वाढत गेली असे आपण पाहतो.

**प्रश्न 2: दुसऱ्या मिशनरी प्रवासातील तीन सोबत्यांची नावे सांगा ?**

**उत्तर::** सिला, तिमथ्य आणि पुस्तकाचा लेखक लुक हे तिघे साबती होते.

**प्रश्न 3: अशियाला जाण्यापासून पौलाला कोणी अडवून ठेवले ?**

**उत्तर:** आशिया प्रांतांतून जाण्यासाठी त्यांना पवित्र आत्म्याने अडविले.

**प्रश्न 4: पौलाविषयी देवाला परिवर्तनासाठी कोणती इच्छा होती आणि त्याने त्या परिवर्तनास कसे प्रत्युत्तर दिले?**

**उत्तर:** देवाची इच्छा होती की, त्याने आशिया प्रांतात जाऊ नये. म्हणून ख्रिस्ताच्या आत्म्याने त्यांना त्या ठिकाणी जाऊ दिले नाही. म्हणून ते त्रोवासला गेले.या शास्त्रभागात आपल्याला आढळते की. प्रेषितांचे मिशनरी कार्य हे त्यांच्या स्वतःच्या सामर्थ्याने किंवा बुद्धिने झाले असे नाही तर ते सर्व कार्य पवित्र आत्म्याच्या मार्गदर्शनाने झाले आहे हे या ठिकाणी स्पस्ट दिसते. कोठे जावे, कसे जावे,काय करावे हे सर्व पवित्रआत्मा सांगत होता. पवित्रआत्मा त्यांचा पुढारी होता. पवित्र आत्म्याच्या आदेशानुसारच एक विश्वासू अविश्वासी व्यक्तीपर्यंत शुभवर्तमान पोहचवू शकतो.

या भागामध्ये प्रेषितांना **तिन वेळा मार्गदर्शन** मिळालेले आपण पाहतो.पौलाची योजना होती की, आशिया प्रांतात वचन सांगावे परंतू पवित्रआत्म्याने त्यांना **युरोप देशात पाठविले**. देवाची योजना फक्त आशिया प्रंतासाठीच नव्हती तर सर्व जगासाठी होती म्हणून देवाने त्यांना त्यांचे मार्ग बदलले.

**आशिया प्रांत** :–– आशिया हे रोमी साम्राज्य होते.एजियन समुर्दाच्या किनाऱ्यावर फ्रुगियाच्या पश्चिमेस येते. इफिस व पर्गम ही त्यातील दोन महत्वाची शहरे होती. फ्रुगिया व गलतीया फ्रुगिया आशिया मायनारमध्ये येते. आशिया प्रांतात वचन सांगण्यास पवित्र आत्म्याकडून प्रतिबंध झाल्यामुळे प्रेषित फ्रुगिया व गलतीया मधून मुसियापर्यंत आले. तेथे आल्यांनंतर त्यांनी बिथुनियास जाण्याचा

प्रयत्न केला. परंतू **पुन्हा येशूच्या आत्म्याने त्यांना थांबवले.** तेव्हा ते मुसियाजवळून त्रोवासला गेले. त्रोवासला पौलाला दृष्टांन्त झाला की मासोदोनियात जावे.

या ठिकाणी आपण पाहतो कि, **पवित्र आत्मा प्रेषितांना चालवत आहे.** प्रषितांचे कृत्ये हे खरे पाहीले असता **पवित्र आत्म्याचे कार्य आहे.** प्रेषित पौलाने कुठल्या नगरात जावे,व कुठल्या नगरात जावू नये ह्याचे मार्गदर्शन पवित्र आत्मा करीत होता. पवित्र आत्मा लोकांना मार्गदर्शन करतो. दुसरी ममहत्वाची गोष्ट म्हणजे पौलाबरोबर सीला होता आणि सीला हा संदेष्टा होता (प्रे.15:32).

**प्रश्न 5: जर देव तुम्हाला निवडतो तर तुम्ही देवाला तुमची दिशा बदलू देणार काय ?**
**उत्तर:** होय. कारण आम्ही आपम्च्या इच्छेने किंवा आमच्या सामर्थ्याने कार्य करू शकत नाही.

**प्रश्न 6: वचन 10 मध्ये "आम्ही" हा शब्द बघा, आणि पौला सोबत प्रवास करणारा कोण व्यक्ती होता ते सांगा ?**
**उत्तर:** या पौलाच्या सुवार्ता फेरीमध्ये या पुस्तकाचा लेखक **'लुक'** सुद्धा यांच्या संगती आहे. तो या सर्व गोष्टींचा साक्षीदार आहे. कारण वचन 10 मध्ये याची पृष्टी ("देवाने **आम्हास** बोलाविले") केली आहे. याचाच अर्थ असा की, लुक त्यांच्या संगती होता असे दिसते.

## <u>दुसरा दिवस</u> — प्रे.कृ. 16:11–41

**प्रश्न 1: नदीकाठावर कोण पौलाची वाट पाहत उभा असतो ?**
**उत्तर:** परमेश्वराला भिणाऱ्या व खऱ्या देवाची आराधना करणाऱ्या स्त्रिया तेथे वाट पाहत होत्या.

**पश्न 2: लुदियाच्या बाबती तुम्हाला काय माहीत आहे आणि तिने पौलाच्या संदेशाचा कसा स्विकार कले ?**
**उत्तर:** ती एक भक्ती करणारी स्त्री होती. ख्रिस्तवर विश्वास ठेवला तंव्हा ती पहिली यरोपीयन ख्रिस्ती ठरली असावी.
तिचे नाव लुदिया असे होते. ती बहुदा यहुदी झाली असावी .
आशिया मायनार येथील लुदिया जिल्ह्यातील थुवतीरा या शहरात राहणारी होती. ती फिलीप्पै येथे स्थलांतरीत झाली होती. तेथे ती जांभळे वस्त्र विकत होती. किंवा वस्त्रे रंगविण्याकरीता लागणारा जांभळा रंग विकत होती. कारण थुवतीरा हे ठिकाण रंगीत कपड्यासाठी प्रसिद्ध होते.

तिचे कान व ह्रदय देवाच्या सुवार्तेसाठी उघडे होते. प्रभू येशूचा स्विकार केल्यानंतर तिचा व तिच्या घराण्याचा बाप्तिस्मा करण्यात आला होता. बाप्तीस्मा होण्याआधी तिच्या घरातील लोकांचे परिवर्तन झाले होते. तिचा विवाह झाला की नाही याबाबत माहति नाही. तिच्या घरातील माणसे म्हणजे तिचे चाकर असावेत.

लुदियाचे तारण तिने सत्कर्मे केले म्हणून झाले नाही तर उलट तारण झाल्यामुळे ती सत्कर्मे करीत होती. पौलासाठी तिने तिच्या घराचे दार उघडे केले. ययावरून तिचा विश्वास दिसतो. पौलाबरोबर सीला,लुक आणि तीमथ्य यांचा तिने पाहुणचार केला.

**प्रश्न 3: ह्या लोकांना या प्रवासात कशाप्रकारचा विरोध झाला आणि त्यांने त्याच्यावर कशा प्रकारे विजय मिळवला ?**
**उत्तर:** या प्रवासात त्यांना एक मुलगी भेटली तिच्या अंगात येत असे . लोक तिला दैवी प्रश्न विचारीत असत. तिच्यामध्ये पिशाच येई व ती त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देत असे. अशा गोष्टीमुळे ती आपल्या धन्यांना पुष्कळ मिळकत करून देत असे. ती मुलगी यांना भेटली. व लोकांना सांगत असे की, " हे देवाचे लोक आहेत, हे तुम्हाला तारणाचा मार्ग शिकवितात" ती सत्य बोलत होती परंतू पिशाचाची साक्ष पौलाला नको होती.म्हणून पौलाने तिच्यामधून पिशाचाला येशूच्या नावानू काढून टाकले व तिला मुक्त केले.

त्या मुलीची तच्या मध्ये असलेल्या भुतापासून सुटका झाल्यामुळे तिच्या धन्यांची मिळकत बंद झाली.म्हणून त्यांनी पौल व सीला यांना धरून त्यांनी अमलदाराडे नेले. आणि म्हटले, हे यहुदी लोक आपल्या नगररातील लोकांना त्रास देताता आणि आम्हा रोमन लोकांना जे आम्हाला योग्य नाही ते स्विकारावयास सांगतात. रोमी जिवनाला बाधा आणणारे हे लाक आहेत.

तेव्हा तेथील अधिकाऱ्यांनी त्यांची वस्त्रे काढली, आणि त्यांना छड्याने मारले, आणि त्यांना साखळ दंडाने बांधून बंदीखाण्यात घातले. अशाप्रकारे त्यांचा छळ करण्यात आला. एका मुलीला तिच्यामध्ये असलेल्या पिशाच या पासून तिची सुटका केल्यामुळे त्यांना कोडे खवे लागले.

अशा स्थितीत असताना सुद्धा ते न घाबरता देवाची देवाची स्तुतीआरधाना करित होते. देवाने त्यांना त्याच्यातून अद्भूत रितीने सोडविले. ते मोकळे झाले तरी तुरूंगातून पळून न जाता तेथेच थांबले याच्याद्वारे त्यांनी तुरूंगाच्या नायकांचे मन परिवर्तन केले आणि त्यांचे तारण झाले. त्यांने त्यांच्यावर अशा प्रकारे विजय मिळविला.

**प्रश्न 4: तुमच्या जिवनातील विरोधामुळे प्राप्त झालेल्या सार्वकालीक आशिर्वादाचे वर्णन करा ?**
**उत्तर:** ————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

**प्रश्न 5: नगर सोडण्यापुर्वी पौलाने काय केले ?**
**उत्तर:** लुदियाच्या घरी गेले आणि तेथील बंधूजनांना भेटून त्यांना धीर दिला. आणि मग ते मार्गस्थ झाले(व.40).

## <u>तिसरा दिवस</u> — प्रे.कृ. 17:1–15

**प्रश्न 1: थेस्सलनीका येथे पाहचल्यावर पौल कोठे गेला आणि त्याने लोकांना काय शिकविले ?**
**उत्तर:** प्रथम तो तेथील सभास्थानात गेला. **"ख्रिस्ताने दु:ख सोसावे आणि मरणातून पुन्हा उठणे "हे अगत्याचे आहे** असा तो संदेश देतो. यहुदी शास्त्राच्या प्रमाणे म्हणजेच जुन्या कराराप्रमाणे जुन्या करारातल्या संदेष्टयानी ख्रिस्त पुन्हा येणार आहे याचे भविष्य केले होते. " हाच येशू ख्रिस्त आहे" असे पौल ठामपणे सांगत आहे(व.3). ख्रिस्ताची (मसीहाची) यहुदी लोक वाट पाहत होते (लुक.24:25–27 ; 45–46 ; 1करिंथ15:3–4).

प्रश्न 2: वेगवेगळया लोकांपासून प्राप्त अनुभवाचे वर्णन करा ?
उत्तर: ————————————————————————————————————

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

**प्रश्न 3: त्यांच्यासाठी कोणी समस्या उभी केल? का ?**
**उत्तर** त्यांच्यासाठी थेस्सलनीकामधील यहुद्यांनी समस्या निर्माण केली. कारण अनेक लोकांनी त्याच्या शिक्षणाचा स्विकार केला व पुष्कळ भक्तीमान परराष्ट्री लोक यहुद्यांना सोडून पौल व सीला यांना येऊन मिळाले म्हणून त्यानी विरोध केला.

## <u>चौथ्या दिवस</u> – प्रे.कृ. 17:10–15

प्रश्न 1: रात्रीच्या समयी पौल व सीलाला कोणी पाठविले?
**उत्तर:** थेस्सलनीकामधील बंधूजनानी पौल व सीला यांना बिरूयास पाठविले. ख्रिस्तने शिष्यांना म्हटले होते,"जेव्हा तुमचा एका ठिकाणी छळ ापतो तेव्हा दुसऱ्या ठिकाणी निघून जा"(मत्तय.10:23). **imp** *परंतू विश्वासू लोक स्वत:ला लपविण्याकरीता दुसऱ्या स्थळी पलायन करीत नाहीत तर ते दुसऱ्या ठिकाणी सुवार्ता सांगण्याकरीता व साक्ष देण्याकरीता जातात.*

**प्रश्न 2: बिरूया लोकांचे वर्णन करणारे शब्द सांगा ?**
**उत्तर:** बिरूया येथील लोक थेस्सलीनीकातल्या लोकांपेाा मोठया मनाचे होते. म्हणजेच मोकळया मनाचे होते.त्यांनी पौल यानी सांगितलेली सुवार्ता उत्सुकतेने ऐकली. पौल जे काही सांगत होता ते त्यांनी शस्त्राशी तोलून पाहीले. जुन्या कराराशी तोलून पाहीले.

**imp** आपण सुद्धा बिरूया लोकांसारखे केले पाहीजे.जेव्हा आपण नविन शिक्षण घेतो तेव्हा पवित्रशास्त्रात जे लिहले आहे,त्याच्याशी ते जुळते काय हे आपण तोलून पाहीले पाहीजे. जर का जुळत नसेल तर ते आपण नाकारले पाहीजे.

**प्रश्न 3: बिरूयात चिथवण्यासाठी कोण आले होते ?**
**उत्तर:** थैस्सलनीकातले यहुदी बिरूयातील लोकांना चिथावण्यासाठी आहे.(व.13).

————————————————————————————————————————

————————————————————————————————————————

**प्रश्न 4: बिरूयात कोण राहीले आणि कोण सोडून गेले ?**
**उत्तर:** बिरूयात <u>**सीला**</u> **व** <u>**तिमथ्य**</u> हे दोघे राहीले आणि पौल सोडून गेला.(व.14).

————————————————————————————————————————

## <u>पाचवा दिवस</u> — प्रे.कृ.17:16–34

**प्रश्न 1: जेव्हा पौल सीला व तिमथ्याची अथेनमध्ये वाट बघत होता, तेव्हा कोणत्या गोष्टीने तो व्यथित झाला ?**

**उत्तरः** अथेन हे शहर मुर्तीपुजकानी भरलेले होते हे पाहून तो व्यथीत झाला. <u>(तिनशे ते पाचशे वर्षे ख्रिस्ताअगोदर अथेनै हे पाश्चिमात्य जगातील एक महत्वाचे शहर होते. ते शहर ग्रीक राजाची राजधानी होती. पाश्चिमात्य जगातील सुप्रसिद्धा असे तत्वानी अथैनै येथे राहत असत. **लोकशाहीची कल्पना प्रथम अथैनै येथून सुरू झाली**. त्या मुळे अथेनैला आजही लोकशाहीचे जन्तस्थन म्हणतात.)</u>

**प्रश्न 2: अथेन येथील लोकांचे आणि पौलाविषयीच्या त्यांच्या विचाराचे वर्णन कसे कराल ?**

**उत्तरः** या ठिकाणी पौल जिवंत देव जो निर्माणकर्ता आहे हे तो दाखवून देतो. कारण या ठिकाचे लोक मुर्तीवर विश्वासठेवणारे होते. म्हणून तो म्हणतो की, " ज्या देवाने जग व त्यातले अवघे निर्माण केले तो स्वर्गाचा व पृथ्वीचा प्रभू असून हाताने बांधलेल्या मंदीरात राहत नाही (व.24).

**प्रश्न 3: त्यांच्यासाठी अज्ञात देवाविषयी असलेली वाक्यरचना आणि वचने सांगा ?**

**उत्तरः** पौल म्हणतो मी फिरत असता मला " <u>*अज्ञात देवाला*</u>" ही अक्षरे वेदीवर लिहलेली आढळली. ज्याचे तुम्ही <u>*अज्ञानाने भजन*</u> करता (व.22–23)

**प्रश्न 4: देव सर्व सृष्ट वस्तुत नव्हे परंतू त्याने ते सर्व निर्माण केले आहे हे सांगणसारे चाक्य व वचने सांगा ?**

**उत्तरः** ज्या <u>*देवाने जग व त्यातले अवघे निर्माण केले*</u> तो स्वर्गाचा व पृथ्वीचा प्रभू असून हाताने बांधलेल्या मंदीरात राहत नाही (व. 24). ..............................................................................................................

..............................................................................................................

**प्रश्न 5: देव आपल्या निर्मितीपासून लांब नाही. परंतू प्रत्येक व्यक्तीच्या जवळ राहतो हे सांगणारे वाक्य व वचने सांगा ?**

**उत्तरः** "…. आपल्यापैकी कोणापासूनही दुर नाही" " कारण आपण त्याच्या ठायी जगतो वागतो व आहो" (व.27 – 28). ................

..............................................................................................................

..............................................................................................................

**प्रश्न 6: देव सर्व विश्वाला नियंत्रणात राखतो हे सांगणारे वाक्य व वचने सांगा ?**

**उत्तरः:** " आणि त्याला काही उणे आहे असे म्हणून माणसाच्या हातून त्याची सेवा घडावी असेही नाही,कारण <u>*जीवन प्राण व सर्व काही तो स्वत:हा सर्वांना देतो*</u>" (व.25). ..............................................................................................................

..............................................................................................................

**प्रश्न 7: देवाने भौगोलिक सीमारेषा आणि ऐतिहासीक घडामोडी नेमलेल्या आहेत हे सांगणारे वाक्यरचना आणि वचने सांगा ?**

**उत्तरः** "आणि त्याने एकापासून माणसाची सर्व राष्ट्रे निर्माण करून त्याने पृथ्वीच्या सबंध पाठीवर रहावे असे कले आहे,आणि त्याचे <u>**नेमलेले समय व त्याच्या वस्तीच्या सीमा त्याने ठरविल्या आहेत"**</u> (व.26). ..............................................................................................................

..............................................................................................................

**प्रयन 8: देवाची कधीही मुर्ता किंवा प्रतिमेद्वासरे आरधना होऊ शकत नाही हे सांगणारे वाक्य व वचने सांगा ?**

**उत्तरः** "आपण देवाचे वंशज असताना मनुष्यच्या चातुर्याने व कल्पनेने कोरलेले <u>*सोने, रूपे व पाषाण, ह्मांच्या आकृतीसारखा देव आहे असे आपल्याला वाटता कामा नये*</u>(व.29) ..............................................................................................................

..............................................................................................................

**प्रश्न 9: देव जगाचा न्याय करील हे सांगणारे वाक्य व वचने सांगा ?**

**उत्तरः** " त्याने असा एक दिवस नेमला आहे की,ज्या दिवशी तो आपण नेमलेल्या मनुष्याच्याद्वारे जगाचा <u>*न्यायनिवाडा*</u> नितिमत्वाने करणार आहे, त्याने त्याला मेलेल्यातून उठवून ह्याविषयीचे प्रमाण सर्वांस पटविले आहे.(व.31)

**प्रश्न 10: देव पाप्यांना पश्चातापाची आज्ञा देतो हे सांगणारे वाक्य व वचने सांगा ?**
**उत्तरः** '' अज्ञानाच्या काळाकडे देवाने डोळेझाक केली, परंतू आता सर्वांनी सर्वत्र *पश्चाताप* करावा अशी तो माणसांना आज्ञा करतो(व.30). ..........................................................................................................................................

..........................................................................................................................................

**प्रश्न 11: वरील पैकी कोणते उत्तर तंम्हाला महत्वाचे वाटते ?**
**उत्तरः** सर्वांनी *पश्चाताप करावा* हेच उत्तर महत्वाचे वाटते. ..........................................................................

..........................................................................................................................................

## सहावा दिवस —

**प्रकरण 10 :—** '' सर्व काही सर्व मनुष्यासाठी'' (दुसरी सुवार्ताफेरी पुढे सुरू).

**पाठ** : अध्याय 16–17
**मुख्य वचन** : 1करिंथ.9:22–23, '' मी सर्वांना सर्व काही झालो आहे,अशा हेतूने की, मी सर्व प्रकारे कित्येकांचे तारणसाधावे, मी सर्व काही सुवार्तेकरीता करतो अशासाठी की, मी इतरांबरोबर तिचा भागिदार व्हावे''
**विषयवाक्य** : पौल यहुद्यांसोबत आणि ग्रिंकासोबत वचनाच्याद्वारे आणि सृष्टिच्याद्वारे वादविवाद करतो.
**जीवनतत्व** : स्तुती करण्याच्याद्वारे सार्थ्याचा आत्मा प्राप्त होतो.

## **प्रकरण अकरा –– अध्याय 18–19**

**विषयवाक्य :** पौल इतरांसोबत संपुर्ण आशियात आश्चर्य कर्म करीत आणि दुष्टांचा सामना करीत उपदेश देत फिरला.

### <u>पहीला दिवस</u> प्रे.कृ.– 18:1–23 आणि 19: 1 – 7 वाचन करा.

**प्रश्न 1: पौल आणि अक्विला व प्रिस्किला यांच्यात कोणती समानता होती ?**

**उत्तरः** पौल जेथे कोठे जात असे तेथे तुबू बनवून आपली मिळकत कमवित असे (प्रे.कृ.20:34 ; 1थेस्सल.2:9 ; 2थेस्सल. 3:3–8). तशाच प्रकारे अक्विला व त्याची पत्नी प्रिस्किला हे सुद्धा तंबू बनवित असत. दोघांचा व्यवसाय एकच होता. हीच त्यांच्यात समानता होती (व.3).

**प्रश्न 2: देवाने पौलाला कोणती आज्ञा आणि प्रतिज्ञा दिली ?**

**उत्तरः** देवाने पौलाला आज्ञा दिली की?'' भिऊ नको; बोलत जा, उगा राहू नको'' आणि '' तुझे वाईट करण्यास कोही येणार नाही, कारण ह्या नगरात माझे लोक पुष्कळ आहेत'' (व.9–10).

**प्रश्न 3: करिंथ येथे पौल किती दिवस राहिला ?**

**उत्तरः** पौल त्यांच्यामध्ये वचन शिवित दिड वर्षे राहीला.

**प्रश्न 4: देवाने पौलास जसे करिंथ येथे उत्साहित केले, तसे देवाने तुम्हास केलेल्या उत्साहाबद्दल सांगू शकाल काय ?**

**उत्तरः** –––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

–––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

---

### <u>दुसरा दिवस</u> – प्रे.कृ.18:24–28 आणि 19: 1–7 वाचन करा

**प्रश्न 1: इफिस येथे कोणाच्या बाबतीत आणि काय शिकविले ?**

**उत्तरः** इफिस या ठिकाणी **अपुल्लो** नावाचा एक चांगला वक्ता होता. तो जन्माने यहुदी होता. तो मिसरातील आलेक्सांद्रियाचा रहीवासी होता.तो शास्त्र पारंगत होता.परंतू त्याला ख्रिस्ती विश्वासासंबधी फारशी माहीती नव्हती. बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाच्या सेवाकार्यात तो हुशार होता. मसिहाच्या आगमनासाठी पश्चातापाची घोषण योहान करीत होता हे त्याला माहीत होते. जेव्हा त्याचे भाषण अक्विल्ला व प्रिस्किल्ला ह्यांनी ऐकले तेव्हा त्याला अधिक ज्ञानाची गरज आहे असे त्यांना समजले तेंव्हा त्यानी त्याची चुक न काढता त्याला बाजूला घेतले व **देवाचा मार्ग अधिक स्पष्ट** करून सांगितला(व.18:26).

**प्रश्न 2: इफिस येथील लोकांना पौलाने कोणती गोष्ट शिकवली जी त्यांच्यासाठी नविन होती ?**

**उत्तरः** इफिस येथे बाप्तिस्मा करणाऱ्या योहानाचे शिष्य होते. त्यांनी येशूवर विश्वास ठेवला होता परंतू त्यांना पवित्र आत्म्याविषयी काहीच माहीत नव्हते. ते त्यांच्यासाठी नविन होते. कारण ते योहानाचा बाप्तिस्मा घेत असत.

तेव्हा पौलाने त्यांना सांगितले की, योहान हा पश्चातापाचा बाप्तिस्मा देत होता आणि तो लोकांना सांगत असे की, ''माझ्या मागून येणाऱ्यावर म्हणजे येशूवर तुम्ही विश्वास ठेवावा'' तेव्हा त्यांनी येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला.

**प्रश्न 3: येशू त्यांचा प्रभू व तारणारा हे सिद्ध करण्यासाठी त्यांनी काय केले ?**

**उत्तरः** त्यांनी येशूवर विश्वास ठेवला आणि येशूच्या नावात बाप्तिस्मा घेतला.

–––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

–––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

**प्रश्न 4: जसे पेन्टेकॉस्टच्या समयी त्यांच्या निर्णयाची खात्री देवाने पटविली, तशी त्यांची कशी पटविली ?**

**उत्तरः** कारण जेव्हा पौलाने त्यांच्या डोक्यावर हात ठेवला तेव्हा त्यांच्यावर पवित्र आत्मा उतरला आणि ते वेगवेगळया भाषेत बोलू लागले आणि देवाचा संदेश देऊ लागले जसे पन्नासाव्या दिवशी घडले अगदी तसे.

**<u>तिसरा दिवस</u> – प्रे.कृ.19: 8–12 वाचन करा.**

**प्रश्न 1: सभास्थानातील यहुद्यांनी पौलाच्या शिक्षणास कसे प्रत्युत्तर दिले ?**

**उत्तरः** ते पौला विरूद्ध बंड करू लागले. त्यांची मने कठोर झाली.आणि त्यांनी योची निंदा करायला सुरवात केली.

**पश्न 2: दोन वर्षाच्या कालावधीत, कोणी प्रभूचे वचन ऐकले ?**

**उत्तरः** आशियात राहणाऱ्या सर्व यहुदी आणि हेल्लेणी लोकांनी प्रभूचे वचन ऐकले.

**प्रश्न 3: पौलाच्या हस्ते इतर कोणते असामान्य चमत्कार घडविले गेले ?**

**उत्तरः** लोक पौलाच्या अंगावरून रूमाल व फडकी आणून रोग्यांवर घालीत तेव्हा रोगी बरे होत असत. ज्यांच्यामध्ये दुष्ट आत्मे असत त्यांच्यातून दुष्ट बात्मे निघून जात असत. असे असामान्य चमत्कार पौलाच्या हस्ते घडले.

**<u>चौथा दिवस</u>** – **प्रे..कृ. 19:13–22 वाचन करा**

**प्रश्न 1: येशूमध्ये अधिकार प्राप्तीशिवाय दुष्टशक्तिंशी सामना करण्याविषयी आपण काय शिकू शकतो ?**

**उत्तरः** ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

**प्रश्न 2: अनुवाद.18:9–14 मध्ये जादुच्या प्रकाराची यादी बनवा ?**

**उत्तरः** मुलाचा किंवा मुलीचा अग्नीत होम करणे. चेटूक करणे, शकुन मुहर्त पाहणे, मंत्रतंत्र करणे, जादू करणे, वशीकरण करणे, पंचाक्षरी करणे, छांछू करणे, मृतांत्म्याला विचारणे. जो कोणी असली कृत्ये करितो त्याचा परमेश्वराला विट आहे.

**प्रश्न 3: ह्या मधून तुमच्या समाजात कोणते प्रकार आढळतात ?**

**उत्तरः** मुलाचा किंवा मुलीचा अग्नीत होम करणे एवढे सोडून सर्व प्रकार आमच्या समाजात आडळतात

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

**प्रश्न 4: अशा वाईट कृत्ये करणाऱ्या इफिसकरांनी स्वतःस कसे शुद्ध केले ?**

**उत्तरः** पुष्कळ लोकांनी आपली कृत्ये कबूल केली. जादूटोणा करणाऱ्यानी आपल्या जादुच्या सर्व वस्तू जाळून टाकल्या(19:18–20). ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

**पश्न 5: आशियामध्ये पौलाने उपदेश देण्यात आणि शिकविण्यात किती वेळ घालविला ?**

**उत्तरः** पौलाने उपदेश देण्यात व शिकविण्यात आशियामध्ये दोन वर्षे घलविली. ––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

**<u>पाचवा दिवस</u> – प्रे.कृ. 19: 23– 41 वाचन करा.**

**प्रश्न 1: कोणत्या गोष्टीने देमेत्रियाला विरोध करण्यास प्रवृत्त केले ?**

**उत्तरः** पौलाच्या उपदेशामुळे अनेक इफिसकरांनी मुर्तीपुजा सोडली व ते प्रभूकडे वळाले. ही आत्मिक जागृती एवढया मोठयाप्रमाणात झाली की, त्या मुळे **मुर्ताकारांचे काम बंद** पडले.त्यांच्यामध्ये देमेत्रिय नावाचा सोनार होता. तो डायना देवीसाठी चांदीचे देव्हारे तयार करीत असे. तो अनेक सोनारांचा प्रमुख होता.इफिसकरांनी मुर्तीपुजा सोडल्यामुळे त्याची **कमाई बंद पडू लागली** (व.23–27)म्हणून तो विरोधास प्रवृत झाला.

**प्रश्न 2: त्याने समर्थन प्राप्त करण्यासाठी काय केले ? त्याचा परिणाम काय झाला ?**

**उत्तरः** त्याने समर्थन प्राप्त करण्यासाठी अनेक लोकांच्या मनामध्ये अर्तमी देवीविषयी भरवून त्यांना फितविले की, आपल्या धंद्याला धोका आहे.असे म्हणून अनेक लोकांना तयार केले त्याचा परिणाम असा झाला की, ते सर्व लोक क्रोधविष्ट झाले व नगरात गोंधळ करून पोलाला विरोध केला. आणि पौलाचे सोबती गायस व अरिस्तार्ख यांस पकडून त्यांना ओढीत ओढीत नाट्यगृहात नेले.

**प्रश्न 3: नाटक गृहात जाण्यापासून पौलास कोणी अडविले ?**

**उत्तरः** पौलाच्या मनात आले की, आपण त्या गर्दीत जावे . तो जाण्यास निघाला परंतू त्याच्या शिष्यांनी त्याला नाट्यगृहात जाण्यापासून अडविले. (व.30–31) ——————————————————————————
——————————————————————————————————————

**प्रश्न 4: जमावास शांत करण्यासाठी शिरस्तेदारने काय केले ?**

**उत्तरः** जमावास शांत करण्यासाठी शिरस्तेदार म्हणाला की, तुम्ही ज्या लोकांविरूद्ध आरडाओरडा करीत आहात ते लोक मंदीर लुटणारे नाहीत किंवा निंदा करणारी नाहीत. जर त्यांच्याविरूद्ध तक्रार असलेस न्यायालयात दाद मागावी.तेथे न्यायाधिश आहेत. जर काही करायचे असल्यास कायदेशीर करावे. अवैधरित्या करू नये. अशा प्रकारे त्यांने त्यांना शांत केले.

**प्रश्न 5: अशा परिस्थित पौलाचे जिवन आणि सेवा सुरक्षीत राखण्यासाठी देवाने कोणाचा उपयोग केला ?**

**उत्तरः** अशा परिस्थितीत पौलाचे जिवन सुरक्षीत राहण्यासाठी देवाने त्या नगराचा **शिरस्तेदार** याचा उपयोग केला.
——————————————————————————————————————
——————————————————————————————————————

**<u>सहावा दिवस</u> –**

**प्रकरण 11 : " हंगामात अधिक कामगार जोडले गेले"**

(दुसऱ्या प्रवासाचा शेवट आणि तिसऱ्या प्रवासाचा प्रारंभ)

| | |
|---|---|
| **पाठ** | : अध्याय. 18 – 19 |
| **मुख्यवचन** | : रोम.1:16 "कारण मला सुवार्तेची लाज वाटत नाही कारण विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला प्रथम यहुद्याला मग हेल्लेण्याला तारणासाठी ते देवाचे सामर्थ आहे" |
| **विषय वाक्य** | : इतरांसोबत पौल संपुर्ण आशियात आश्चर्यकर्म करीत आणि दुष्टांचा सामना करीत उपदेश देत फिरला. |
| **जीवनतत्व** | : विश्वासणाऱ्यांच्या सोबत राहणारा पवित्र आत्मा सामर्थ्य देतो, यासाठी की, त्यानी आपल्याला मिळालेल्या अधिकाराचा वापर करावा. |

## प्रकरण बारा : अध्याय 20

**विषयवाक्य : पौल इफिसमध्ये मंडळीला आशिर्वाद देतो आणि स्वतःला यरूशलेममध्ये जाण्यासाठी तयार करतो.**

### पहीला दिवस प्रे.कृ. 20:1–6 वाचन करा.

**प्रश्न 1: ग्रीसमध्ये पौल किती दिवस राहीला ?**

**उत्तरः** पोल सुमारे ग्रीसमध्ये **तिन** महीने राहीला(व.3).

———————————————————————————————————————

**प्रश्न 2: पौलाच्या सहप्रवाशांची नावे सांगा ?**

**उत्तरः** पुर्राचा मुलगा *सोपत्र बिरूयाकर,* थेस्सलीनी मधील *अरिस्तार्ख* व *सकुंद, गायस दर्बेकर, तिमथ्य* आणि आशिया प्रंतातील *तुखिक* व *त्रफिम* हे त्याचे सहप्रवाशी होते.

**प्रश्न 3: तुमच्या सभोवती काही नितिमान प्ररूष किंवा स्त्रिया आहेत काय ?**

**उत्तरः** होय.

———————————————————————————————————

————————————————————————————————————

### दुसरा दिवस – प्रे.कृ. 20:7–12 वाचन करा.

**प्रश्न 1: त्रोवस मधील शेवटच्या रात्री घडलेल्या चमत्काराचे वर्णन करा ?**

**उत्तरः** पौल व त्याचे सहकारी त्रोवसात सात दिवस राहीले. तेथील त्यांचा शेवटचा दिवस हा रविवर होता. ज्याला परंपरेनुसार आठवढ्याचा पहीला दिवस असे म्हटले जाते. विश्वासणारे भाकर मोडण्यासाठी एकत्र आले होते.म्हणजेच प्रभू भोजन घेण्यासाठी ते एकत्र होते. नविन करारात ***ख्रिस्ती लोक शनिवारी नाही तर रविवारी भक्ती करीता एकत्र येत असत याचा हा पुरावा*** आहे.

पौल फार वेळपर्यंत बोलत होता आणि ती सभा तिसऱ्या माडीवर होती. त्या ठिकाणी युतुख नावाचा एक इसम खिडकीत बसला होता.आणि तो ***झोपेने गुंग होता.*** अशा परिस्थितीत तो त्या खिडकहतून खाली पडला. आणि ***मेलेला सापडला.*** पौल खाली आला आणि त्याने त्या युतुखवर पाखर घातली व त्याला कवटाळले. पौलाने लोकांना सांगितले की,घाबरू नका कारण हा मनुष्य जिवंत आहे. तो मनुष्य खरोखरच ***मेला होता याची पृष्टी वचन 9 मध्ये*** आहे. पोलाने त्याला चमत्काराच्या सामर्थ्याने जिवंत केले.

त्या व्यक्तीवर हा प्रसंग येण्याचे कारण म्हणजे तो ***वचन न ऐकता झोपत होता*** .आपण लक्षात ठेवले पाहीले पाहीजे की, ***भक्तीच्यावेळी झोपण्याचे टाळावे.***

**प्रश्न 2: तेथील पौलाची सेवा वर्णन करण्याकरीता तुम्ही कोणत्या शब्दाने वर्णन कराल ?**

**उत्तरः** ———————————————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

**प्रश्न 3: पौलाचे जिवन आमच्या करीता इतरांची सेवा करण्याविषयी कसे नमुनेदार ठरते ?**

**उत्तरः** ———————————————————————————————————

———————————————————————————————————————

———————————————————————————————————————

## <u>तिसरा दिवस</u> **प्रे.कृ.20:13–24 वाचन करा.**

**प्रश्न 1: यरूशलेमेत जाण्याची पौलाची केंव्हा इच्छा होती ?**

**उत्तरः** पौलाने इफिसास जाण्याचे मुद्दाम टाळले होते कारण त्याला ***"पन्नसाव्या दिसासाठी यरूशलेमला जाण्याची घाई होती"*** म्हणून तो त्रोवसापासून **अस्सा** पर्यंत पायी चालत गेला.

**प्रश्न 2: इफिसमध्ये सेवा करण्याकरीता पौलास कोणती अडचण होती ? (20:19)?**

**उत्तरः** इफिसमध्ये सेवा करताना त्याच्या मनावर खुप भावनिक ताण होता. दुखःने त्याला अश्रु गाळावे लागले. यहुद्यांच्या कटामुळे चौकशीना तोंड द्यावे लागले. एवढे असूनसुद्धा तो धैर्याने सेवा करीत होता.(2करिंथ.1:8–10वाचा).

**प्रश्न 3: आशियामध्ये यहुदी व हेल्लेणी लोकांकरीता पौलाचा कोणता संदेश होता ?**

**उत्तरः** पश्चाताप करून देवाकडे वळणे आणि आपल्या प्रभू येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवणे याविषयी संदेश देत होता.

---

**प्रश्न 4: यरूशलेमेत जे वाट पाहत होते त्या विषयी पौलास कसे वाटले ?**

**उत्तरः** यरूशलेमेत नेमके काय घडणार याची त्याला जाणिव नव्हती, ऐवढे मात्र त्याला माहीत होते की, तेथे छळ होणार, अटक होणार हे त्याला अवगत होते. कारण प्रत्येक वेळेला पवित्र आत्मा त्याला तसे दाखवित असे.

पौलाच्या मनात असे विचार होते. त्याला त्याच्या जीवनाची किंमत नव्हती. <u>*देवाची आज्ञा पाळणे, त्याला संतुष्ट करणे हेच त्याचे एकमेव ध्येय होते.*</u> हे करण्यासाठी त्याला प्राण द्यावा लागला तरी त्याची तयारी होती. " प्रभू येशूने दिलेली ***जबाबदारी पुर्ण करणे हीच माझी धाव*** आहे व ***देवाच्या कृपेची सुवार्ता सांगणे*** हेच माझे काम" असे पौल म्हणतो.

**imp**"***देवाच्या कृपेची सुवार्ता सांगणे***" – पौलाने हे छान शिर्षक दिले आहे. कारण अपात्र अशा पाप्याला नरकाशिवाय काय मिळणार ? पण देवाची कृपा ही फार समाधान देणारा संदेश आहे. देवाचा पुत्र वैभव सोडून या जगात आला, क्रुसावर तो मरण पावला, त्याने आपले रक्त सांडले , पातक्यांची क्षमा व्हावी आणि त्याला सार्वकालीक जिवन प्राप्त व्हावे, म्हणून येशूने मरण सहन केले, हीच तर खरी देवाची कुपा आहे.

## <u>चौथा दिवस</u> **– 20:25–34 वाचन करा.**

**प्रश्न 1: जे काम पुर्ण करण्याकरीता त्याला बोलावण्यात आले होते ते पुर्ण केल्यावर पौलास कसे वाटले ?**

**उत्तरः** पौलाला एक प्रकारचे समाधान वाटले. कारण तो म्हणतो " <u>**मी देवाचा संपुर्ण मनोदय तुम्हास सांगण्यात कसूर केली नाही"**</u> म्हणून मी सर्वांच्या रक्ताविषयी निर्दोष आहे. त्यांने लोकांना सावध केले होते. तारणाचा मार्ग दाखविला होता. पौलाची सुवार्ता नाकारणाऱ्यांनी आपल्यावर नाश ओढवून घेतला होता(18:6).

**प्रश्न 2: यरूशलेमेत परत जाण्यापुर्वी पौलाने कोणता उत्साह आणि ताकीद मंडळीच्या वडीलांना दिली?**

**उत्तरः** पुढाऱ्याने स्वतःकडे व कळपाकडे लक्ष दिले पाहीजे.

**स्वतःकाडे लक्ष देणे** – मंडळीच्या पुढाऱ्यांनी प्रथम स्वतःकडे लक्ष दिले पाहीजे. कारण सैतान हा दुसऱ्यांच्यापेक्षा पुढाऱ्यांवर हल्ला करतो. जर सैतानाच्या हल्याने पुढारी पडला तर कळपावर म्हणजे मंडळीवर धोका उभा राहतो. पुढारी हे पवित्र आत्म्याद्वारे नियुक्त झालेले व सुसज्ज झालेले असतात.ते कळपाचे मेंढपाळ असतात.त्या कारणाने त्यांनी पवित्र आत्म्यानी नेहमी भरलेले असले पाहीजे. इफिस येथील पुढारी पवित्र आतम्यानी भरून गेले (19:1–7).

**कळपाचे पालन करावे –** कळप म्हणजे देवाची मंडळी. तीची काळजी घेतली पाहीजे. कारण देवाची जी मंडळी त्याने आपल्या रक्ताने स्वतःकरीता मिळविली आहे. तिचे पालन करावे. मंडळी मिळविण्यासाठी देवाच्या पुत्राने स्वतःचे रक्त ओतले आहे. म्हणून तीचे पालन करण्यासाठी देवाने पुढाऱ्यांना नियुक्त केले आहे.ख्रिस्त हा मेंढरांचा महान मेंढपाळ आहे तेव्हा पुढाऱ्यांने त्या महान मेंढपाळाचे अनुकरण करावे मंडहीत दयामाया न करणारे क्रुर लांडगे येतील. म्हणजे खोटे शिक्षक व खोटे पुढारी आहेत ते विपरीत गोष्टी सांगून ते ओढतील म्हणून सावध राहीले पाहीजे.

**प्रश्न 3: ज्या प्रकारे पौलाने आपल्या जिवनातील कार्याचा 'ओघ' सांगितला. तुमचे जिवन व सेवेचे ध्येय कोणते आहे ?**
**उत्तर:** ..........................................................................................................................................................................................
________________________________________________________________________________
________________________________________________________________________________

## <u>पाचवा दिवस</u> – प्रे.कृ.20: 35–38 वाचन करा

**प्रश्न 1: पौलाने प्रभूचे कोणते वचन वाटले ?**
**उत्तर:** श्रम करून दुर्बलांना साहाय्य करावे. घेण्यापेक्षा देणे ह्यात जास्त धन्यता आहे. ..................................................
________________________________________________________________________________
________________________________________________________________________________

**प्रश्न 2: पौल आणि इफिसकरांनी एकमेकांस देवाच्या सेवेमध्ये असताना निरोपाचे कोणते शब्द वापरले त्यांची यादी बनवा( 36–38)?**
**उत्तर:** सर्वांनी गुडघे टेकून प्रार्थना केली, सर्वजण दुःखाने रडले, गळयातगळा घालुन मिठया मारल्या, एकमकांचे मुके घेतले. सर्वांना दुःख झाले व शेवटी पौलाला तारवापर्यंत पोहचविण्यास गेले.

**प्रश्न 3: तुंम्हास काय वाटते की तो भावूक निरोप का असावा ?**
**उत्तर:** कारण ते सर्व जण एकमकांवर प्रीती करीत होते. ..............................................................................................
________________________________________________________________________________
________________________________________________________________________________

**प्रश्न 4: तुम्हाला तुमच्या जीवनातून पौला समान होण्यास, जसा तो येशू समान होता, काय तसे तुम्हाला बदलावेसे वाटते ?**
**उत्तर:** होय पौलाच्या जिवनातून सेवेबाबत शिकण्यास पुष्कळ आहे. पौलाची सेवा माझ्यासाठी एक **नमुना** आहे.
________________________________________________________________________________
________________________________________________________________________________

## <u>सहावा दिवस</u>

### प्रकरण 12 :– " पौल इफिस येथिल मंडळीचा निरोप घेतो"

**पाठ** : अध्याय 20
**मुख्यवचन** : प्रे.कृ. 20:24 " मी तर आपल्या प्राणाची किंमत एवढीसुद्धा करीत नाही, ह्यासाठी की,मी आपली धाव आणि देवाच्या कृपेची सुवार्ता निश्चितार्थाने सांगण्याची जी सेवा मला येशू प्रभू पासून प्राप्त झाली आहे ती शेवटास न्यावी"
**विषय वाक्य** : पौल इफिस येथील मंडळीला आशीर्वाद देतो आणि यरूशलेमेत जी गोष्ट त्याची वाट पाहीत होती त्या करीता तयार होतो.
**जीवन तत्व** : इतरांसाठी विश्वासयोग्य अनुयायी होण्याकरीता प्रवृत्त असणारे अनुयायी बना.

## प्रकरण 13 :– अध्याय 21–22

**विषयवाक्य : " यरूशलेमेत पौलाला अटक आणि समुदायास आपल्या कृपेची तो गोष्ट सांगतो.**

**<u>पहीला दिवस</u> – प्रे.कृ.21: 1–14 वाचन करा.**

**प्रश्न 1: सोर येथील पौलाच्या वेळेविषयी सांगा जेथे तारू टेकले होते ?**

**उत्तर : सोर यथे मंडळी** होती. तरवातून माल काढेपर्यंत पौल व त्याचे मित्र तेथील शिष्यांसोबत राहीले. त्यातील काही शिष्यांना पवित्र आत्म्याच्या द्वारे कळाले की, यरूशलेम मध्ये पौलावर मोठे संकट येणार आहे.यास्तव **त्यांनी पौलाला सल्ला दिला की, त्याने यरूशलेममध्ये जाऊ नये** (20:23). सोरमध्ये **सात दिवस** राहीले. तेथील मंडळीतील सर्व महीलां व मुले यासर्वांनी त्यांना तारवापर्यंत नेले आणि समुद्र किनाऱ्यावर सर्वांनी गुडघे टेकून प्रार्थना केली. मग त्यांना तारवात बसवून ते आपल्या घरी माघारी गेले.

**प्रश्न 2: फिलीप्पाचे वर्णन करा. (प्रे.कृ.21:8 ; 6:3–5 वाचा).**

**उत्तर :** फिलीप हा यरूशलेमेच्या नव्या मंडळीमध्ये मुळ **सात अध्यक्षापैकी एक अध्यक्ष होता.** मंडळीची पांगापांग झाली तेव्हा तो शोमरोनात गेला तेथे त्यांनी ख्रिस्ताची घोषणा करून अनेक चिन्हे चमत्कार केले.देवाचे राज्य व येशूचे ख्रिस्ताचे नाव ह्मा विषयी सुवार्ता सांगत असे. शिमोन जादुगाराचे परिवर्तन करून त्याला आपल्या सहवासात घेतला होता (प्रे.कृ..8:1–8 ; 12–13). देवाच्या दुताने त्याला हबशी षंढाकडे पाठविले (8:26). हबशी षंढाला सुवार्ता सांगितली( प्रे.कृ..8:35–38). पवित्र आत्म्याने त्याला अजोत नगरात नेले (प्रे.कृ.8:39–40) हाच फिलीप त्याला चार अविवाहीत मुली होत्या त्या इश्वरी संदेश देत असत. कैसरीयांस यांच्या घरी पौल उतरला (21:8710).तो एक चांगला सुवार्तीक होता.

**प्रश्न.3: अगबद्वारे पौलाकरीता कोणती भविष्यवाणी झाली ?**

**उत्तर :** या अगब संदेष्टयाने अुत्युखियात म्हटले होते की, दुष्काळ पडेल व तो क्लोद्याच्या राजवटीत पडला होता(प्रे.कृ. 11:28). हाच अगब कैसरियास पौल होता तथे आला आणि पौला विषयी भविष्यवाणी केली की, **"यरूशलेमेतील यहुदी हे पौलाला मारतील व परराष्ट्रीयांच्या म्हणजे रोमी लोकांच्या स्वाधीन करतील."** (व.10:11).

**प्रश्न 4: पौलाने त्या भविष्यवाणी विषयी कशी प्रतिक्रिया व्यक्त केली ? शिष्यांनी कोणती प्रतिक्रिया व्यक्त केली ?**

**उत्तर :** शिष्यांनी म्हटले पौलाने जाऊ नये. परंतू पौलाने म्हटले की,माझ्या मनाचे खच्चिकरण करू नका, " मी नुसता बंधनात पडण्यासच नव्हे तर प्रभू येशूच्या नावासाठी यरूशलेमेत मरावयास देखील तयार आहे" पौल ऐकत नाही असे समजून शिष्यांनी त्याला "प्रभूच्या इच्छेप्रमाणे होवो " असे म्हणून प्रभूच्या हातात सोपवून दिले.(13–14).

**प्रश्न 5: वचन 13 आणि लुक 14:25–33 मधिल येशूच्या शिकवणीतून पौलाच्या वागणुकी बद्दल काय शिकता ?**

**उत्तर :** या ठिकाणी येशू म्हणाला ***" जर कोणी माझ्याकडे येईल पण आपला बाप, आई, बायको मुले, भाऊ व बहिणी ह्मांचा आणि आपल्या जिवाचाहि द्वेष करणार नाही तर त्याला माझा शिष्य होता येणार नाही" ... " तुम्हापैकी जो कोणी आपल्या सर्वस्वाचा त्याग करीत नाही त्याला माझा शिष्य होता येत नाही"*** (लुक.14:26, 33). पौल येशूचा खरा शिष्य होता त्याने आपले सर्वस्व येशूसाठी अर्पण केले होते.

## <u>दुसरा दिवस</u> – प्रे.कृ. 21:15–26 वाचन करा

**प्रश्न 1: प्रेषित 18:23 पासून सुरू करून आपल्या नकाशावर पौलाचा तिसरा मिशनरी प्रवास रेखाटा ?**

**उत्तर :** पौलाची तिसरी सुवार्ता फेरी आणि रोमकडे वाटचाल.




**प्रश्न 2: कोणत्या चारित्र्यामुळे पौल एक चांगला पुढारी बनला ?**

**उत्तर :** ––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––––

**प्रश्न 3: यरूशलेमेत पौल व इतर शिष्यांचे स्वागत कसे झाले ?**

**उत्तर :** यरूशलेमेत पौल आणि इतर शिष्यांचे आनंदाने त्यांचे स्वागत झाले. ........................................................................

**प्रश्न 4: वडिलांनी पौलास यरूशलेमेतील उत्कंठित यहुद्यांसोबत काय करण्यास सांगितले ?**

**उत्तर :** वडिलांनी सांगितले की, ज्या चौघानी नवस केला आहे (त्या दिवसात चार यहुदी ख्रिस्ती लोकांनी नाजीराचा नवस केला होता. 18:18) त्यांना घेऊन जाऊन शुद्ध व्हावे. आणि त्यांच्या मुंडणाचा खर्च पौलाने भरावा म्हणजे तुम्ही नियमशास्त्र पाळून व्यवस्थेचे पालन करता असे कळून येईल(व.20–24).

**प्रश्न 5: पौलाने हि प्रतिज्ञा का वाहीली असावी ?(1करिंथ.9:22 वाचा ).**

**उत्तर :** पौलाने ही प्रतिज्ञा वाहिली कारण त्याची उद्देश हा होता की, **यहुदी व परराष्ट्री या दोघानाही शक्य होईल त्या मार्गाने ख्रिस्ताकरीता जिंकावे** (1करिंथ.9:20–22). यहुद्यांच्या खातर त्यानी तिमथ्याची सुता केली होती (16:3).

## तिसरा दिवस – प्रे.कृ. 21: 27–40 वाचन करा

**प्रश्न 1: कोणत्या कारणामुळे पौलास अटक झाली ?**

**उत्तर :** यहुद्यांना शांत करण्याचा हेतू असफल झाला.अविश्वासणाऱ्या यहुद्यांनी पौल मंदीरात आहे हे पाहीले. महत्वाची गोष्ट अशी होती का,त्यांनी पौलाला त्रफिमबरोबर यरूशलेम नगरात पाहीले होत(व.29). हा त्रफिम इफिसमधील परराष्ट्रीय खिस्ती होता. त्यांनी त्या दोघांना एकत्र पाहीले म्हणून यहंद्यांना वाचले की, पौलाने त्रफिमला मंदीरात नेले असावे. पौल नियमशास्त्राविरूद्ध शिकवितो आणि परराष्ट्रीयांना मंदीरात आणतो. यामुळे सर्व खळले आणि त्याला अटक केली.

**प्रश्न 2: समुदायाचे वर्णन तुम्ही कोणत्या शब्दात करणार ?**

**उत्तर :** ........................................................................................................................................

**प्रश्न 3: पौल समुदायाबरोबर का बोलू इच्छित होता ? या बद्दल तुमचे विचार सांगा ?**

**उत्तर :** कारण त्याला इब्री भाषा येत होती. आणि त्याचे परिवर्तन कसे झाले याची साक्ष आणि ख्रिस्ताविषयी सुवार्ता सांगायची होती असे वाटते.

## <u>चौथ्या दिवस</u> – प्रे.कृ.22:1–16 वाचन करा.

**प्रश्न 1: आपल्या परिवर्तनाविषयी पौलाने देवाचे कोणते सत्य जाणून घेण्याची आवश्यकता होती ?**

**उत्तर :** ........................................................................................................................................

**प्रश्न 2: दिमिस्काच्या वाटेवर पौलाने येशूला पहिला कोणता प्रश्न विचारला ?**

**उत्तर :** " प्रभूजी तू कोण आहेस"(व.8)

**प्रश्न 3: पौलाने प्रभूला दुसरा कोणता प्रश्न विचारला ?**

**उत्तर :** " प्रभूजी मी काय करावे" (व.10).

**प्रश्न 4: वचन 14 नुसार देवाने कशासाठी पौलाची निवड केली ?**

**उत्तर :** देवाची इच्छा काय आहे ही समजून घ्यावी यासाठी निवड केली.

**प्रश्न 5: देवाने तुमची निवड कशासाठी केली आहे ?**
**उत्तर:** देवाची इच्छा समजून घेणे आणि त्याच्या इच्छेप्रमाणे करणे. जगातील सर्व लोकांपर्यंत सुवार्ता पाहचविणे.

## पाचवा दिवस – प्रे.कृ. 22:17–30

**प्रश्न 1: गलती.1:15–18 नुसार , पौलाच्या परिवर्तनापासून त्याच्या यरूशलेमेत पुन्हा परतण्यापर्यंत किती वेळ लागला ?**
**उत्तर :** या वचनानुसार तिन वर्षाचा कालावधी लागला.

**प्रश्न 2: पौलाचे देहभान सुटले होते तेव्हा देवाने त्याला कोणता संदेश दिला ?**
**उत्तर :** यरूशलेमेतून लवकर निघून जावे कारण माझ्याविषयी दिलेली साक्ष ते मान्य करणार नाहीत. देवाने त्याला हेच सांगितले की, **यरूशलेत लवकर सोडावे.**

**प्रश्न 3: हेल्लेण्यामध्ये आयुष्यभर सेवेचा निर्णय पौलाच्या जिवनात कोणी घेतला होता ?**
**उत्तर** : हेल्लेण्यामध्ये आयुष्यभर सेवेचा निर्णय **देवाने** घेतला होता. (व.21 ; गलती.2:8–9).

**प्रश्न 4: यहुदीलोक पौलावर कसे व का नाराज होते ?**
**उत्तर :** जेव्हा पौलाने म्हटले की, मला परराष्ट्रीयात पाठविण्यात आले आहे तेव्हा यहुदी लोक नाराज झाले. **' परराष्ट्रीय'** हा शब्द ऐकून रागावले. आणि म्हणू लागले की, ह्याला जगातून घालवून द्या, ह्याची जगण्याची लायकी नाही, आणि अंगावरून कपडे काढून आकाशात धुळ उडवित होते.

**प्रश्न 5: विरोधापासून पौल कशाप्रकारे सुरक्षीत राहिला ?**
**उत्तर :** त्याने कायदेशीर मार्ग अवलंबविला. पौलाने म्हटले की, '' मी रोमन नागरीक आहे '' कारण रोमी कायद्याप्रमाणे रोमी नागरीकाला असे चाबकाने मारणे हे बेकायदेशीर होते. जरी न्यायालयापुढे रोमी नागरिक दोषी गुन्हेगार ठरतो, तरी त्याला ही भयंकर शिक्षा देण्यात येत नसे.हे सर्व पौलाला माहीत होते.

**त्या काळात तीन प्रकारे रोमी नागरीक होता येत होते**.

**1.** काही महत्वाची कामगिरी केली की, ते नागरीकत्व 'पारितोषिक म्हणून दिले जाई.
**2.** जन्माने ते नागरिकत्व मिळत असे. पौलाच्या बाबतीत असेच होते.तो तार्ससमध्ये जन्मला होता. ते रोमी सामांज्यातील स्वतंत्र शहर होते. त्याचा बापही रोमी नागरीक होता.
**3.** पुष्कळ पैसे देऊन तो हक्क मिळवता येत होता. त्या सरदाराने सुद्धा असेच मोठे मोल देऊन रोमी नागरिकत्व मिळविले होते. पौल रोमी नागरिक आहे हे कळल्यावर त्याला फटके मारणे रद्द केले.

आपण पौलाच्या उदाहरणावरून असे पाहू शकतो की, जेव्हा काही समस्या येतात तेव्हा आपण त्यातून बाहेर निघण्याचा कायदेशीर मार्ग शोधावा.

**प्रश्न 6: तुमच्या विश्वासामध्ये कोणता तणाव उत्पन्न झाला आहे काय ?**
**उत्तर :** होय अनेक वेळा. पण पौलासारखे नाही.

**प्रश्न 7 :विश्वासयोग्य राहण्याकरीता तुमच्या सभोवतालच्या लोकांनी तुमच्यासाठी प्रार्थना करावी असे तुम्हाला वाटते काय ?**
**उत्तर :** होय.

**प्रश्न 8: देवामध्ये संपुर्ण अंतकरणाने चालत असताना तुम्हाला तुमच्या मार्गात कोणत्या अडखळणाचा सामना करावा लागला काय ?**
**उत्तर :**

## सहावा दिवस

**प्रकरण 13 – " पौलाची अटक व लोकसमुदायाद्वारे त्याचे संरक्षण "**

| | |
|---|---|
| **पाठ** | : अध्याय 21–22 |
| **मुख्य वचन** | : प्रे.कृ. 22:15 " कारण जे तू पाहिले आहे व ऐकले आहे त्याविषयी तू सर्व लोकांपुढे त्याचा साक्षी होशील." |
| **विषय वाक्य** | : यरूशलेमेत पौलास अटक होते आणि तो समुदायास आपल्या कृपेची कथा ऐकवितो. |
| **जीवनतत्व** | : विरोध आम्हास देवाने केलेले कार्य सागण्यास संधी देवू शकतो. |

## प्रकरण 14 : अध्याय 23–24

**विषय वाक्य : विरोध, दंगा आणि सापळा पौलाच्या विरोधात जातात.**

### पहीला दिवस – प्रे.कृ: 23:1–8.

**प्रश्न 1: प्रमुख याजक आणि न्यायसभा यांच्यासमोर पौलाचे पहीले वाक्य कोणते होते ?**

**उत्तर :** " **बंधूजनहो, मी आजपर्यंत देवाबरोबर पुर्ण सद्भावनेने वागलो आहे**" हे त्याचे पहिले वाक्य होते.

**प्रश्न 2: हनन्याने पौलाच्या विरोधात तिव्र प्रतिक्रीया का दिली?**

**उत्तर :** कारण पौलाचे हे वाक्य ऐकून तो फार संतप्त झाला .कारण यहुदी धर्माप्रमाणे पौल त्याच्या दृष्टिने देवहीन मनुष्य होता. तो यहुदी धर्म सोडून ख्रिस्ती झाला होता. म्हणून पौल असे म्हणू शकत नाही, असा त्याचा समज होता, म्हणून हनन्या चिडला आणि त्यानी त्याच्या तोंडात मारण्याची आज्ञा केली.

**प्रश्न 3: पौलाने हनन्याची तुलना या वस्तूबरोबर का केली तंम्ही हे सांगू शकाल काय ? (मत्तय.23:27–28 ).**

**उत्तर :** बाह्यदर्शी तो मुख्य याजक नितीमान व न्यायी असे वाटला ,पण तो आतून कपटी होता. नियमशास्त्रानुसार न्याय करावा हे तो लोकांना सांगत होता ,पण स्वतःहा मात्र तो तसा न्याय करीत नव्हता. **म्हणजेच बाहेरून नितिमान दाखवायचे पण अतून मात्र ढोंगाने व अनितीने भरलेले असायचे.**

**प्रश्न 4: सदुकी आणि परूशी यांचा विश्वास कसा होता हे सांगू शकता काय ?**

**उत्तर :** पुनरूत्थान ,देवदूत व आत्मा आहे असा विश्वास **परूशांचा** होता. पण पुनरूत्थान ,देवदूत व आत्मा यावर **सदुकीयांचा** विश्वास नव्हता.

### दुसरा दिवस – प्रे.कृ. 23: 9–11

**प्रश्न 1: देवाने पौलाला केव्हा आणि कसे उत्सहित केले ?**

**उत्तर :** सदुकी आणि परूशी यांच्यात फुट पडली. कारण सदुकी हे पुनरूत्थान नाही आणि देवदूत व आत्मा नाही असा त्यांचा विश्वास होता . पण परूशी या दोन्ही गोष्टी मान्य करतात. म्हणून त्यांच्यात भांडण झाले. आणि काही परूश्यामधील शास्त्र्यांनी पौलाचे बाजू धरली (व.9). त्यांचे भांडण जोरात चालले होते. तेव्हा पौलाला अपाय होईल या भितीने सरदाराने पौलाला ताबडतोब त्यांच्यातून सोडवून गढीत नेण्याचा हुकुम दिला .त्या रात्री देवाने पौलाला देवाने धीर देऊन उत्साहित केले की, "**धीर घर जशी यरूशलेममध्ये माझ्या विषयी साक्ष दिली तशी रोम शहरातही तुला द्यावी लागेल**"(व.10).

**प्रश्न 2: प्रभूने पौलाला धीर धरण्यास म्हटले , ह्यावर तुम्हास काय वाटते ?**

**उत्तरः** यावरून हे समजते की, पौलाचे सेवाकार्य अद्याप संपलेले नव्हते . यरूशलेमेत तो विश्वासाने सेवा करीत होता तशीच सेवा आणि ख्रिस्ताची साक्ष म्हणून त्याला रोममध्ये करायची होती. हेच वाटते,

**प्रश्न 3: यहोशवा 1:1–9 द्वारे तुम्ही धीर धरण्याचा मार्ग शोधून काढू शकता काय ?**

**उत्तर :**

**प्रश्न 4: जीवनातील कोणत्या परिस्थितीत तुम्हाला प्रभू पासून उत्साहाची गरज वाटते ?**
**उत्तर :** जीवनातील प्रत्येक परिस्थितीत प्रभू पासून उत्साहाची गरज वाटते.

## तिसरा दिवस – प्रे.कृ. 23:12–35 वाचन करा.

**प्रश्न 1 : 40 यहुद्यांनी पौला विरूद्ध आपला रोष प्रकट करित कोणती शपथ वाहिली ?**
**उत्तर :** पौलाचा जीव घेईपर्यंत आम्ही खाणार पिणार नाही. मेणजेच अन्नला शिवणार नाही, अशी शपथ वाहीली (व. 12–13).

**प्रश्न 2: पौलाच्या बहिणीच्या मुलाने काय केले ?**
**उत्तर** : ज्व्हा त्याच्या भाच्याने त्यांचे बोलणे ऐकले तेव्हा तो जेथे पौलाला गढीत ठेवले होते तेथे गेला आणि ही बातमी पौलाला सांगितली. तेव्हा पौलाने शताधिपती याला सांगून भाच्याला सरदाराला सांगण्यास पाठविले. आणि मग भाच्याने सरदाराला सर्व हकीगत सांगितली व म्हटले की, पौलाला यहुद्यांसमोर आणू नये(व.19–22).

**प्रश्न 3: देवाने पौलाला यहुदी मृत्युशापापासून कसे सुरक्षीत ठेवले ? का ?**
**उत्तरः** पौलाला सुरक्षीत ठेवण्यासाठी देवाने पौलाच्या भाच्याचा उपयोग केला. की, यहुद्यांची बातमी सरदारापर्यंत पोहचविली आणि सरदाराने पौलाला सुरक्षा प्रदान केली. कारण पौलाला रोममध्येसुद्धा संवार्ता सांगायची होती.

**प्रश्न 4: पौलाला शहराबाहेर घालविण्यासाठी त्यांनी किती लोकांना नेमले**
**उत्तर :** पौलाला शहराबाहेर काढण्यासाठी दोनशे शिपाई, सत्तर स्वार, आणि दोनशे भालेकरी अशी मिळून चारशे सत्तर लोकांची नेमणूक केली.

**प्रश्न 5: त्याने पौलाला कोठे नेले आणि का ?**
**उत्तर** : त्याला कैसरीया येथे फेलिक्स सुभेदाराकडे नेले.

## चौथा दिवस – प्रे.कृ. 24:1–13 वाचन करा.

**प्रश्न 1: पौला विरूद्ध कोणता आरोप मांडण्यात आला ?**
**उत्तर :** पौला विरूद्ध **चार आरोप** करण्यात आले.
**1.**तो माणूस म्हणजे एक पिडा आहे. म्हणजे त्रास देणारा माणूस.
**2.** सर्व यहुद्यांमध्ये बंड उठविणारा माणूस आहे.
**3.** तो नासोरी पुथाचा पुढारी आहे.
**4.** त्याने मंदिर विटाळवण्याचा प्रयत्न केला आहे. असे त्याच्यावर चार आरोप मांडण्यात आले.

**प्रश्न 2: पौलाने आपले यरूशलेमध्ये येण्याचे कोणते कारण सांगितले ?**
**उत्तर :** यरूशलेमेत पिडा उत्पन्न करण्यासाठी नाही तर **उपासना करण्यासाठी** आले होते हे सांगितले.

**प्रश्न 3: तुरूगांत टाकण्याचे खरे कारण म्हणजे पौलाने काय म्हटले ?**
**उत्तर :**

- ✞ पहिले कारण सांगितले की, मी **उपासनेसाठी** मंदीरात गेलो.(व.11).
- ✞ सभास्थानात किंवा नगरात **वादविवाद करताना किंवा बंड माजविताना कोणाला आढळलो नाही**(व.12).
- ✞ नियमशास्त्रात जे काहि आहे त्यावर विश्वास ठेऊन, **पुर्वजांच्या देवाची सेवा करतो** (व.14).
- ✞ देवा संबधाने आणि माणसासंबधाने माझे **मन सतत शुद्ध राखण्याचा प्रयत्न करतो**(व.16).
- ✞ पुष्कळ वर्षांने **दानधर्म करावयास व यज्ञार्पण करण्यास आलो** (व.17).
- ✞ हे करीत असता **मी व्रतस्थ (शुद्ध) असा मंदीरात होतो**.तेथे **घोळका किंवा दंगा नव्हता** पण तेथे आशिया प्रांतातले यहुदी होते(व.18).
- ✞ ह्यांच्या मध्ये उभे राहून मेलेल्यांच्या पुनरूत्थानाविषयी माझा न्याय आज तुम्हापुढे होत आहे, हे शब्द **मी मोठयाने बोललो;** हा एवढा माझा उद्गार अपराध असला तर असेल (व.21).

**<u>पाचवा दिवस</u> प्रे.कृ. 24:14–26 वाचन करा.**

**प्रश्न 1: पौल काय जाणू, बघू, आणि ऐकू इच्छित होता ?**
**उत्तर :**

**प्रश्न 2: त्याची साक्ष कशी स्विकारण्यात आली ?**
**उत्तर :**

**प्रश्न 3: फेलिक्सला कोणते भय वाटले? त्याने कसे प्रत्युत्तर दिले ?**
**उत्तर :** जेव्हा पौलाने नितिमत्व , इंद्रियदमन व पुढे होणारा न्याय ह्याविषयी सांगितले तेव्हा त्याला भिती वाटली. कारण तो वाईट व लोभी माणूस होता. म्हणून हे ऐकणे त्याला सहन झाले नाही. म्हणून त्याने बहाना केला की, संधी मिळाली की, नंतर बोलाविन असे म्हणून त्याला जाण्यास सांगितले. त्याला पुन्हा –पुन्हा बोलावून त्याचे संभाषन ऐकत असे कारण पौलाला सोडविण्यासाठी त्याचे मित्र त्याला लाच देतील. ही त्याची अपेक्षा होती(व.24–26).

**प्रश्न 4: किती दिवस पौलाला बंदीशाळेत ठेवण्यात आले ?**
**उत्तर :** दोन वर्षे पौलाला बंदिशाळेत ठेवण्यात आले. यहुद्यांची मर्जी संपादन करण्यासाठी फेलिक्सने पौलाला तुरूंगात ठेवले.(व.27).

**प्रश्न 5: पौल कारागृहात असावा याबाबतीत देवाची कोणती योजना होती ?**
**उत्तर :** एक तर तो यहुद्यांपासून सुरक्षीत राहील. आणि त्याला रोमपर्यंत सुवार्ता सांगायला जायचे होते.

**प्रश्न 6: तुम्ही आपल्या जीवनात कठीण जागी आहात काय? जे तुमच्या सभोवती आहेत ते तुमच्यासाठी कशी प्रार्थना करू शकतात ?**
उत्तर :

## सहावा दिवस

**प्रकरण 14: " परिषद आणि फेलिक्स समोर पौलाचा बचाव"**

| | |
|---|---|
| **पाठ** | : अध्याय 23–24 |
| **मुख्य वचन** | : प्रेषित 23:11 " धीर धर, जशी तू यरूशलेमेत माझ्याविषयी साक्ष दिली तशी रोम शहरातही तुला द्यावी लागेल" |
| **विषयवाक्य** | : विरोध  दंगा आणि सापळा पौलाच्या विरोधात जातात. |
| **जिवन तत्व** | : वाट पाण्याच्या कालावधीत विश्वासयोग्य धीर शक्य आहे. |

## प्रकरण पंधरा : अध्याय 25 – 26

**विषय वाक्य : पौल राज्यपाल आणि राजा यांच्या समक्ष बोलतो.**

### पहिला दिवस – प्रे.कृ.25:1–12 वाचन करा.त्र

**प्रश्न 1: प्रेषित 25:2–3 आणि प्रेषित 23:12–15 मध्ये कोणत्या दोन समुहानी पौलाचा कट करण्यास रचला ?**
**उत्तर:** मुख्य याजक आणि यहुद्यातील वडीलवर्ग यांनी कट रचला होता.

**प्रश्न 2: अशा कटाविषयी देवाने काय केले ?**
**उत्तर:** देवाने नविन आलेला फस्त याच्या मनात कार्य केले. जेव्हा याजक व वडीलवर्ग फेस्ताकडे आले आणि पुन्हा त्यांनी पोलाला यरूशलेमेत आणण्याविषयी फिर्याद दिली. कारण पौलाला रस्त्यातच मारावे अशा त्यांचा बेत होता. पण देवाने त्यांचा तो कट उधळला. पेस्ताने सांगितले की,पौल कैसरात कैदेत आहे तर मी स्वतः तिकडे जाणार आहे. तेव्हा तिकडेच आपण त्याच्यावर आरोप ठेवावा,

**प्रश्न 3: पौलाने कैसरास का अपील केली असावी ?**
**उत्तर:** कारण पौलाला कैसरियात जाणे का भाग पडले हे त्याला कळले होते की या लोकांनी त्याला ठार मारण्याचा कट केला होता. म्हणून पौलाने कैसरास अपील केली.

## दुसरा दिवस प्रे.कृ.25:13–17 वाचन करा.

प्रश्न 1: पौला सोबत काय करायचे हे फेस्त व अग्रीपा यांना माहीत होते काय ?

उत्तरः

**प्रश्न 2: पौलाच्या निर्दोषपणा बद्दल कोणते वचन सांगते ?**

**उत्तरः** वचन 16, 25 मध्ये आहे की, '' ..आरोपाविषयी प्रत्युत्तर देण्याची आरेपीला सुधी मिळण्यापुर्वी कोणालाही शिक्षेकरीता सोपून देण्याची रोमन लोकांची रित नाही. पौल हा रोमी होता. ''मरणदंड द्यावा असा कोणताही गुन्हा सापडला नाही''

**प्रश्न 3: पौलाने आपला खटला शासकाकडे मांडल्यामुंळे, अग्रीपाला त्याला कोठे पाठवायचे होते ? हे महत्वाचे का होते ?**

**उत्तरः** निरो बादशहाकडे पाठवावे लागत होते (25).

## तिसरा दिवस प्रे.कृ. 26:1–15 वाचन करा.

**प्रश्न 1: पुढील वर्णन करणारी वचने सांगा ?**

अ. पौलाचे येशूला मसिहा म्हणून सादरीकरण.––– **13–15**

ब. यहुद्यांचे ''अडखळण'' ––– **वचन. 7–8**

क. पौलाची परिवर्तनपुर्व धारणा —— **व. 9–11**

ड. पौलाचे परिवर्तन आणि नेमणूक (आज्ञापालनासाठी त्याचे पाचारण ) —— **व.16**

उत्तरः

## चौथा दिवस– प्रे.कृ. 26:16–28 वाचन करा.

**प्रश्न 1: पौलाचे दर्शन आणि दर्शनाविषयी आज्ञापालन या विषयी सांगा ?**

**उत्तरः** वचन. 17–20

**प्रश्न 2: पौलाने कोठे उपदेश दिले ?**
**उत्तर::** यरूशलेमत व यहुदीयात ''पश्चाताप करा आणि पश्चातापास शोभतील अशी कृत्ये करून देवाकडे वळा'' (व.20).

**प्रश्न 3: अग्रीपाने पौलाला कोणते उत्तर दिले ?**
**उत्तर:** '' मी ख्रिस्ती व्हावे म्हणून तू थोडक्यानेच माझे मन वळवतोस'' (व.28).

**प्रश्न 4: पौलावर विश्वास न करता अग्रीपाने(जो कोणी ख्रिस्ताचा नकार करतो) काय गमावले ?**
**उत्तर:** त्या सर्वांनी तारण गमावले. सुवार्ता ऐकण्याची संधी गमावली कारण ते उठून निघून गेले.

## पाचवा दिवस – प्रे.कृ. 26:29–32

**प्रश्न 1: पौल बंदीवासात राहणे किंवा मृत्यूस पात्र होता काय ?**
**उत्तर:** तो बंदीवासत राहणे किंवा मृत्यूस पात्र नव्हता (व.31–32).

प्रश्न 2: जेथे तो होता तेथे पौलास कोणी पाठविले ?
उत्तर:

**प्रश्न 3: ही त्याच्या पाचारणाची पुर्तता होती काय?( प्रषित 9:15 मध्ये पाही)**
**उत्तर:** त्याच्या पाचारणाची हा पुर्तता होती. करण देवानीच त्याला परराष्ट्रीयांसाठी त्याची निवड झाली होती.

## सहावा दिवस –

**प्रकरण 15 : " फेस्त आणि अग्रिपापुढे पौलाचे आत्मसमर्थन"**

| | |
|---|---|
| **पाठ** | : अध्याय 25–26 |
| **मुख्यवचन** | : प्रे.कृ. 26:16 '' तर उठ व आल्या पायावर उभा रहा, कारण मी तुला एवढयासाठी दर्शन दिले आहे की, तु जे माझ्याविषयी पाहीले आहे व ज्या बाबत मी तुला दर्शन देणार आहे, त्याचा सेवक व साक्षी असा नेमावे.'' |
| **विषयवाक्य** | : पौल राज्यपाल आणि राजा यांच्या समक्ष बोलतो. |
| **जीवनतत्व** | : जेव्हा आपण आज्ञाधारकतेचा पाठलाग करतो तेव्हा आपण अधिक वाढतो. |

## **प्रकरण 16 : अध्याय 27–28**

**विषय वाक्य : पौलाचा रोमकडील प्रवास ज्यात तुफान व नौकाभंग आहे.**

### <u>पहीला दिवस</u> प्रे.कृ.27:1–10 वाचन करा.

**प्रश्न 1: तारवाच्या धन्याविषयी आपण काय जाणतो ?**

**उत्तरः** तारवाच्या धन्याची इच्छा होती की, येथे न थांबता पुढे जावे कारण हे बंदर हीवाळयात राहण्यासाठी सोयीचे नव्हते. पण तारवाच्या मालकाला माहीत नव्हते की, पुढे मोठे संकट आहे पौलाची पुढे जाण्याची इच्छा नव्हती. कारण पुढचा प्रवास धोक्याचा आहे.जहाज बुडण्याची शक्यता होती आणि लोकांच्या जीवाला धोका होता.

**प्रश्न 2: पौलासोबत जल प्रवासात कोणते दोन मित्र गेले ?**

**उत्तरः** त्याच्या सोबत **अरिस्तार्ख** आणि **लुक** सहप्रवासी होते. लुक ''**आम्ही** '' हा शब्द वापरीत आहे.

**प्रश्न 3: पौलासोबत असणाऱ्या मित्रांची नावे सांगा आणि तुम्ही त्यांच्या मैत्रीपासून काय शिकता ? (कलैस्से 4:10, 14 आणि फिलेमोन 23, 24 वाचा)**

**उत्तरः** लुक आणि अरिस्तार्ख हे मित्र होते.त्याच्यावर संकट आले तरी ते त्याला सोडून न जाता त्याच्या बरोबर होते. आपण सुद्धा जेव्हा आपला मित्र संकटात असतो तेव्हा सोडून न जाता त्याच्या बरोबर राहीले पाहीजे. हे दोघेही त्याच्या सोबत होते.

**प्रश्न 4: योहान 15:12–17 तुम्ही मैत्रीविषयी काय शिकाल ?**

**उत्तरः** एकमेकांवर प्रीती केली पाहीजे. आपल्या मित्राकरीता आपण प्राण दिला तर खरी प्रीती आहे. कारण येशू आपणाला मित्र म्हणतो. त्यानी आपल्यासाठी स्वतःचा प्राण दिला आहे. खरा मित्र आपल्या मित्रासाठी आपला प्राण देतो.

**प्रश्न 5: समुद्र प्रवासच्या वेळेस तो कोणता काळ होता आणि परिस्थिती कशी होती ?**

**उत्तरः** हिवाळयाचा काळ होता आणि उपवासाचे दिवस होते. म्हणजेच सप्टेंबर महीना होता.

---

---

**प्रश्न 6: अधिकाऱ्यांना पौलाने कोणती ताकीद दिली होती ?**

**उत्तरः** हिवाळा संपेपर्यंत येथेच थांबून राहावे. जर ते पुढे जातील तर जहाजाला धोका होईल. त्यातील माल व माणसे ह्यांची हानी होईन असे भविष्य पौलाने केले(व.10).

### <u>दुसरा दिवस</u> – प्रे.कृ. 27:11–44 वाचन करा.

**प्रश्न 1: समुद्रातील वादळाचे वर्णन करा आणि ते तारवात होते त्यांच्या परिस्थिती विषयी सांगा ?**

**उत्तरः** दक्षिणेकडचा मंद वारा वाहत आहे हे समजून ते काठाकाठाने त्रेताच्या बाजूने निघाले. थोडया वेळाने **'युरकुलोन'** नावाचा तुफानी वारा सुटला. त्या तुफानात तारू सापडले. ते वाहत दक्षिणेकडील 'कौदा' नावाच्या बेटावर आले. तारू खडकावर आपटू नये म्हणून तारू खालून आवळून घेतले. कारण सुर्ती नावाच्या बेटावर आदळण्याची भीती होती. त्याने शीड उतरले आणि वाहवत गेले.असे **तिन दिवस** चालले नंतर त्यांनी तिसऱ्या दिवशी तारू हलके व्हावे म्हणून त्यातील माल टाकून दिला. पुष्कळ दिवस त्यांना सुर्यप्रकाश दिसला नाही.तुफान वाढत होते. प्रवाश्यांचे खाण्याचे हाल झाले होते. ते भयभित झाले होते. त्यांनी जगण्याची आशा सोडली होती. सगळीकडे निराशा होती. अशा अवस्थेत पौल बोलू लागला.

**प्रश्न 2: पौलाने त्या लोकांना काय म्हटले आणि ही माहीती त्याला कोठून प्राप्त झाली ?**

**उत्तरः** पौलाने आशेचा संदेश दिला. तो शांतपणे म्हणाला आपण क्रेताहून निघायला नको होते. त्यांने त्यांना धीर दिला की, तुम्हापैकी कोणाचाही नाश होणार नाही.पण तारवाचा मात्र होईल(व.21–22)
ही माहिती त्याला देवाच्या दुताने कळविली होती (व.23–26).

**प्रश्न 3: धेर्य धरा याचा अर्थ काय ?**

**उत्तरः**

---

---

**प्रश्न 4: स्तोत्र.119:89 ; 2तिमथ्य 3:16–17 याचे स्पष्टीकरण करा ?**

**उत्तरः** परमेश्वराचे वचन सर्वकाळ टिकणारे आहे. देवाचे वचन हे परमेश्वर प्रेरित आहे. ते आपचे दोष दाखवते आणि दोषापासून मुक्त करून सुधारणा घडवून आणते. देवाचे वचन ह्यासाठी आहे की, देवाचा भक्त चांगल्या कामासाठी सज्ज व्हावा.

**प्रश्न 5: तारवात किती लोक होते ?**

**उत्तरः** तारवात सर्व मिळून **दोनशे शहात्तर** जण होते (व.37).

**प्रश्न 6: तारवात कैद्यांची अवस्था काय होती ?**

**उत्तरः** ते तारवात चौदा दिवस उपाशी होते त्यांची अवस्था फार बिकट झाली होती(व.33–34).

**प्रश्न 7: प्रेषित 27:23–24 हे वचन पौलाच्या जिवनात कशाप्रकारे पुर्ण झाले ?**

**उत्तरः** जहाजाचा समोरचा भाग वाळूत रूतून जहाज फुटले.तरी जहाजावरील सर्वजण सुरक्षीत किनाऱ्यावर उतरले. जसे देवाने पौलाला सांगिले त्या प्रमाणे घडले. जहाज फुटले पण त्यावरील सर्वजण बचावले (व.42–44).

## तिसरा दिवस – प्रे.कृ. 28:1–11 वाचन करा

**प्रश्न 1: नौकाभंग शेवटी कोठे येऊन पोहचला ?**

**उत्तरः** ते जहाज ज्या बेटावर होते ते बेटाचे नाव **मिलीता** होते. ते बेट इटलीच्या दक्षिणेकडील एक लहान बेट आहे.

**प्रश्न 2: मिलाता बेटातील लोकांनी त्यांच्याशी कसा व्यवहार केला ?**

**उत्तरः** त्यांनी त्यांच्याशी **दयापुर्ण** व्यवहार केला.त्यांचा चांगला पाहुणचार केला त्यांना उब यावी म्हणून शेकोटी पेटवून दिली. कारण त्यावेळी पाऊस व गारठा होता.

**प्रश्न 3: बेटावरील लोकांवर देवाने स्वतःला कसे प्रगट केले ?**

**उत्तरः** पोल जेव्हा शेकोटीसाठी काटक्या गोळी करीत होता तेव्हा त्या त्या काटक्यात असलेला विषारी साप चावला जेणे करून की त्याच्या विषाने मनुष्य मरून जाईल असे विष होते. लोकांना वाटले की, पौल आता मरणार. तो समुद्राच्या वादळातून वाचला पण देवाने त्याला शिक्षा देण्यासाठी हा दुसरा मार्ग अवलंबविला आहे. हा खरोखरच खुनी असावा असा त्यांचा समज झाला. पण त्याला त्याचे काहीच झाले नाही.

**प्रश्न 4: रोमकडे पुढे प्रवासकरण्यापुर्वी ते किती काळ बेटावर थांबले ?**

**उत्तरः** हिवाळयातील **तीन महीने** ते त्या बेटावर थांबले. हिवाळा संपल्यावर ते निघाले.

**प्रश्न 5: तेथे पौलाने आपला वेळ कसा घालवला असे तुम्हास वाटते ?**
**उत्तरः** तेथिल लोकांना सुवार्ता सांगत असे. रोग्यांसाठी प्रार्थना करीत असे अशा प्रकारे तो आपला वेळ घालवित आसे.

## चौथा दिवस – प्रे.कृ.28:12–29 वाचन करा.

**प्रश्न.1: रोममध्ये पौलाला कोण भेटले आणि पौलाला कसे वाटले ?**
**उत्तरः** रोम मधील मंडळीतील काही ख्रिस्ती लोक पौलाला भेटले. ते लोक भेटल्यामुळे पौलाला आनंद झाला.कारण रोम मधील मंडळीला भेटण्याची फार इच्छा होती. त्यांना भेटण्यास तो आतूर झाला होता.असे पौल रोमकरास पत्र यामघून सांगत आहे(रोम.1:9–13, 15:23–24). आणि तो त्यांना भेटला परंतू तो आता स्वतंत्र नव्हता तर बंदीवान म्हणून भेटत होता.

**प्रश्न 2: रोममध्ये पौल कोणत्या परिस्थितीत जगला ?**
**उत्तरः** पौल नेहमी जेव्हा दुसऱ्या ठिकाणी जात असे तेंव्हा तो प्रथम यहुदी सभास्थान जात असे. पण या वंळेस तो मोकळा नव्हता. तर साखळदंडानी बांधलेला असा बंदीवान होता (व.20). तरी त्याला भाडयाच्या घरात राहावयाची मुभा होती(व.30).परंतू नेहमी शिपायी त्याच्या सोबत असत.
म्हणून तो सभास्थानात जायला मिळत नसे तेव्हा तो सर्वांना आपल्या **भाडयाच्या** घरात बोलवित असे व सुवार्ता सांगत असे व आपल्यावर खोटे आरोप करून बंदीवान केले आहे अशी तो तेथील लोकांना खात्री करून देत असे(व.17–20).

**प्रश्न 3: यहुदी पुढाऱ्यांना दिलेल्या आपल्या संदेशात पौलाने कोणत्या गोष्टी जोडल्या ?**
**उत्तरः** यहुद्यांच्या विरूद्ध कोणताच गुन्हा केला नाही.. कैसराकडे फिर्याद करण्याचे कोणते कारण होते ते त्यांना स्पष्ट करून सांगितले(व.18–19). इस्त्राएलाच्या आशेमुळे मी बंदीवान झालो आहे.(व.20). ख्रिस्ताची सुवार्ता सांगितली असल्या कारणाने यहुद्यांनी त्याच्यावर आरोप लावला होता(प्रे.कृ.26:6–7). यरूशलेमेतील यहुद्यांकडून जी खोटी बातमी ऐकली होती ती चुकीची आहे हे त्याला सिद्ध करावयाचे होते. म्हणून तो असे म्हणाला. पण काही जणांनी विश्वास ठेवला काही जणांनी ठेवला नाही(व.24).
म्हणून पौलाने आपल्या संदेशामध्ये त्यानी येशूविषयी मोशेच्या नियमशास्त्रातून यशया.6:9–10 मधील वचनाची फोड करून सांगितले.
यहुदी लोक देवाचे वचन ऐकतात पण त्यांना समजत नाही,
देवाचे सत्य पाहतात पण जाणून घेत नाहीत. कारण त्यांचे हृदय जड झाले आहे.
त्यांनी ख्रिस्ताचा नकार केल्यामुळे तारणाचे शुभवर्तमान **परराष्ट्रीयंना** देण्यात आले आहे.(व.26–28).

**प्रश्न 4: या संदेशाचे त्यांनी कसे प्रत्युत्तर दिले ?**
**उत्तरः** यहुदी आपसात वादविवाद करीत निघून गेले त्यांनी ते वचन स्विकारले नाही.

## पाचवा दिवस – प्रे.कृ.28:30–31 वाचन करा.

**प्रश्न 1: रोममध्ये तो किती दिवस राहीला आणि तेथील लोकांनी येशूच्या सुंवार्तेकरीता कसा प्रतिसाद दिला ?**
**उत्तरः** रोममध्ये **भाडयाच्या घरात दोन वर्षे** राहीला. जे त्याच्याकडे येत त्यांची तो सेवा करीत होता. तेथूनच त्यानी इफिसकरांस पत्र, फिलिप्पैकरांस पत्र, कलस्सैकरांस पत्र व फिलेमोनाला पत्रे लिहली. पौलाने महालातील सर्व पाहरेकऱ्यांना संवार्ता सागिंतली (फिलीप.1:12–14).

**प्रश्न 2: 1तिमथ्य.4 जे बंदीवासातुन लिहले गेले होते, त्यानुसार पौलाची आध्यात्मिक अवस्था कशी होती ?**

**उत्तरः** तो वचनाची घोषण करणारा होता,तो सहनशील होता,तो नेहमी निषेध करण्यासाठी आणि बोध करण्यासाठी तयार असे. म्हणून तो म्हणतो मी सुयुद्ध केले आहे आणि धाव संपविली आहे, आणि विश्वास राखला आहे. तो सेवेसाठी स्वतःचे अर्पण करीत आहे. तो न घाबरता संकटाचा सामना करीत धैर्याने पुढे जाणारा होता.

**प्रश्न 3: पौलाच्या ह्या जिवनचरित्र अभ्यासातून तुमच्यासाठी महत्वाचे काय ठरले ?**

**उत्तरः** देवाचे अभिवचन प्रे.कृ.1:8 यरूशलेम, सर्व यहुदीयात, शोमरोनात व पृथ्वीच्या शंवटापर्यंत सुवार्ता पाहचविण्याचे कार्य तसेच परराष्ट्रीयांपर्यंत सुवाार्ता पोहचविण्याचे कार्य पौलाने पुर्ण केले. परंतू ते अजून पुर्ण झाले नाही. पौलाने आपली जबाबदारी पुर्ण केली आता ती पुढे नेण्याची जबाबदारी आमची आहे. त्यासाठी आम्ही स्वतःला समर्पित केले पाहीजे. पौलाने न घाबरता धैर्याने सेवा केली. संकटात खंबीर राहीला तसे आम्ही खबीर राहीले पाहीजे. आणि सुवार्ता सांगत राहीले पाहीजे.

**प्रश्न 4: ज्या प्रमाणे तुम्ही जीवन जगता त्यावर ह्याचा कोणता परिणाम घडणार ?**

**उत्तरः**

## <u>सहावा दिवस</u>

**प्रकरण – 16 " पौल रोमला पोहचतो"**

| | |
|---|---|
| **पाठ** | : अध्याय 27 – 28 |
| **मंख्यवचन** | : प्रेषित 27:25 " म्हणून गृहस्थानो ,धैर्य धरा, माझा देवावर भरवसा आहे की त्याने मला जसे कळविले तसेच घडले" |
| **विषय वाक्य** | : पौलच्या रोमयेथील प्रवासात वादळ आणि नौकाभंग सहभागी होते, |
| **जीवनतत्व** | : जीवनाच्या तुफानी वादळात आपला विश्वास पारखला जातो. |

थोडक्यात सारांश :–

प्रेषितांचे हे पुस्तक विनासमाप्तीचे आहे. ते कधीही पुर्ण झालेले नाही. पवित्र आत्म्याने ते अर्धवट सोडले आहे. ते अजून लिहले जात आहे. हा खरा ख्रिस्ती धर्माचा इतिहास आहे. याची सुरवात इस्त्राएलाच्या सुतारापासून लहानश्या गावातून होते त्याचा प्रसार निरक्षर अशा शिष्यांच्या आणि पौल प्रषित व त्यांचे सोबती यांच्या द्वारे होते. आणि आजही सुरू आहे. आणि यासाठी पवित्र आत्मा सतत आजही मार्गदर्शन करीत आहे.